कृषीवल

रायगड, रविवार, दि. २८ सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹

आजचा रंग नारंगी

२६ कोटींच्या अमली पदार्थांची होळी

नवी मुंबई : नवी मुंबईत गेल्या दोन वर्षांपासून नशामुक्तीसाठी पोलीस दल सातत्याने कारवाई करत असल्याने गेल्या ३२ महिन्यात १८३१ गुन्हे दाखल करून २,८५४ गुन्हेगारांना पकडण्यात आले. या धरपकडीत ७० कोटी १८ लाखांचा मुद्देमाल पोलीस दलाने जप्त केला. वारंवार जप्त केलेले अमली पदार्थ हे शास्त्रोक्त पद्धतीने तळोजा येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट या कंपनीतील भस्मीकरणाऱ्या यंत्रात जाळून त्याची होळी केली जाते. अशाच पद्धतीचा कार्यक्रम शक्रवारी नवी मुंबई पोलीस दलाने आयोजित केला. या कार्यक्रमात २६ कोटी ४८ लाखांचा अमली पदार्थांचा साठा भस्मीकरण यंत्रात टाकून तो साठा खाक करण्यात आला. नवी मुंबई पोलीस दलाचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या कारकिर्दीत गेल्या अडीच वर्षांपेक्षाच्या अधिकच्या काळात नशामुक्ती नवी पान २ वर

रायगडातील पाच नगरपालिकांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन

। रायगड । प्रतिनिधी ।

मुंबई-ठाण्यानंतर पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूरपाठोपाठ आता मुंबई महानगरातील आठ नगरपालिकांमध्येही झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येणार आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील खोपोली, कर्जत, अलिबाग, पेण, माथेरान या नगरपालिकांचा समावेश आहे. त्याचबरोबर ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, बदलापूर आणि पालघर जिल्ह्यातील पालघर नगरपालिकेचा समावेश आहे. याशिवाय बोईसर ग्रामपंचायत परिसरातही झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू करण्यात येणार आहे.

याबाबत नगरविकास विभागाने अलिकडे अधिसूचना जारी करून हरकती व सूचना मागविल्या आहेत. यामुळे मुंबई महानगरातील सर्वच परिसरात झोपडपट्टी पुनर्विकास योजना लागू होणार आहे. यासाठी राज्यासाठी लागू असलेल्या एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत सुधारणा करण्यात येणार आहे. सुरुवातीला झोपडपट्टी पुनर्विकास योजना फक्त मुंबईसाठी लागू होती. त्यानंतर ही योजना पुणे व ठाण्यासाठी लागू करण्यात आली. या पाठोपाठ नागपूर व आता आठ नगरपालिकांना लागू करण्यात आली असली तरी सर्वच महापालिकांमध्ये

योजनेची उद्दिष्ट्ये

राहणीमान सुधारणे : झोपडपट्टीवासीयांचे जीवनमान सुधारणे, त्यांना स्वच्छता आणि चांगल्या वैद्यकीय सेवा मिळतील अशा घरांमध्ये राहण्याची संधी देणे हे मुख्य उद्दिष्ट आहे.

प्रगतीशील पुनर्विकास : खासगी विकासकांना प्रोत्साहन देऊन झोपडपट्टी क्षेत्रांचे नूतनीकरण करणे आणि त्यांना औपचारिक शहरी वस्तीमध्ये आणणे.

आर्थिक प्रोत्साहन : खासगी विकासकांना या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी आमंत्रित केले जाते आणि त्यांना अतिरिक्त जमिनीचे विकास अधिकार दिले जातात.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा झपाट्याने विस्तार

नगरविकास विभागाने केली अधिसूचना जारी

ही योजना लागू करण्याचा शासनाचा विचार असल्याचे नगरविकास विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

मुंबई वगळता पान २ वर

योजनेची अंमलबजावणी

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण : महाराष्ट्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या योजनेचे निरीक्षण, समन्वय आणि मंजुरीसाठी स्थापन केले गेले आहे.

पीपीपी मॉडेल : ही एक सार्वजनिक-खासगी भागीदारी योजना आहे. ज्यामध्ये सरकारकडून कोणताही निधी न घेता खासगी विकासकांकडून गुंतवणूक केली जाते.

या विस्ताराने झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन झपाट्याने होण्यास मदत होणार आहे. ज्यामुळे झोपडपट्टीवासीयांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल.

अंदाज चुकल्याने दुचाकी थेट जेट्टीत

एक बचावला, एकाचा शोध सुरु

। नवी मुंबई । वार्ताहर ।

नवी मुंबईतील बेलापूर येथील खाडीत अंदाज न आल्याने एक दुचाकीस्वार थेट खाडीच्या पाण्यात दुचाकीसह गेला. ही घटना सकाळी साडेसहाच्या आसपास घडली. यात अग्निशमन दलाने दुचाकीवर मागे बसलेल्या व्यक्तीला वाचवण्यात यश मिळवले आहे. मात्र दुचाकी चालवणाऱ्याचा शोध घेण्यात येत आहे. तसेच दुचाकी पाण्याबाहेर काढण्यातही यश आले आहे.

नवी मुंबईतील बेलापूर येथे असणाऱ्या खाडीत अंदाज न आल्याने दुचाकी पाण्यात गेली. हि माहिती मिळताच सीबीडी पोलीस आणि सीबीडी अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. यात दुचाकी चालवणारा अथर्व शेळके (वय २९) याचा शोध घेण्यात येत आहे तर दुचाकीवर मागे बसलेला श्रेयस जोग (वय २३) याला वाचवण्यात यश आले आहे. याबाबत सकाळी पावणेसात वाजता अग्निशमन दलास कॉल आल्यावर ते तात्काळ घटनास्थळी रवाना झाले होते.

बेलापूर जेट्टीचा हा परिसर ध्रुवतारा म्हणून पान २ वर

टेम्पो-एसटीची धडक; १३ भाविक जखमी

राजवाडा वळणावर अपघाताची घटना

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

रेवदंडा-मुरूड रस्त्यावरील राजवाडा येथील अवघड वळणावर एसटी आणि पिकअप टेम्पोमध्ये समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात घडला. या अपघातात ३ जण गंभीर जखमी झाले असून जखमींना अलिबाग सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी दिली.

एसटी चालक सचिन सिगाटे व वाहक शाहु काळे हे अलिबागवरुन दुपारी सव्वाबारा वाजता सुटणारी मुरूड डेपोची एसटी मुरूडकडे घेऊन जात होत. यावेळी मजगाव

येथील पिकअप टेम्पो चालक जय इंद्रजीत करंदीकर हे मुरूड कोटेश्वरी देवीचे दर्शन घेण्यासाठी आणलेल्या महिलांना दर्शन घेऊन परत मजगावकडे घेऊन जात होत. रेवदंडा -मुरूड पान २ वर

‘हस्त’ची धास्ती

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्यातील इतर भागात अतिवृष्टीमुळे शेतीचे नुकसान झाले असले तरी कोकणात शेतीचे फारसे नुकसान झालेले नाही. कोकणात खरीप हंगामात प्रामुख्याने भात आणि नाचणीची लागवड होत असल्याने, पिकांवर अतिवृष्टीचा फारसा परिणाम दिसून आलेला नाही. राज्यातील इतर भागांच्या तुलनेत कोकणातील पिक परिस्थिती चांगली आहे. मात्र आजपासून सुरू होणाऱ्या हस्त नक्षत्रावर मोठा पाऊस झाला तर हातातोंडाशी आलेल्या पिकाचे नुकसान होण्याची धास्ती शेतकऱ्यांना आहे.

कोकणात यंदा पावसाने मे महिन्यातच हजेरी लावली. लवकर आलेल्या पावसामुळे पेरणी उशीराने झाली. नंतर जून महिन्यात सुरवातीला पावसाने ओढ दिली. त्यामुळे यंदा भातलावणी उशीरा सुरू झाली. मात्र नंतर समाधानकारक पाऊस पडत राहिला. त्यामुळे भात आणि नाचणी पिक जोमाने आले. अतिवृष्टीचा काही प्रमाणात फटका बसला असला तरी त्याचा मोठा परिणाम शेतीवर झालेला नाही. मात्र २७ तारखेपासून हस्त नक्षत्र सुरु होत आहे. हस्त नक्षत्राला यंदा मोर वाहन असणार आहे. त्यामुळे पावसाचा जोर पान २ वर

आज रेड अलर्ट

जिल्ह्यामध्ये गेली काही दिवस विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा सुरुवात केली आहे. शुक्रवारी सायंकाळपासून सुरु झालेल्या पावसाने थैमान घातले आहे. शनिवारी सकाळपासून पावसाची रिपरिप सुरुच राहिली. रविवारी(दि.२८) रेड तर सोमवारी(दि.२९) ऑरेंज तसेच मंगळवारी(दि.३०) येलो अलर्टचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. जिल्ह्यातील अनेक भागात रविवारी व सोमवारी मुसळधार पाऊस कोसळणार आहे. काही भागांमध्ये अतिवृष्टी होणार आहे.त्यामुळे नदी, समुद्रकिनारी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहवे, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

आदिवासी शिष्यवृत्ती योजनेत बदल

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्यातील अनुसूचित जातींतील नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना राज्य सरकारच्या सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूवमाध्यमिक शिष्यवृत्ती योजनेतून वगळून केंद्र सरकारची पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या योजनेची रक्कम राज्याच्या योजनेपेक्षा जास्त असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. विशेष म्हणजे योजना सुरू झाल्यानंतर सुमारे १५ वर्षांनी हा बदल करण्यात आला आहे.

आदिवासी विकास विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. आदिवासी विकास विभागामार्फत चालवण्यात येत असलेल्या वसतिगृहांतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शालेय गणवेश, स्वच्छता प्रसाधने, शालेय साहित्य यासाठी निधी दिला जातो. सन २०१२पासून केंद्र शासनामार्फत इयत्ता नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांसाठी पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती योजना राबवली जाते.

मात्र, राज्याची योजना आणि केंद्र सरकारची योजना यांची तुलना केली असता, केंद्र सरकारच्या योजनेतील शिष्यवृत्तीची रक्कम राज्याच्या योजनेच्या रकमेपेक्षा अधिक आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या सुवर्णमहोत्सवी शिष्यवृत्ती योजनेतून इयत्ता नववी, दहावीवगळून त्यांना केंद्र शासनाची पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती लागू करण्याचा निर्णय ३ सप्टेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

नव्या निर्णयानुसार, अनुसूचित जमातींतील इयत्ता नववी, दहावीच्या सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी केंद्र शासनाची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात येत आहे. या योजनेसाठी केंद्र आणि राज्य शासन यांचा हिस्सा ७५:२५ असा आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडून निधी मिळाल्यानंतर योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात येईल.

शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या नववी, दहावीच्या मुला-मुलींसाठी केंद्र शासनाच्या योजनेचा लाभ देऊन या योजनेत उपलब्ध होणारी रक्कम वगळून राज्य शासनाच्या वसतिगृह योजनेतील उर्वरित रक्कम राज्य शासनाच्या योजनेतून संबंधित विद्यार्थ्यांना देण्याबाबत स्वतंत्रपणे सूचना दिल्या जातील. मात्र, ही योजना अनुदानित, शासकीय निवासी आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा, नामांकित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातींतील मुला-मुलींना लागू राहणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

सरकारवरील आर्थिक भार कमी

राज्य शासनाकडून शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या पूर्व माध्यमिक योजनेत नमूद केलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम आणि सोयीसुविधा देण्यात येतात. त्यामुळे शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींना केंद्र शासनाच्या योजनेचा लाभ देऊन या योजनेत उपलब्ध होणारी रक्कम वगळून उर्वरित रक्कम राज्य शासनाच्या योजनेतून देण्यात आल्यास राज्य शासनावरील आर्थिक भार कमी होईल. निर्वाह भत्ता योजनेत शिल्लक राहणारी रक्कम इतर शैक्षणिक कारणांसाठी वापरता येऊ शकते, असेही नमूद करण्यात आले आहे.

लाडकी बहीण योजनेचे सरकारी कर्मचारी लाभार्थी

। मुंबई । प्रतिनिधी ।

लाडकी बहीण योजनेचा लाभ महिला सरकारी कर्मचाऱ्यांकडूनही घेतला जात असल्याची बाब समोर आली होती. या कर्मचाऱ्यांची संख्या आता ८ हजारांवर गेली आहे. या सर्व कर्मचाऱ्यांकडून लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून घेतलेल्या पैशांची वसुली करण्याचे आदेश वित्तविभागाने संबंधित विभागांना दिले आहेत. या कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्यात येणारी रक्कम सुमारे १५ कोटींच्या घरात असून या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाचीही कारवाई करण्यात येणार आहे.

निवडणुकांआधी सरकारकडून करण्यात आलेल्या घोषणांमध्ये लाडकी बहीण योजना ही सर्वात लोकप्रिय ठरली. या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या ही अडीच लाखांच्या घरात गेल्याने सरकारी तिजोरीवर मोठ्या प्रमाणात भार येत होता. यासाठी ३६०० हजार कोटींची तरतूदही अर्थसंकल्पात करण्यात आली. त्यामुळे या योजनेला कात्री लावण्याचा सरकारने निर्णय घेत, बोगस लाभार्थ्यांची छाननी सुरू करण्यात आली आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर महिला सरकारी कर्मचाऱ्यांनीच लाभ घेतल्याचे समोर आले. सुरुवातीला काही शेकड्यांत असलेली लाभार्थी कर्मचाऱ्यांची संख्या आता आठ हजारांवर पोहोचली आहे. याबाबत महिला व बालकल्याण विभागाच्या गुरुवारी झालेल्या बैठकीत आढावा घेण्यात आला.

सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. त्याचप्रमाणे वार्षिक अडीच लाख उत्पन्न असलेल्या महिलांनाच या योजनेचा लाभ घेता येईल हे स्पष्ट आदेश असताना. १५०० रुपयांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांकडूनच सरकारची फसवणूक झाल्याची बाब प्रशासनाकडून गांभीर्याने घेण्यात आली आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाने या सर्व कर्मचाऱ्यांची यादीच महिला व बालकल्याण विभागाकडे सोपविली आहे. यामध्ये जिल्हा परिषद कर्मचारी तसेच शिक्षकांचाही समावेश आहे. या महिला कर्मचाऱ्यांच्या वेतनातून हे पैसे वळते करण्यात येणार आहेत. त्यांच्या पगारातून टप्प्या टप्प्याने की एकदाच हे पैसे वसूल केले जावेत याबाबत सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागासोबत चर्चा सुर आहे. महाराष्ट्र दिवाणी नियम १९७९ नुसार सरकारची फसवणूक केलेल्या महिला कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतही विचार सुरू असून नेमकी कोणती कारवाई या कर्मचाऱ्यांवर होते हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

पेन्शनधारकांचाही समावेश

विशेष म्हणजे या योजनेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये सरकारी पेन्शन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. त्यामुळे लाभ घेणाऱ्या विद्यमान महिला कर्मचारी कार्यरत असलेल्या विभागांना महिला व बालकल्याण विभागाकडून कर्मचाऱ्यांची यादी दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे पेन्शन विभागाला देखील पत्र पाठविले जाणार आहे. १५ कोटींची भरपाई या कर्मचाऱ्यांकडून केली जाणार असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाईही करण्यात यावी, असे मत महिला व बालकल्याण विभागाकडून नोंदविण्यात आले आहे.

अमरधाम स्मशानभूमीच्या दूरवस्थेबाबत निवेदन

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमीच्या दूरवस्थेबाबत शिवसेनेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन देण्यात आले.

याबाबत ठोस कारवाई न झाल्यास शिवसेना पध्दतीने आंदोलन करण्यात येईल असा इशाराही शिवसेना स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण यांनी दिला आहे.

शिवसेनेच्या वतीने अमरधाम स्मशानभूमीच्या कंत्राटदाराची सदोष व्यवस्था आणि आवश्यक पायाभूत सुविधा याबाबत आयुक्त मंगेश चितळे यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून सविस्तर निवेदन दिले होते. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आयुक्तांनी स्वतः लक्ष घालण्याचे ठोस आश्वासन शिवसेनेच्या शिष्टमंडळाला दिले होते. परंतू याबाबत महापालिकेच्या वतीने कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने तातडीने कारवाई करावी अन्यथा शिवसेना पध्दतीने आंदोलन करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला.

खालापूर परिसराला मिळणार सुरक्षा कवच

रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या हस्ते पोलीस चौकीचे उद्घाटन

। वावोशी । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील खोपोली पाली मार्गावरील इमॅजिका पार्कसमोर नव्याने उभारण्यात आलेल्या पोलीस चौकीचे उद्घाटन रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खालापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सचिन पवार यांनी या पोलीस चौकीच्या स्थापनेमागील गरज व वैशिष्ट्ये स्पष्ट केली.

खालापूर पोलीस ठाण्याची हद्द ११ किलोमीटर असून मुख्य पोलीस ठाणे ९ किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे इमॅजिका परिसरात वाढत्या गर्दी, वाहतूक व उद्योगवाढ लक्षात घेता स्वतंत्र पोलीस चौकीची गरज भासत होती. वावोशी पोलीस दूरक्षेत्राच्या अंतर्गत हा परिसर येत असला तरी तेथून पोहोचण्यासाठी वेळ लागत असल्याने स्थानिकांसह पर्यटकांच्या सुरक्षेची समस्या निर्माण होत होती. शिवाय या परिसरात १२ मोठ्या कंपन्या, फार्महाऊसेस, तसेच उंबरखिंडसारखे ऐतिहासिक स्थळ असल्याने पर्यटकांचीही वर्दळ असते.

इमॅजिका येथे हंगामात दररोज दहा हजारांहून अधिक पर्यटक येतात. त्यामुळे नव्याने सुरू झालेल्या या पोलीस मदत केंद्रामुळे ११ गावांना थेट मदत मिळणार असल्याचे सचिन पवार यांनी सांगितले.

या प्रसंगी बोलताना पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या कार्याची प्रशंसा केली. कठीण परिस्थितीतही संयमाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने काम करण्याची त्यांची पद्धत सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे त्या म्हणाल्या. यावेळी या उद्घाटनप्रसंगी खालापूर पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. विशाल नेहुल, खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे, रसायनी पोलीस निरीक्षक संजय बांगर, वावोशी दुरक्षेत्राचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रमोद पाटील, राजेंद्र पाटील, पोलीस हवालदार आर. गायकवाड, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई व्ही. शिंदे, लोखंडे, ॲडलॅब इमॅजिकाचे कर्मचारी, पोलीस पाटील, ग्रामस्थ उपस्थित होते.

वीज रोहित्र चोरणाऱ्या चौघांना अटक

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील विविध भागात वीज रोहित्र यांच्या चोरीच्या घटना घडल्या आहेत. त्या वीज रोहित्र चोरी प्रकरणी नेरळ पोलिसांच्या पथकाने चार जणांना ताब्यात घेतले असून आणखी काही वीज रोहित्र यांच्या चोरीच्या घटना उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नेरळ परिसरातील धामोते गावातील वीज रोहित्र ऑगस्ट २०२५ चोरीला गेले होते. त्या वीज रोहित्र बद्दल कोल्हारे ग्रामपंचायत कडून नेरळ पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यात आली होती.त्यानंतर नेरळ पोलीस ठाणे येथे प्रभारी पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी आपल्या पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला या वीज रोहित्र चोरीचा तपास करण्यास पाठवले. या पथकाचे आशू बेंद्रे, राजाभाऊ केकान आणि सचिन वाघमारे यांच्या पथकाने नेरळ कळंब रस्त्यावरील सीसीटीव्ही कॅमेरे आणि गुप्तहेर यांची मदत घेऊन वीज रोहित्र चोरांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. या वीज चोरांची टोळी असल्याचे त्या संशयित यांचा माग लागल्यावर पोलिसांच्या पथकाचे निर्दशनास आले. त्यानंतर नेरळ पोलिसांनी प्रथम मुरबाड तालुक्यातील शिलंद येथून विष्णू कडाळी याला ताब्यात घेतल्यावर या टोळीचा पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी वीज रोहित्र चोरणारी टोळी उघडकीस आणली असून आतापर्यंत तीन वीज रोहित्र चोरल्याची कबुली या तरुणांनी दिली आहे.

धामोते तसेच माथेरान येथील दस्तुरी आणि भक्ताची वाडी येथील वीज रोहित्र या चोरट्यांनी चोरून त्यांची विक्री ठाणे जिल्ह्यात केली आहे. या टोळी मधील फोंड्याचीवाडी येथील चंदर ठोंबरे, नितीन हिंदोळा आणि सुनील हिंदोळा या तिघांना ताब्यात घेतले आहे.

शेतीच्या वादावरून केली मारहाण

पनवेल : बापाला लोखंडी सळईने मारहाण करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी मुलगा बाळाराम गणा चौधरी, नातू प्रेम बाळाराम चौधरी, आणि रेणुका बाळाराम चौधरी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. गणा मारुती चौधरी हे चिखले येथे राहत असून ते गावात देव दर्शनाला गेले होते. गावदेवी मंदिर चिखले येथे आले असता मुलगा बाळाराम चौधरी व नातू प्रेम चौधरी यांनी त्यांचा हात पकडला आणि लोखंडी सळई घेऊन दोन्ही पायावर मारहाण केली. यात ते जखमी झाले. त्यानंतर पाठीवर आणि हातावर सळईने आणि लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले. यावेळी रेणुका यांनी शिवीगाळ केली. शेती माझ्या नावावर कर नाहीतर सोडणार नाही असे बाळाराम यावेळी बोलत होता.

अपर मुख्य सचिवांनी साधला संवाद

। रायगड । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महत्त्वाची भूमिका बजावतात. शिक्षणासोबतच मुलांच्या संस्कार आणि मूल्यवर्धनासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये विविध उपक्रम राबवले जातात.

या उपक्रमांना चालना देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व विभागातील कार्यरत अधिकारी वर्षातून किमान दोनदा शाळांना भेट देऊन प्रेरणा दिवस साजरा करणार आहेत.

या पार्श्वभूमीवर राज्याचे अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या सोबत आज अलिबाग तालुक्यातील पी. एम. श्री. रा. जि. प. शाळा, नवगाव येथे पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी सुसंवाद साधून शैक्षणिक व सामाजिक प्रगतीसाठी मार्गदर्शन केले. बोरिस व गुंजीस येथील पाणंद रस्त्यांची पाहणी केली. तसेच ग्रामपंचायत गुंजीस येथे आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले. नवगाव आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा तसेच तहसील कार्यालय, अलिबाग कार्यालयाची पाहणी केली.यावेळी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सुनिल इंदलकर, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील, तसेच मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

सेवानिवृत्त रेल्वे अधिकाऱ्याला लुटले

पनवेल : पोलीस असल्याचे बतावणी करून एका रिटायर्ड रेल्वे कर्मचाऱ्याला लुटल्याची घटना नवीन पनवेल येथे घडली. भारत जाधव हे नवीन पनवेल येथे पायी चालत जात असताना या ठिकाणी त्यांना एका इसमाने थांबवले. त्याने तो पोलीस असल्याचे सांगत रात्री गांजा सापडला असून आम्ही ड्युटीला असल्याचे सांगितले. यावेळी पोलीस असलेल्या इसमाने त्याची चौकशी केली आणि सोन्याचे दागिने बॅगमध्ये ठेवण्यास सांगितले. त्यानंतर जाधव यांना देखील दागिने बॅगमध्ये ठेवण्यात सांगितले. बॅगमध्ये ठेवत असताना पोलीस असलेल्या इसमाने ते दागिने काढून घेऊन तपासण्याचे नाटक केले. पिशवीत दागिने टाकल्याचे नाटक केले. आणि मोटरसायकलवर निघून गेले.

पान १ वरून

रायगडातील पाच नगरपालिकांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन

अन्य महापालिका वा नगरपालिकांमध्ये विकासकांकडून झोपडपट्टी पुनर्विकास योजना अव्यवहार्य असल्यामुळे फारसा रस घेतला जात नाही. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्विकास योजना मुंबई महानगर क्षेत्रातही अन्य भूखंडासोबत संलग्न करण्याची परवानगी देण्यात येणार आहे. त्यामुळे विकासकांना अतिरिक्त चटई क्षेत्रफळाचा लाभ होऊ शकेल. मात्र अन्य योजना संलग्न करताना विकासकांना अधिमूल्य अदा करावे लागणार आहे. विक्री घटकात निर्माण होणाऱ्या क्षेत्रफळापोटी रेडी रेकनरच्या ३० टक्के दराने मिळणाऱ्या अनर्जित रकमेवर हे अधिमूल्य आकारले जाणार आहे.या योजनेत विकासकांना एक किंवा त्यापेक्षा अधिक भूखंडावर असलेल्या झोपड्याचा एकाच भूखंडावर पुनर्विकास करता येणार आहे. अशावेळी विक्री घटकासाठी उपलब्ध असलेले चटई क्षेत्रफळ अन्य भूखंडावर वापरता येणार आहे. मात्र त्यासाठी एक किंवा अनेक भूखंड मालकांची संमती आवश्यक असल्याचे या अधिसूचनेत म्हटले आहे. याशिवाय योजना संलग्न करताना भूखंड वा इमारत स्वतंत्र असणे आवश्यक आहे. या योजनेत निर्माण होणाऱ्या प्रकल्पबाधितांच्या सदनिका संबंधित प्राधिकरणांकडे सुपूर्द करणे बंधनकारक करण्यात आले आहे.या योजनेत पुनर्वसनातील इमारत २५ ते ७९ मीटर (२२ मजली) उंचीची असल्यास रस्ता असलेल्या ठिकाणी किमान एका बाजुला सहा मीटर जागा सोडणे बंधनकारक करण्यात आले आहे. या योजनेत निर्माण होणाऱ्या विक्री घटकातील इमारतींना एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील सर्व सवलती लागू असून त्यापोटी रेडी रेकनरच्या फक्त अडीच टक्के अधिमूल्य भरावे लागेल, असेही या अधिसूचनेत म्हटले आहे.

अंदाज चुकल्याने दुचाकी थेट जेट्टीत

ओळखला जातो. बेलापूर जेट्टीत दोनच महिन्यापूर्वी असाच अपघात झाला होता. गुगल मॅपचे मार्गदर्शन घेत ऑडी चालवणाऱ्या एका महिलेची उड्डाणपूल आणि त्याच्या शेजारी जेट्टीकडे जाणाऱ्या मार्गात गफलत झाल्याने तिने ऑडी थेट खाडीत घातली. यात सुदैवाने तिला वाचवण्यात यश आले होते. या ठिकाणी एका बाजूला उरणकडे जाणारा खाडी उड्डाणपूल आहे तर उड्डाणपुलाच्या शेजारी असणारा रस्ता हा थेट खाडीत जातो. त्यामुळेच गुगल मॅपवर गाडी चालक फसतात. अशा घटना रात्री अंधार असताना होण्याची जास्त भीती असते.या ठिकाणी असे अपघात होऊ नये, यासाठी संरक्षक भिंत बांधण्यात यावी. किमान रात्रीच्या वेळी लाईट्स, दिशादर्शक रेडियम लावण्यात यावे, अशी मागणी अनेक महिन्यापासून केली जात आहे. मात्र त्याकडे संबंधित प्रशासन गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

'हस्त'ची धास्ती

राहण्याची शक्यता आहे. या नक्षत्रावर मोठा पाऊस झाला तर तो शेतीसाठी नुकसान करणारा पाऊस ठरणार आहे. दसऱ्यापासून कोकणात भात कापणीला सुरवात होणार आहे. या कालावधीत पाऊस झाला तर हाताशी आलेले पिक नष्ट होण्याची भिती शेतकऱ्यांना आहे. रायगड जिल्ह्यात जूनपासून सप्टेंबरपर्यंत १९७ हेक्टरवरील पिकाचे तर १ हजार ४०० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तर सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीचा सुमारे २४ हेक्टरवरील पिकांना फटका बसला असल्याची माहिती कृषी अक्षिक्षक वंदना शिंदे यांनी दिली.सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली, कुडाळ, वेंगुर्ला आणि वैभववाडी येथील भात शेतीचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. तर रत्नागिरी जिल्ह्यात दापोलीमधील भाजीपाला लागवडीच्या क्षेत्राचे काही प्रमाणात नुकसान सोडले तर इतर ठिकाणी पिकांवर फारसा परिणाम झालेला नाही.हस्त नक्षत्रावर पडणारा पाऊस हा कोकणातील शेतीसाठी नासाड्या पाऊस म्हणून समजला जातो. भात पिक कापणीसाठी तयार होत असताना, हा पाऊस पडतो. शेतीचे नुकसान होते. हातातोंडाशी आलेले पीक नष्ट होण्याची भीती असते.

टेम्पो-एसटीची धडक; १३ जण गंभीर जखमी

रस्त्यावरील राजवाडा येथील अवघड वळणावर महेंद्र पिकअप टेम्पो यांच्यात समोरासमोर जोरदार धडक बसली. या अपघातात टेम्पोचा चक्काचुर झाला असुन यामध्ये असणारे १३ जण जखमी झाले.

जखमींमध्ये सविता कारभारी रा. रोहा, वैशाली गजानन माळी रा. अलिबाग, कल्याणी जीवन फेगडु रा. मजगाव, वैशाली अनिल रा. रेवदंडा, रेश्मा रविंद्र जगु रा. अलिबाग, अक्षय भुळे रा.रेवदंडा, वेवी अनिल ओसने रा. रेवदंडा, निर्मला रविंद्र जगु रा.रेवदंडा, मिनाक्षी संतोष मुंबईकर,रा.मजगाव, अलका प्रकाश मुंबईकर रा. मजगाव, रेखा मित्यानंद भगत रा.अलिबाग, जीवन नरसिंग गोंजी रा.मजगाव, जीवश्री जीवन गोंजी, रा.मजगाव, शाश्वती जीवन गोंजी रा. मजगाव, टेम्पो चालक जय इंद्रजीत करंदीकर यांचा समावेश आहे.

२६ कोटींच्या अमली पदार्थांची होळी

मुंबई अभियान सर्वच पोलीस दलाने हाती घेऊन त्यावर कठोर अंमलबजावणी केली. दोन वर्षात आतापर्यंत ३८ कोटी रुपयांचा अमली पदार्थाचा साठा जप्त करून तो साठा तळोजा येथील भस्मीकरण यंत्रात जाळून होळी करण्यात आली.

याच कारवाईचा भाग म्हणून शुक्रवारी २६ कोटी ४८ लाख रुपयांचे अमली पदार्थ तळोजा येथील रामकी ग्रुपच्या मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनीच्या भस्मीकरण यंत्रात टाकण्यात आले.नवी मुंबईत गेल्या दोन वर्षांपासून नशामुक्तीसाठी पोलीस दल सातत्याने कारवाई करत असल्याने गेल्या ३२ महिन्यात १८३१ गुन्हे दाखल करून २,८५४ गुन्हेगारांना पकडण्यात आले. या धरपकडीत ७० कोटी १८ लाखांचा मुद्देमाल पोलीस दलाने जप्त केला.

गेल्या अडीच वर्षांच्या काळात अमली पदार्थाच्या तस्करीच्या गुन्ह्यांमध्ये १०१ आफ्रिकन नागरीकांना पोलिसांनी अटक केल्यानंतर त्यांच्याकडून ४० कोटी रुपयांचा अंमली पदार्थाचा माल जप्त करण्यात आला आहे. तसेच नवी मुंबई मध्ये अवैधरित्या राहत असलेल्या आफ्रिकन नागरीकांवरील कारवाईत २०३४ आफ्रिकन नागरीकांना भारत देशातुन हद्दपार करुन त्यांना परत त्यांच्या देशात पाठविले आहे. त्यापैकी ९८९ आफ्रिकन नागरीकांची नावे पारपत्र विभागाव्दारे काळ्या यादीत टाकण्यात आली आहेत.

महाविद्यालयांमध्ये जनजागृती

रायगड : स्मार्ट मीटरविषयी अधिक जनजागृती आणि वापर वाढावा या उद्देशाने रायगड मधील महाविद्यालयांमध्ये जनजागृती आणि प्रात्यक्षिक कार्यक्रमांची सुरुवात करण्यात आली.

या उपक्रमाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी (बीएटीयू), लोणेरे, रायगड येथे करण्यात आले. या कार्यक्रमात सुमारे ३०० विद्यार्थी, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि शिक्षक सहभागी झाले होते.

या सत्रात विद्यार्थ्यांना स्मार्ट मीटर तंत्रज्ञान समजून घेता यावे आणि त्याचे विविध फायदे समजावून सांगण्यासाठी प्रत्यक्ष अनुभवात्मक सत्र आयोजित करण्यात आले.

महाडिस्कॉमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी आपले अनुभव आणि माहिती शेअर केली आणि स्मार्ट मीटरबाबतचे गैरसमज दूर केले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे पोखरकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं..	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार	
			हे.आर.पॉ	रुपये	पैसे
राजेश विनायक बांगवे	११	८	०-६६-००	०	५९

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. गौरकामथ, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१
दिनांक :- २८/०९/२०२५

सही / -
शंकेश राजेश ठाकरे
अधिवक्ता
मो. नं. ९२८४८९२३८७

निवडक

पटेल ज्वेलर्सतर्फे मंगळसूत्र महोत्सवाचे आयोजन

अलिबाग : पटेल ज्वेलर्सतर्फे दि.२५ ते ३० सप्टेंबरदरम्यान अलिबाग येथील मेघा चित्र मंदिर येथे मंगळसूत्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात दागिन्यांसह मनोरंजनाचा रंगतदार कार्यक्रमही ग्राहकांसाठी खुला करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या दरम्यान १० ग्रॅमपेक्षा जास्त दागिन्यांची खरेदी करणाऱ्या ग्राहकांना मोफत सोन्याचे नाणे देण्यात येणार आहे. तसेच, सर्व दागिन्यांच्या घडणावळीवर तब्बल २० टक्के सूट दिली जाणार आहे. यावेळी दागिन्यांच्या खरेदीसह महिलांसाठी खेळ, मजा आणि आकर्षक भेटवस्तूंची विशेष सोय करण्यात आली आहे. त्यामुळे खरेदीसोबतच ग्राहकांना आनंदाचा अनुभव घेता येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन पटेल ज्वेलर्सच्या जनरल मॅनेजर प्रतिक्षा डायस यांनी केले आहे. या मंगळसूत्र महोत्सवात पारंपरिक ते आधुनिक अशा विविध दागिन्यांचा समृद्ध संग्रह प्रदर्शित केला जाणार असून, विशेष संग्रहाचा लाभ घेण्यासाठी लवकरात लवकर भेट द्या, असे पटेल ज्वेलर्सतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

सुतारवाडीत मोकाट गुरांचा ठिय्या

सुतारवाडी : ग्रामीण भागातील रहदारीच्या रस्त्यांच्या मधोमध मोकाट गुरांचा ठिय्या सातत्याने दिसत आहे. हेटवणे, सुतारवाडी, कुडली, नारायणगाव, विळे या ठिकाणी वारंवार मोकाट सोडलेली जनावरे घोळक्याने उभे असतात. आपली जानवरे कोठे आहेत, रात्री घरी का परत आली नाहीत, याची किंचितही काळजी किंवा चिंता गुरे मालकांना नसते.

त्यामुळे ही मोकाट जनावरे रात्रंदिवस रस्त्यावर विश्रांती घेत असतात. या मोकाट सोडलेल्या गुरांचा वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः अवघड कॉइल घेऊन जाणारा ट्रेलर चालकांना खाली उतरून उभ्या असलेल्या किंवा बसलेल्या जनावरांना तेथून हाकलावे लागत आहे. ही समस्या गेल्या अनेक वर्षांपासून जाणवत आहे. रात्री अपरात्री वाहनचालक या गुरांना कधी उडवून जातो ते कळत सुद्धा नाही. त्यामुळे त्यात गुरांचा मृत्यू होऊन शेतकऱ्याचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने यावर लवकरात लवकर मार्ग काढावा, असे वाहनचालकांसह स्थानिकांमधून बोलले जात आहे.

हृदय तपासणी शिबिराला प्रतिसाद

सुकेळी : येथील जिंदल रुग्णालयाच्या सौजन्याने बुधवारी (दि.२४) खांब विभागातील वैजनाथ व घेरासुरगड येथे हृदय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा एकुण ८४ नागरीकांनी लाभ घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरामध्ये जिंदल रूग्णालयातील डॉ. प्रिया भोईर यांच्यातर्फे नागरीकांची तपासणी करण्यात आली. तसेच, या शिबिरामध्ये नागरीकांची ईसीजी, रक्तदाब, शरीरातील साखरेचे प्रमाण तपासून मोफत औषधे देण्यात आली. तसेच, पुढील उपचारासाठी डॉ. प्रिया यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.या शिबिराला जिंदल रूग्णालयाचे व्यवस्थापक सर्वेश पांचोली, डॉ. प्रिया भोईर, उपसरपंच दत्तात्रय पातेरे, तंटामुक्ती अध्यक्ष जनार्दन महाबळे, वैजनाथ गावचे सेक्रेटरी किशोर महाबळे, सुरेश चोरघे, काशिनाथ वातेरे, यशवंत सावरकर, शांताराम धामणसे, एकनाथ पार्टे, मारुती सावरकर, प्रसाद गोडबोले, राकेश महाबळे, दत्तात्रय पार्टे, जिंदाल रुग्णालयातील कर्मचारी दिनेश ठमके, किरण सुटे, शरन्या श्रीजीत, मोहीनी जांबेकर, अदिती जंगम, प्रफुल्ल चौधरी, मनिष डांगी, संदिप चाळके, यशवंत वारगुडे यांच्यासह वैजनाथ व घेरासुरगड ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकार एकीकरणाच्या आंदोलनाला यश

पनवेल : तालुक्यातील जमिनीवर उभारलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेच्यावतीने धरणे आंदोलनाचा इशारा दिला होता. हे आंदोलन स्थगित करावे यासाठी बेलापूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण पवार व सिडकोचे दक्षता मुख्य अधिकारी सुरेश मेंगडे यांनी सिडकोचे विमानतळ प्राधिकरण सहव्यवस्थापक शंतनू गोयल यांच्याशी पनवेल तालुका पत्रकार एकत्रीकरण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची भेट घडवून आणत बैठकीचे आयोजन केले. यावेळी झालेल्या बैठकीत सिडकोचे विमानतळ प्राधिकरण सहव्यवस्थापक शंतनू गोयल यांनी सिडको प्रशासन हे स्व.लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावासाठी आग्रही आहे. कारण आजपर्यंत विमानतळ नामकरणाचे जे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत, ते फक्त दिबांच्या नावाचेच असल्यामुळे आणि स्थानिकांसह पत्रकार आंदोलनाच्या पावित्र्यात उतरल्यामुळे सिडको प्रशासन तथा विमानतळ प्राधिकरण देखील दिबांच्या नावासाठी प्रयत्नशील असल्याचे आयोजित बैठकीत आश्वासित केले आले.

दरडग्रस्तांचा 'निवारा' कागदोपत्री

- ७२ पैकी २८ निवारा शेड मंजूर
- फक्त ६ ठिकाणी कामे प्रगतीपथावर

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यात गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने भूस्खलन, जमिनींना भेगा पडणे, दरड कोसळणे अशा घटना घडत आहेत. यावर्षी देखील पावसाचे प्रमाण अधिक असल्याने दरडींचा धोका कायम आहे. त्यामुळे शासनाने ७२ दरडग्रस्त गावांपैकी २८ ठिकाणी निवारा शेड मंजूर केले असून प्रत्यक्षात मात्र ६ ठिकाणीच कामे प्रगतीपथावर असल्याचे सांगण्यात आले आहे. तरीदेखील प्रशासन झालेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर संभाव्य धोका लक्षात घेऊन अधिक गतिमान होण्याची आवश्यकता असल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विचारणा केली असता पावसामुळे संबंधित मंजूर झालेली कामे सुरू झाली नसल्याची माहिती कार्यकारी अभियंता महेश नामदे यांच्याकडून देण्यात आली.

महाड तालुका हा डोंगराळ भाग असून तालुक्याचा ८० टक्के भाग दऱ्या खोऱ्यात वसलेला आहे. या सर्व भागामध्ये १९९५ सालापासून सातत्याने दरडी कोसळत आहेत. त्यामुळे महाडसह पोलादपूर तालुक्यातील अनेक गावे संभाव्य दरडग्रस्त गावांच्या यादीत आली आहेत. त्याबाबत प्रतिवर्षी कागदोपत्री नियोजन केले जात आहे. प्रत्यक्षात या संभाव्य दरडग्रस्त गावांमध्ये अद्याप उपायोजना करण्यात आलेल्या नाहीत. महाडमध्ये दरडप्रवण क्षेत्रामधून भूस्खलन होण्याच्या शक्यतेने पावसाळ्यात अनेक नागरिकांना स्थलांतर करण्याच्या नोटिसा महसूल विभागाकडून दिल्या जातात. तर, काही दुर्गम व डोंगराळ भागातील भूस्खलन होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांना तात्पुरत्या ठिकाणी स्थलांतरित करावे लागते. मात्र, शासनाकडून २८ ठिकाणी निवारा शेडची कामे मंजूर असून प्रत्यक्षात मात्र ६ ठिकाणी प्रगतीपथावर असल्याचे सांगण्यात आले आहे.

महाड तालुक्यात संभाव्य दरडग्रस्त गावांच्या यादीत लोअर तुडील, नामावले कोंड, शिंगरकोंड मोरेवाडी, आंबिवली पातेरीवाडी, कोंडीवते मूळ गावठाण, सव, सोनघर, जुई बुद्रुक, चांढवे खुर्द, रोहन, वलंग, कोथेरी जंगमवाडी, माझेरी, पारमाची वाडी, कुंबळे, कोसबी, वामने, चिंभावे बौद्धवाडी, वराठी बौद्धवाडी, चोचिंदे, चोचिंदे कोंड, गोठे बुद्रुक, आदिस्ते, खैरे तर्फे तुडील, कुर्ला दंड वाडी, रावतळी मानेचीधार, मोहोत सुतारवाडी, मांडले, पिंपळकोंड, मुमुर्शी आंब्याचा कोंड, मुमुर्शी गावठाण, मुमुर्शी बौद्धवाडी, वीर गाव, वीर मराठवाडी, टोळ बुद्रुक, दासगाव भोईवाडा, तळोशी, बिरवाडी वेरखोले, करंजखोल, नडगाव काळभैरव नगर, पुनाडेवाडी, पाचाडवाडी, सांदोशी हेटकर कोंड, शेलटोळी, अंबेशिवथर, वाळण बुद्रुक, नाणे माची, कोंडीवते नवीन, हिरकणी वाडी, पाचाड परडी वाडी, वाघेरी आदिवासी वाडी, कोथेरी तांदळेकर वाडी, करंजाडी म्हस्के कोंड, नातोंडी धारेची वाडी, गोंडाळे, खर्डी, पांगारी मनवेधार, वरंध पोकळे वाडी, वरंध बौद्धवाडी, आड्राई, वाळण झोळीचा कोंड, वाळण केतकीचा कोंड, भीवघर, पिंपळवाडी, रुपवली, निगडे, बारसगाव, कोथेरी, ओवळे, खरवली व तळीये या ७२ गावांचा समावेश आहे.

महाड तालुक्यात सन २००५ मध्ये मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होऊन दासगाव, जुई, रोहन, कोंडीवते, सिंगर कोंड, मोरेवाडी यासह अन्य ठिकाणी व पोलादपूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर भूस्खलन झाले होते. त्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले होते, तर अनेक जण ढिकाऱ्याखाली गाढले गेले होते. त्याचीच पुनरावृत्ती २०२१ मध्ये तळीये गावामध्ये झाली. हे भुस्खलन झाल्यानंतर राज्य सरकारच्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाने मोठ्या प्रमाणावर दरडग्रस्त गावांमध्ये निवारा शेड बांधण्याचे धोरण आखले होते. मात्र, त्याची अंमलबजावणी ज्या पद्धतीने व्हायला पाहिजे त्या पद्धतीने होत नसल्याबद्दल स्थानिक ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे निवारा शेड बांधण्याचे काम शासनाने निधी देऊन देखील का प्रलंबित राहत आहे? तसेच, ालुक्यातील सर्व ७२ गावी निवारा शेडची उभारणी होण्यासाठी आणखीन किती कालावधी लागेल, अशी विचारणा आता दरडग्रस्तांकडून केली जात आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाकडून दिरंगाई

महाड तालुक्यातील रूपाली बौद्ध वाडी सुंबे कोंड, भिवघर, जुई बुद्रुक सोनघर, माझेरी, कोंडी वते मूळ गावठाण, मोहोत सुतारवाडी व भिसे वाडी, पातेरेवाडी आंबिवली बुद्रुक, वरद पोकळेवाडी कुंभार कोंड व वरंध बौद्धवाडी या गावांसाठी खासगी ठिकाणी निवारा शेड बांधण्यात येणार आहेत. परंतु, ती जागा संबंधित ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात आली आहे. तसेच, सव, दासगाव भोईवाडा, काळभैरव नगर नडगाव, कोठेरी तांदळेकर वाडी, करंजाडी म्हस्के कोंड, नातोंडी धारेची वाडी, शेल टोली व चाडवे खुर्द या गावांसाठी शासकीय जागेवर निवारा शेड बांधण्यात येणार आहेत. बांधकाम विभागाकडून पावसाचे कारण देत कामाची चालढकल करण्यात येत असल्याचे बोलले जात आहे. जी कामे पावसळ्यापूर्वी होणे गरजेचे होते ती अद्याप प्रगतीपथावर असल्याचे सांगण्यात येत आहे. यावरून हजारो नागरिकांना निवारा शेडमध्ये तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करण्याचे धोरण शासनाच्या महसूल विभागाच्या कागदोपत्रीच असल्याचे समोर येत आहे.

मराठवाड्याच्या मदतीला कामोठेकर धावले

। पनवेल । प्रतिनिधी ।

मराठवाड्यात पावसाने थैमान घालत शेतातील पीक, घरातील सामान आणि जनावरे वाहून नेली आहेत. त्यामुळे हजारो शेतकरी बांधवांवर उपासमारीची वेळ आली असून सरकारची मदत अपुरी पडत आहे. या कठीण काळात कामोठेकरांनी पुन्हा एकदा आपली सामाजिक बांधिलकी दाखवत मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे.

एकता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अमोल शितोळे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत कामोठेतील नागरिक मोठ्या प्रमाणावर साहित्य जमा करत आहेत. विशेष म्हणजे संस्थेच्या महिला टीमकडून महिला व मुलींसाठी लागणारे साहित्य वेगळे संकलित केले जात आहे. या

उपक्रमात उषा डुकरे, संगीता पवार, जयश्री झा, दीपा खरात, स्वप्नाली दोषी, सारिका शिंदे आणि शितल शितोळे यांनी पुढाकार घेतला आहे. या संकलनासाठी माजी आमदार बाळाराम पाटील यांनी त्यांच्या शाळेची जागा उपलब्ध करून दिली असून शेतकरी कामगार पक्ष देखील सक्रिय सहकार्य देत आहे. जेष्ठ समाजसेविका रंजना सालोडीकर, प्रमोद भगत, शंकर म्हात्रे, सखाराम पाटील यांच्यासह एकता सामाजिक संस्थेचे सर्व शिलेदार या मोहिमेत सहभाग घेत आहेत.

पेणमध्ये जनआक्रोश

हेटवणे जलबोगद्याविरोधात आंदोलन पेटले

परवानगीशिवाय सुरू असलेले काम थांबविण्याची मागणी

। वावोशी । प्रतिनिधी ।

हेटवणे जलबोगदा प्रकल्पाचे बेकायदेशीर काम तात्काळ थांबवावे, या मागणीसाठी पेणमध्ये उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर शेतकरी, महिला व सामाजिक कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन छेडले. तालुक्याच्या अस्तित्वाशी निगडित 'पाणी वाचवा प्रदूषण रोखा' या लढ्यामुळे आंदोलनाला प्रचंड तीव्रता लाभली आहे.

यावेळी हेटवणे धरणातून मुंबईकडे पाणी वळवण्यासाठी सुरू असलेल्या ३.२ मीटर व्यासाच्या जलबोगद्याविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. कार्यकर्त्यांनी ठामपणे मागणी केली की, परवानगीशिवाय सुरू असलेले हे काम तात्काळ थांबवले पाहिजे. तालुक्याच्या अस्तित्वावर घाला घालणारा हा बोगदा कोणत्याही परिस्थितीत चालू देणार नाही, असा शासनावर निष्क्रीयतेचा आरोप ठेवत कार्यकर्त्यांकडून सांगण्यात आले. तसेच, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र झेमसे यांनी प्रशासन व लोकप्रतिनिधींवर निशाणा साधत, परवानगीशिवाय एवढे भलेमोठे जलबोगद्याचे काम सुरुच कसे होते? हक्काचे पाणी पळवले जात असताना प्रतिनिधी एवढे गप्प का बसलेत? असे प्रश्न उपस्थित केले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते समीर म्हात्रे, छावा संघटनेचे जितेंद्र ठाकूर, माझं पेणचे राजू पाटील, एमएमआरडीए विरोधी संघर्ष समितीचे अध्यक्ष महेंद्र ठाकूर, संजय थळे, सुनिल धामणकर, गोरख पाटील, सामाजिक कार्यकर्त्या समिधा पाटील, तुषार पाटील, राजू पाटील, मनिषा थवई, शामकांत म्हात्रे, जयसन पाटील, चंदू म्हात्रे, लिलाधर म्हात्रे, किरण म्हात्रे, गणेश तांडेल, प्रभाकर पाटील यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी हजेरी लावली. दरम्यान, हेटवणे धरणाचा जलसाठा कमी झाल्यास खारेपाटातील सुपीक शेती व पिण्याच्या पाण्यावर गंभीर प्रश्न निर्माण होईल, असा ठाम इशारा देत आंदोलनकर्त्यांनी जनतेला जागरूक राहण्याचे आवाहन केले.

> **आपल्या डोळ्यांसमोर हक्काचे पाणी पळवण्यासाठी जलबोगद्याचे काम होत आहे. मग प्रशासन व निवडून आलेले प्रतिनिधी एवढे गप्प का बसलेत?**
> **– राजेंद्र झेमसे, सामाजिक कार्यकर्ते**

वडखळ विभागात मटका जोरात

पेण : गेली तीन ते चार महिने जिल्ह्यात गुटखा आणि मटक्यावर पोलिसांची करडी नजर आहे. तरी देखील, वडखळसह नागोठणे आणि पोयनाड विभागात हे दोन्ही अवैध धंदे पोलिसांची नजर चुकवून केले जात आहेत. महत्वाची बाब म्हणजे हे धंदे बसस्थानक व रिक्षा स्टँडच्या शेजारी तसेच जेथे वाहतूक व्यवस्थेची सुविधा आहेत, अशा ठिकाणी सुरु करण्यात आले आहेत. गुटखा व मटका माफिया बिनधास्तपणे हा धंदा करत असून, त्याच्यावर लगाम घालण्यात पोलीसांना अपयश येत आहे की अपयश आल्याचा कांगावा करीत आहेत, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

अवजड वाहनांमुळे रस्त्याची दुरवस्था

। शिहू । प्रतिनिधी ।

नागोठणे-पोयनाड रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. परिणामी वाहन चालकांसह प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या धुळीमुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच, पाऊस पडल्यावर या ठिकाणी चिखलाचे साम्राज्य पसरत आहे. त्यामुळे या चिखलातून मार्ग काढताना दुचाकी वाहने घसरून अपघात घडत आहेत, तर अनेकांना गंभीर दुखापत होत आहे. त्यातच नागोठणे नजीक असलेल्या रिलायन्स कंपनीच्या मोठंमोठ्या प्रकल्पांचे काम युद्ध पातळीवर सुरु असून मातीचे ओव्हरलोड ट्रक, मोठी अवजड वाहने याच मार्गाने ये-जा करत

आहेत. परिणामी ठिकठिकाणी खड्डे पडत असून रस्त्यावर सर्वत्र पसरलेली धुळ उठत आहे. या धुळीमुळे सर्दी, खोकला, दमा, घशाचे व डोळ्यांच्या आजारांनी डोके वर काढले आहे. तसेच, पाऊस पडल्यावर त्याचे रूपांतर चिखलात होते. यामुळे वाहने घसरून अपघाताचे प्रमाण वाढले आहे.

नाग्या कातकरी यांची जयंती साजरी

। सुतारवाडी । प्रतिनिधी ।

आंबिवली आदिवासी वाडी येथे वीर हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी हरिचंद्र महाडिक, शिवशंभो ज्येष्ठ नागरिक संघ सुधार वाडीचे अध्यक्ष मनोहर साळवी, हरिभाऊ ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत जगताप, आंबिवली आदिवासी गावाचे अध्यक्ष चंद्रकांत जगताप, गणेश मांडवकर, गणपत वाघमारे, तुळशीराम जाधव, शांताराम वाघमारे, अंगणवाडी मदतनीस वासंती जगताप, भागी जाधव, एकदा जाधव, सुशीला वाघमारे, तसेच बहुसंख्य आदिवासी महिला, तरुण, तरुणी, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

कोहिनूर गायकांचा महासन्मान

। चिरनेर । प्रतिनिधी ।

नवरात्र उत्सवातून प्रत्येकाचा आनंद द्विगुणीत व्हावा, त्याचबरोबर स्त्रीशक्तीच्या अस्मितेचा सन्मान व्हावा, एकोपा वाढवा या दृष्टिकोनातून अभिनव सामाजिक सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ चिरनेर प्रणित सार्वजनिक नवरात्र मंडळाच्यावतीने दरवर्षी नवरात्र उत्सव साजरा केला जातो. दरम्यान, नवरात्र उत्सवाच्या पाचव्या माळेवर शुक्रवारी (दि.२६) रात्री चिरनेरच्या सात कोहिनूर गायकांच्या गायन क्षेत्रातील गुणांचा महासन्मान करण्यात आला. यामध्ये मोहन फुंडेकर, विवेक केणी, समाधान फोफेरकर, विशाल पाटील, सुरज पाटील, आकाश गोंधळी व कमळाकर केणी या नामवंत गायकांचा समावेश आहे. त्यांना सरपंच भास्कर मोकल, तंटामुक्ती अध्यक्ष अलंकार परदेशी व माजी उपसरपंच सचिन घबाडी यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळाचे सल्लागार राजेंद्र भगत यांनी केले.

मूलभूत तत्व कायद्यांचा पाया | न्यायाधीश राजेंद्र सावंत यांचे प्रतिपादन

ॲड. दत्ता पाटील कॉलेजचा रौप्यमहोत्सव

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागमधील जनता शिक्षण मंडळाचे ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ या महाविद्यालयाच्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीसंदर्भात 'विधिमंथन २०२५' हा कार्यक्रम शनिवारी (दि.२७) मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक म्हणून रायगडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत, प्रमुख पाहुण्या म्हणून शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील आणि प्रमुख वक्ते म्हणून राज्यशास्त्र अभ्यासक तथा ललित लेखक डॉ. अविनाश कोल्हे हे उपस्थित होते.

याप्रसंगी जेएसएमचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, उपाध्यक्ष डॉ. साक्षी पाटील, कार्यवाह गौरव पाटील, जनता शिक्षण मंडळाचे इतर पदाधिकारी, रायगड व अलिबाग बार असोसिएशनचे पदाधिकारी, ॲड. प्रविण ठाकूर, प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, माजी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रा. सुरेंद्र दातार आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आय.क्यू.ए.सी सम न्वयक प्राध्यापक नीलम म्हात्रे यांनी केले.

यावेळी प्रास्ताविक सादर करताना जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे शिक्षण आणि समाजकारणातील महत्त्व समजावून सांगितले. प्रमुख पाहुण्या चित्रलेखा पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांना भविष्यातील वाटचालीस प्रोत्साहन दिले. तसेच, त्यांनी कायदेशीर शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचे महत्त्व विषद केले. त्यानंतर प्रमुख उद्घाटक राजेंद्र सावंत यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन केले. कायद्याचा आणि संविधानाचा पाया हे महाविद्यालयात शिकवली जाणारी मूलभूत तत्व आहेत, असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'न्याय मंथन- अभिरूप न्यायालय' या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. तसेच, जेएसएमचे संचालक संजय पाटील यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या विकासासाठी आणि पुस्तक खरेदीसाठी १ लाख १ हजार रुपयांचा धनादेश देणगी स्वरूपात सुपूर्द केला.

प्रा. कोल्हे यांचे प्रेरणादायी व्याख्यान

या कार्यक्रमाच्या दुसऱ्या पर्वात 'भारतीय संविधानाची निर्मिती : ऐतिहासिक पार्श्वभूमी' या विषयावर प्रा.अविनाश कोल्हे यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आपल्या व्याख्यानात त्यांनी भारतीय संविधान हा केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे आणि लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब असल्याचे प्रतिपादन केले. प्रा. कोल्हे यांनी ब्रिटिशकालीन विविध कायदे आणि घटनांची सविस्तर मांडणी केली. तसेच, संसदीय वादविवाद हे कायदेनिर्मितीचा अभ्यास करताना कसे महत्वाचा ठरतात याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

खालापूर तालुक्यात महत्त्वाकांक्षी कार्यक्रम

। रसायनी । प्रतिनिधी ।

आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी केंद्र सरकारने 'धरती आबा जन जातीय ग्रामउत्कर्ष' अभियानांतर्गत आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम सुरू केला आहे. याबाबत खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत कलोते येथील आदिवासी वाडीत विविध खात्याच्या अधिकाऱ्यांनी जाऊन माहिती दिली.

खालापूर तालुक्यांमधील १० गावांमध्ये हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला जाणार आहे. यापैकी खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत कलोते अंतर्गत विनेगाव, दांडवाडी, बापदेववाडी, कातळाचीवाडी, कांढरोली तर्फे वनखळ या ठिकाणी महसूल मंडळ अधिकारी माणिक सानप, विस्तार अधिकारी विनोद चांदोरकर, महिला व बालकल्याण संघमित्रा अंधोरीकर, कनिष्ठ अभियंता पूनम म्हात्रे, विस्तार अधिकारी अमित म्हसकर, ग्राम पंचायत अधिकारी निलेश म्हसकर, कृषी अधिकारी नितीन महाडिक, प्रकल्प अधिकारी विशाल घोरपडे, ग्राम महसूल अधिकारी माधव कावरखे,कृषी सहायक सारंग व वन विभाग कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शिक्षक, ग्राम पंचायत सदस्य, पोलीस पाटील यांनी भेट देऊन कर्मयोगी उत्तरदायी शासन कार्यक्रमाला सुरुवात केली. यावेळी आदिवासी बांधव, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

निवडक

विविध विषयांचे पालिकेला निवेदन

कर्जत : माथेरानच्या विविध समस्या बाबत माथेरान शिंदे गटाचे चंद्रकांत चौधरी यांनी माथेरानचे प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे यांना निवेदन देऊन माथेरानमधील समस्या सोडविण्यास विनंती केली. याप्रसंगी त्यांच्या सोबत निखील शिंदे, गोरंग वाघेला, उन्मेष दाभेकर, यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की माथेरान शहरातील मालमत्ताधारांकराना करात सवलत तसेच त्यावरील शास्ती तसेच पावती झालेल्या चुका सुधारणे तसेच शहरातील स्टॉलधारकांचे नाव टान्सफर करणे शहरातील झालेल्या रस्त्याची दुरवस्था पहाता त्यावर तातडीने निर्णय घेणे, छत्रपती शिवाजीमहाराज रोडपर्यतचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी एमएमआरडीएकडे पाठ पुरवा करणे अशा विविध समस्या त्यांनी निवेदनाद्वारे मांडल्या आहेत.

विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तराचे वाटप

खरोशी : वावोशी गावचे थोर समाजसेवक नाना टिळक यांच्या पुण्यतिथीचे औचित साधून पेण एज्युकेशन सोसायटीच्या वावोशी येथील नाना टिळक प्राथमिक विद्यालयातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना सोबती संस्थेच्या वतीने शालेय गणवेश व दप्तराचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी सोबतीचे संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब नेने , शुभांगी नेने, मंगेश नेने, डॉ. नीता कदम अश्विनी शहासने, मयूर धारवे, पुनम भऊड, रिया वालम, भगवान शेटे, विश्वास टिळक, विजया दगडे, प्रितेश दोषी, धनश्री दोषी, अंकुश पाटील, के. आर. पाटील, गोविंद वालम, सुमित जाधव, अश्विनी गुरव आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी शाळेतील किचनशेडचे उद्घाटन मंगेश नेने यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्या घरत यांनी केले, तर सुत्रसंचलन मानसी केदारे यांनी तर आभार सुनील पवार यांनी केले.

लायन्स क्लबतर्फे नेत्र शस्त्रक्रिया

पाताळगंगा : मानवी शरिरात डोळ्यांना खूपच महत्व असून, आपण त्यांच्याशिवाय जग पाहु शकत नाही. मात्र, डोळ्यांना काही अपाय झाल्यांस यावरती शस्त्रक्रिया करणे खूप महत्वाचे असते. या बाबीचा विचार करुन लायन्स क्लब खालापूरने महाआरोग्य शिबीरांचे आयोजन वावोशी येथे घेण्यांत आले. यावेळी नेत्र तपासणीत काही रुग्णांस मोतीबिंदू झालेल्या निदर्शनास आल्यावर त्यांस नायर हॉस्पिटल पनवेल येथे रुग्णांच्या डोळ्यांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यांत आली.

वाहतूक शाखेतर्फे नाकाबंदी

पनवेल : पनवेल शहर पोलीस ठाणे व पनवेल वाहतुक शाखा यांची सयुंक्त नाकाबंदीत पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील पनवेल रेल्वे स्टेशनसमोरील मायाबार या ठिकाणी पनवेल पोलीस स्टेशन व पनवेल वाहतुक शाखेतर्फे नाकाबंदी लावण्यात आलेली होती. नाकाबंदीकरिता २ पोनि ३ अधिकारी व १५ अंमलदार हजर होते. नाकाबंदी दरम्यान १८७ वाहने चेक करण्यात आली आहेत. ७८ वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली तसेच ड्रंक आणि ड्राईव्हची कारवाई करण्यात आली.

पीक पाणी नोंदी करण्यात अडथळे

• कर्जत तालुक्यातील शेतकरी चिंताग्रस्त • किसान क्रांती संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात शेतकऱ्यांना पीक पाणी नोंदी ऑनलाईन पद्धतीने करण्याची सुरुवात करण्यात आली आहे. ग्रामीण भागात मोबाईल नेटवर्कमधील अडचणी यामुळे शेतकऱ्यांना पिकांची नोंदणी करण्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना नोंदी करण्यात येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन किसान क्रांती संघटनेने कर्जत तहसीलदारांना निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या नोंदी तलाठी आणि कृषी सहायक यांच्या माध्यमातून घालून देण्यासाठी मदत करण्याची मागणी केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या प्रगत शेतीविषयक धोरणामध्ये काही तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. शेतकरी आणि शासन यांच्यात थेट संपर्क व्हावा ह्या उद्देशाने सरकारने आधुनिक अशा संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर करत शेतीविषयी शेतकरी ओळख पत्रापासून तर शेतात उभ्या असलेल्या पिकांची विविध नोंदी करण्या बाबत संगणकाचा वापर करत आहेत. विविध ॲपची निर्मिती करत केवळ सदर ॲपच्या माध्यमातून नोंदी अनिवार्य केले असले तरी सर्वसामान्य शेतकऱ्यांपुढे एक बिकट अशी समस्या निर्माण झाली आहे.

सदर ॲपद्वारे पिकांच्या विविध नोंदी करत असताना काही तांत्रिक कारणांमुळे सदर ॲप नोंदी स्वीकारण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर शासनाने प्रतीत केलेल्या निर्धारित वेळेत नोंदी करण्यास अडचणी

नोंदी स्वीकारण्यास अडचणी

सर्वसामान्य शेतकऱ्यांपुढे एक बिकट अशी समस्या निर्माण झाली आहे. सदर ॲपद्वारे पिकांच्या विविध नोंदी करत असताना काही तांत्रिक कारणांमुळे सदर ॲप नोंदी स्वीकारण्यास अडचणी येत आहेत.

निर्माण झाल्या आहेत. हि स्थिती सर्वत्र दिसत असून तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांस शेतीविषयी मिळणाऱ्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे. परिणामी संपूर्ण तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेच आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतकऱ्यांची ही समस्या लक्षात घेऊन किसान क्रांती संघटनेकडून तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतात सध्या पीक शेतकऱ्यांना आपल्या पिकाच्या नोंदी करण्यात अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे शासनाने कृषी सहायक, ग्रामपंचायत अधिकारी आणि तलाठी यांच्या माध्यमातून या नोंदी घालण्यासाठी मदत करावी, अशी मागणी केली आहे. या आशयाचे निवेदन देण्यासाठी किसान क्रांती संघटनेचे तालुका भरत राणे, तालुका उपाध्यक्ष शरद तवले,तालुका सल्लागार साधुराम पाटील, तसेच अनेक शेतकरी उपस्थित होते. यावेळी जिल्हा संघटक रमेश जाधव यांनी तात्काळ अशेतकऱ्याच्या हिताच्या मागणीची अंमलबजावणी व्हावी अशी मागणी केली.

‘एसटी प्रशासनाने प्रलंबित प्रश्न सोडवावे’

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

एस.टी. महामंडळातील मागासवर्गीय कर्मचारी, निवृत्त कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्ना बाबत एसटी. प्रशासन उदासीन असून त्या बाबत प्रशासनाने प्रलंबीत प्रश्नांची सोडवणूक न केल्यास अशा हुकूमशाही प्रशासना विरूध्द आंदोलन छेडू असा इशारा पेण येथे झालेल्या रिपब्लीकन एसटी कर्मचारी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत सिताराम कांबळे यांनी आपल्या भाषणात मांडले.

बैठकीत एसटी. महामंडळात मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्ना बाबत, त्याच्या बढत्या, बदल्या, गोपनीय अहवाल, इतर बाबींची प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. तसेच महामंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना प्रलंबीत प्रश्नाबाबत निवेदन देण्याचे ठरले. त्याची परिपुर्तता न झाल्यास पुढील आंदोलन करण्याचे धोरण निश्चित केले जाईल असे ही ठरले. बैठकीत संघटनेचे उपाध्यक्ष जी. एम. पाटील यांनी सांगितले की, जे कर्मचारी निवृत्त झाले आहेत. त्यांना ७-८ वर्षे निवृत्तीचा काळ होऊन ही त्यांना पेन्शन सुरू नाही. तसेच ७५ वर्षे पुर्ण झालेल्या व मृत कर्मचाऱ्यांच्या विधवा पत्नीस पास देण्या बाबत रायगड विभागात अडवणुक केली जाते. निवृत्त कर्मचाऱ्यांना दोन वर्षे होऊन ही त्यांच्या हक्काचा पगार दिला जात नाही. रोजंदार काळातील उपदानाची रक्कम दिली. जात नाही. कर्मचाऱ्यांची थकीत देणी वेळेवर न दिल्यास त्यावर ८ टक्के दराने प्रशासनाने देणी द्यावी, अशी मागणी बैठकीत करण्यात आली.

कायद्याविषयी व्याख्यान

उरण : यु. ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ण्ड टेक्नॉलॉजीच्या महिला विकास कक्षेतर्फे महिला कायदयासंबंधित व्याख्यान शनिवार (दि.२७) रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास ॲड. अपूर्वा ठाकूर, डॉ. मिनाक्षी गुप्ता, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच प्राध्यापकवर्ग आणि विदयार्थी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी विदयार्थ्यांना केलेल्या अमुल्य अशा मार्गदर्शनाबद्दल सिनीयर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या ह्यांनीही त्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, स्वागत, आभार प्रदर्शन वर्षा वीर ह्यांनी केले.

अनिकेत नाईकला देवाज्ञा

| चौल | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथील अनिकेत सुनील नाईक याचे गंभीर आजाराने शनिवारी (दि.२७) सप्टेंबर रोजी पहाटे चार वाजताच्या सुमारास निधन झाले. निधनसमयी तो २३ वर्षांचा होता. त्याच्या निधनाचे वृत्त समजताच सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अनिकेत हा आईवडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या निधनाने नाईक कुटुंबियांवर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

अनिकेत मागील पाच महिन्यांपासून आजारीच होता. त्याच्यावर पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यानंतर महिनाभरापूर्वीच त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. तेव्हापासून त्याच्यावर घरीच औषधोपचार सुरू होते. त्यामुळे हळूहळू त्याच्या प्रकृतीतदेखील सुधारणा होत होती. परंतु, नियतीच्या मनात काही वेगळेच होते. शनिवारी मध्यरात्रीपासून त्याची प्रकृती बिघडल्याने पहाटे चारच्या सुमारास त्याची प्राणज्योत मालवली. त्याच्या पश्चात आईवडील, दोन विवाहित बहिणी असा परिवार आहे. त्याच्या पार्थिवावर चौलमळा येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

एसटी विभागाची कार्यकारिणी जाहीर

| बेणसे-पाली | प्रतिनिधी |

रायगड विभागाची नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. त्यात अध्यक्ष म्हणून ॲड. प्रमोद कांबळे, सचिव अंजुम काझमी, पेण, तर उपाध्यक्ष म्हणून जी. एन. पाटील, पेण, बशिर भुरे, रोहा तर सलाम पोत्रिक, गणेश अडसुळे, सुनिल सोनावळे, विनोद हाटे, एस. बी. पवार, मनोहर पवार, श्रीमती. एस.ए. गमरे यांची विभागीय कार्यकारिणीवर निवड करण्यात आली. यावेळी अनेक मान्यवर अपस्थित होते.

केळंबा देवीच्या दर्शनाला गर्दी

| खरोशी | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील खरोशी येथील केळंबा देवीचा नवरात्र उत्सव सुरू असून, या माऊलीच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविकांनी दर्शन घेतला असून शनिवार (दि. २७) रोजी भाविकांची गर्दी पहावयास मिळाली.

पेण पनवेल उरण कर्जत खालापूर कल्याण डोंबिवली जव्हार भिवंडी ठाणे अहिल्यानगर पुणे मुंबई ठाणे यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक रोजच्या रोज माउलीच्या दर्शनासाठी येत असल्याने गर्दीच गर्दी पहावयास मिळत आहे. दर्शनासाठी आलेल्या प्रत्येक भाविकाला व्यवस्थित दर्शन घेता यावे यासाठी सर्व गावकऱ्यांनी उत्तम व्यवस्था केली होती.

जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेत निवड

| खोपोली | प्रतिनिधी |

चिन्मय मिशन यांच्यामाध्यमातून गीता संस्कृत पाठांतर स्पर्धेचे आयोजन सर्व शाळांमध्ये करण्यात आले होते. खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या जनता विद्यालय पूर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामधील केंद्रस्तरीय स्पर्धेत चार तर राज्यस्तरीय स्पर्धेत दोन विद्यार्थ्यांची पुणे येथे निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धेसाठी संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, अबूबकर जळगावकर, किशोर पाटील आणि संचालकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

केंद्रस्तरीय पाठांतर स्पर्धा २८ ऑगस्ट २०२५ रोजी झाली. या स्पर्धेत मोठा गट सानवी देशमुख, जाई शिंदे, जाई, शार्विन गायकवाड, अनन्या धर्माधिकारी, कीर्तीका जाधव, भूमिका सावंत, शरण्या भला यापैकी चार विद्यार्थी केंद्रस्तरीय अनन्या धर्माधिकारी, सानवी देशमुख, ओम शिंदे, कीर्तीका जाधव यांची पुणे येथील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अजयकुमारांनी साधला पत्रकारांशी संवाद

पनवेल : वाढत्या गुन्हेगारी आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पत्रकारांनी नवी मुंबई पोलीससह आयुक्त दीपक साकोरे यांच्याशी संवाद साधला. यावेळी विजय कडू, संजय कदम, केवल महाडिक, रवींद्र गायकवाड, राज भंडारी, विशाल रावसाहेब सावंत, अनिल कुरघोडे, अनिल राय, शंकर वायदंडे, संतोष वाव्हळ, सुनील वारगडा, भरतकुमार कांबळे, सुनील पाटील, शैलेश चव्हाण, साबीर शेख, दिपाली पारसकर, सनीप कलोते, गौरव जहागीरदार, चंद्रकांत शिर्के, असीम शेख, अण्णासाहेब आहेर, सुभाष वाघपंजे, सुधीर पाटील, आदी पत्रकार उपस्थित होते.

उलव्यात फार्मासिस्ट डे दिवस साजरा

| पनवेल | प्रतिनिधी |

आप्पासाहेब शिंदे यांच्या संकल्पनेतून अध्यक्ष अतुल अहीरे यांच्या नेतृत्वाखाली आणि रायगड जिल्हा केमिस्ट आणि डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशनचे अध्यक्ष लीलाधर पाटील तसेच सचिव प्रवीण नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली केमिस्ट असोसिएशन उलवेने फार्मासिस्ट दिन उत्कृष्ट दर्जाच्या स्वरूपात पार पाडला. या कार्यक्रमाला अमर म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी फार्मासिस्ट डे या कार्यक्रमाचे आयोजन अतिशय उत्तम प्रकारे करण्यात आले. यावेळी केमिस्ट असोसिएशनच्या कायदेशीर सल्लागार ॲड. प्रतिभा पाटील आणि अपोलो रुग्णालयाचे नागेंद्र यादव यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी फार्मासिस्ट दिन सोहळ्याची शान द्विगुणित केली. दरम्यान औषध क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सत्कार तसेच फार्मासिस्टच्या व्यावसायिक ॲक्टिव्हिटी सोबत त्यांच्या कलागुणांना विशेष वाव देण्याकरिता त्यांना गौरविण्यात आल्याने या कार्यक्रमाचे हे विशेष आकर्षण ठरले. सन्मान पुरस्कार समारंभ आयोजित केल्यामुळे कार्यक्रमाला एक नवी उभारी प्राप्त झाली.

सदर कार्यक्रमाचे नियोजन केमिस्ट असोसिएशनचे शनी मिश्रा, किरण जाधव, प्रियांका पवार, चांदणी शेख, आशा चव्हाण यांनी केले होते.

पोलादपुरात ‘रिव्हर राफ्टींग’ सुरू

| पोलादपूर | प्रतिनिधी |

जागतिक पर्यटन दिनानिमित्त पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे येथील धरणालगतच्या पुलालगत नरवीर ॲडव्हेंचर्स अँड स्पोर्ट्सचे उद्योजक रामदास कळंबे यांच्या रिव्हर राफ्टींगच्या या साहसी खेळाचा शुभारंभ विकास गोगावले यांच्या हस्ते चंद्रकांत कळंबे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार कपिल घोरपडे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, शिल्पा दरेकर, सिध्देश शेठ, दत्ता मोरे, सुरेश पवार, शैलेश उतेकर, हरिश सानप आणि सहकारी तसेच पोलादपूरचे नरवीर ॲडव्हेंचर्सचे सदस्य तरूण उपस्थित होते.

याप्रसंगी घागरकोंडच्या झुलत्या पुलापासून पोलादपूर तालुक्यातील कोणते पर्यटनस्थळ विकसित करून तरूणांसाठी रोजगारनिर्मिती करण्याची भूमिका पुढे आली. त्याकामी अवश्य सहकार्य करू, अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी तहसीलदार घोरपडे तसेच सर्व उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद साने यांनी केले.

नवरात्रोत्सवानिमित्त आई महालक्ष्मीचा जागर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

बागमळा येथे आज डबलबारी भजने

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील बागमळा येथील महालक्ष्मी मंदिरामध्ये नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत. त्यानिमित्त महालक्ष्मी मंदिरात उद्या रविवारी (दि. २८) सप्टेंबर रोजी डबलबारी भजनांच्या जंगी सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दुपारी दोन वाजता होणार असल्याची माहिती आयोजक अनंत घरत यांनी दिली.

मुरुड तालुक्यातील जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ खारीकपाडा व अलिबाग तालुक्यातील स्वरानंद प्रासादिक

भजन मंडळांमध्ये भजनाचे जंगी सामने होणार आहेत. जय हनुमान प्रासादिक भजन मंडळाचे बुवा अजय दामोदर राऊत (गुरुवर्य शंकर राऊत, गुरुवर्य कृष्णा देशमुख यांचे शिष्य), पखवाज वादनकार सागर राऊत, तबलावादक केशव राऊत, तर स्वरानंद भजन मंडळाचे बुवा मनोहर रमेश भोईलकर यांना मृदुंगमणी म्हणून सुयोग खंडागळे, विजय शिंदे साथ संगत करणारत आहे. मंडळाचे सुरेश टोपले हे अध्यक्ष म्हणून काम पाहात आहेत.

बागमळा येथील महालक्ष्मी मंदिर एक जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. नवरात्र, मार्गशीर्ष महिन्यासह इतर दिवशीही देवीच्या दर्शनासाठी भाविकांची कायम गर्दी दिसून येते. भाविकांची या देवीवर अपार श्रद्धा असल्याने संपूर्ण महाराष्ट्रभरातून भाविक दर्शनासाठी येत असतात. नवरात्रोत्सवात तर नऊ दिवस धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कालावधीत खाद्यपदार्थांपासून हार-फुले, तसेच खेळण्यांची दुकानेही थाटली जातात. यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरुप प्राप्त होते.

हाकेला धावणारी आणि नवसाला पावणाऱ्या अशा आई महालक्ष्मीवर चौलमळा गावचे माजी पोलीस पाटील अनंत घरत यांची अपार श्रद्धा असून, ते देवीचे परमभक्त आहेत. दरवर्षी नवरात्रोत्सवात ते सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन देवीचा जागर करीत असतात. आतापर्यंत अलिबाग तालुक्यातील विविध भजन मंडळांना याठिकाणी भजन करण्याची संधी अनंत घरत यांच्या माध्यमातून देण्यात आली आहे. याशिवाय शक्ती-तुरा नाचाचे सामनेही याठिकाणी पार पडले आहेत. यंदा देवीच्या मंदिरात रविवारी भजनांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. भजनप्रेमींना भजनांचा आनंद घ्यावा, असे आवाहन अनंत घरत यांनी केले आहे. हा कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी अमोल घरत यांच्यासह चौलमळा व बागमळा ग्रामस्थांकडून जोरदार तयारी सुरू आहे.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सर्वप्रकारचे आजार, लठ्ठपणा, संतानप्राप्ती, व्यसनमुक्ती, विवाह/सोनेतारण बिनव्याजी/लाखस दर महा ५०००/- घरबसल्या पिढ्यांपिढ्या लाखो कमविण्याची डॉ.नथुराम शिहू (नागोठणा-पोयनाड)रायगड ७५०७१६६०१५
- अलिबागमधील आर्किटेक्ट ऑफिसकरीता ऑटोकेड ड्राफ्टसमन ३d डेवलपर, इंटीरियर डिझाइनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- श्री सिद्धीविनायकज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरीधंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण, अलिबाग फोन नं. ९९६०४५६९८६
- १५०० स्क्वेअर फुट शेड भाड्याने देणे आहे. पत्ता चोंढी-बामणसुरे, मो.९९२२१६०२७७.
- पिंपळभाट अलिबाग येथे मेडीकल एजन्सीजमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत. शैक्षणिक पात्रता, दहावी व दहावीच्या पुढे तसेच मालाच्या डिव्हीवरीसाठी ड्रायव्हर पाहिजे. Contat No. ९५०३३५५८८६, ८६९८१३४६८९
- रिसॉर्टमध्ये कामासाठी हाऊसकिपर, वेटर, कॅप्टन आणि ऑलराऊंडर कुक इत्यादी माणसे पाहिजेत. मो.९९२१९७८०८०
- अलिबागमध्ये समर्थ मठ, पिंपळभाट ,गोंधळपाडा, रेवस बायपास परिसरामध्ये २BHK प्रशस्त रूम असलेला, २ टॉयलेट असलेला, पार्कंग असलेला, रेडीपोझिशन फ्लॅट त्वरीत विकत घेणे आहे. फ्लॅट दहा वर्षापेक्षा जास्त जूना नको. फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर किंवा टॉप फ्लोअर नको मो. ७७५८९७५४०७
- १५०० स्क्वे. फुटाची व्यावसायिक जागा भाड्याने देणे आहे. (दवाखाना, ऑफिस, बँक यांना प्राधान्य) संपर्क : ९२८४५५५३७४, संपर्काची वेळ : दुपारी ४ ते रात्री ९
- आसावरी सोसायटी वन BHK ब्लॉक विकणे आहे. फुल फर्निचर समुद्रपासून पाच मिनिटावर अलिबाग मार्केट शेड मो. ८८०५५४०४६४
- आमच्या मालकीचे दोन मजली इमारतीमधील पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरचे रूम आणि खालील तळमजल्यावरचे दुकान गाळे भाड्याने द्यायचे आहेत, ईच्छुकांनी संपर्क साधावा. मो. ८६९८२३१५६७ गुरव मॅडम.
- विज्ञान विषय शिक्षक पाहिजेत. आपण इयत्ता आठवी नववीचे सायन्स शिकवू शकता का? उत्तर होय असल्यास त्वरीत आपला अर्ज सादर करा. shikshaknokri@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ सप्टेंबर

१) श्री. प्रदीप कृष्ण पाटील
विद्यानगर, २८-९-१९४७

बोधकथा
पंढरपूरमधील सत्य घटना

पंढरपूरमध्ये एक ब्राह्मण कुटुंब राहत होते. त्यांना मूलबाळ नव्हते. ते गृहस्थ वेद विद्यामध्ये पंडित होते. देवाचे अनन्य भक्तदेखील होते. त्यांनी आयुष्यात कोणाकडे कधी हात पसरला नाही. आपले आयुष्य त्याने नियमबद्ध केले होते. ते अत्यंत गरीब होते. त्यांना कसलाही हव्यास नव्हता. गरीबीतदेखील ते संतुष्ट होते. त्यांनी आपला सर्व भार देवावर टाकला होता. अध्यापन हे ब्राह्मणांचे एक पवित्र कर्म त्यांच्याकडे आलेल्या विद्यार्थ्यांना ते शिकवीत असत. विद्यार्थ्यांकडून स्वखुशीने जे मिळेल त्याच्यावर ते आपला उदरनिर्वाह चालवीत असत. आपल्या पतीचे आयुष्य पत्नीला काही आवडत नव्हते. ती नेहमी त्यांना पैशासाठी उद्योग करायचा उद्देश करीत असे. पत्नीच्या उपदेशाचा त्या हरिभक्तवर काही परिणाम होत नसे. ते आपल्या पत्नीला नेहमी म्हणायचे, तू भिऊ नकोस. आपल्याला देव कधीही कमी पडू देणार नाही. ते गृहस्थ साठ वर्षाचे होते. एक दिवस त्यांच्यावर खूप कठीण प्रसंग आला. घरात जेवण शिजवण्यासाठी काही शिल्लक नव्हते. नित्याप्रमाणे ते मुलांना शिकवू न आपल्या घरी आले. विद्यार्थी आपापल्या घरी गेले. त्यांची बायको त्यांना रागाने म्हणाली. आज घरी शिजवायला काही शिल्लक नाही. आता तुमचा देव कुठे गेला? त्याला जरा हाक मारा. तो कदाचित विसरला असेल. त्या हरीभक्ताने पुन्हा आपल्या पत्नीला विचारले. खरंच घरात काही शिल्लक नाही का? त्यांची पत्नी त्याला म्हणाली. मी उगीच खोटे कशाला सांगू! एवढा मोठा देव बसला आहे द्यायला. त्या हरीभक्ताचे डोके गरगरायला लागले. त्यांची मती सुन्न झाली. संपूर्ण जन्म ज्या निष्ठेवर मी जगलो. तो केवळ एक भ्रम होता का? त्यांनी स्वतःलाच विचारले, आपल्या पायाखालची जमीन सरकते आहे, असे त्यांना वाटले. देव तुझी परीक्षा घेत आहे, असे मनात कोणीतरी कुजबुजले. त्यांचे मन आता बंड करून उठले. कोण कोणाची परीक्षा घेत आहे? पत्नीचे व्यवहार ज्ञानच माझ्या अनन्य निष्टेपेक्षा श्रेष्ठ ठरावे. यात परीक्षा कोणाची झाली? जन्मभर ज्याच्या भरवशावर काढला त्याने दगा दिला होता. देवच आज नापास झाला होता. देवाने गीतेमध्ये दिलेले अभिवचन खोटे ठरले होते. योगक्षेमं वहाम्यहमू आणि भगवद्गीतेच्या या शब्दावर त्याने तांबड्या शाईने काट मारली. आज देवाचे वचन अर्थहीन झाले. या हरिभक्तांने आयुष्यभर कठोर व्रताचरण केले होते. त्यांचा स्वभाव आज उफाळून आला. ते काहीच बोलले नाही. ते आपल्या पत्नीला म्हणाले, मी बाजारात जाऊन धान्य घेऊन येतो. बाजारातील सर्व लोकांना हरीभक्ताबद्दल अतीव आदर होता. दुकानात चढले की त्यांचे आदराने स्वागत होई. परंतु, कुठेही मला धान्य हवे आहे, असे ते म्हणाले नाही. पाच सहा दुकानात जाऊनदेखील हे गृहस्थ रिकाम्या हाताने घरी परतले. आपले पती अंगणात दिसताच त्यांची पत्नी त्यांना म्हणाली, साठी बुद्धी नाठी. असे झाले आहे तरी काय? त्या गृहस्थाने आपल्या पत्नीला विचारले, विद्यार्थ्यांना शिक्षा करायची काय ही पद्धत आहे? हद्द झाली तुमच्यापुढे, त्यांची पत्नी म्हणाली. कोणता शिष्य? काय शिक्षा केली? हे काय बोलतोय तू? अहो, आत्ताच तुमचा विद्यार्थी घेऊन गेला. डाळ, तांदूळ, तिखट, मीठ, तेल इत्यादी सर्व साहित्य कोणी आणून ठेवले आहे, त्याच्या जिभेतून रक्त येत होते. तो म्हणाला, मी खोटे बोलतो म्हणून गुरुजींनी माझी जीभ तोडली. गुरुजींना सांगा की मी कधीच खोटे बोलत नाही.

एसटीचे वेळापत्रक कोलमडले

• ढिसाळ नियोजनामुळे प्रवाशांचे हाल

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

एसटीच्या जुन्या आणि दहा लाख किमी पूर्ण झालेल्या गाड्या मोठ्या प्रमाणात भंगारात काढण्यात आल्या आहेत. यामध्ये शहरी बस वाहतूक करणाऱ्या गाड्यांचा जास्त समावेश आहे. याचा एसटी फेऱ्यांवर मोठा परिणाम झाला असून, वारंवार फेऱ्या रद्द होत आहेत. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेषतः शाळकरी मुलांचे यामुळे हाल होत आहेत. एसटीच्या या ढिसाळ नियोजनामुळे रत्नागिरी एसटी महामंडळाचा कारभार पूर्णपणे विस्कळीत झाला आहे.

जिल्ह्यातील एसटीच्या अनेक बसफेऱ्या अचानक रद्द होत असल्यामुळे प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. प्रवाशांना कोणतीही पूर्वसूचना दिली जात नाही. त्यामुळे तासनतास बसस्थानकावर थांबून राहिल्यानंतर बस रद्द झाल्याचे समजते. यामुळे प्रवाशांमध्ये एसटी महामंडळाच्या कारभाराबद्दल संतापाची लाट आहे. सर्वांत जास्त गैरसोय शाळकरी विद्यार्थ्यांची होत आहे. शाळेच्या वेळेतील अनेक महत्त्वाच्या फेऱ्या अचानक रद्द केल्या जात आहेत.

बसफेऱ्या रद्द होण्यामागचे कारण विचारले असता बसगाड्या कमी असल्यामुळे फेऱ्या रद्द कराव्या लागत आहेत, असे अधिकारी सांगत आहेत. अनेक जुन्या गाड्या त्यांचे वयोमर्यादा संपल्याने भंगारात काढण्यात आल्या आहेत किंवा दुरुस्तीअभावी डेपोत उभ्या आहेत. यामुळे आवश्यक तेवढ्या गाड्या उपलब्ध होत नसल्याने एसटीचचे दैनंदिन वेळापत्रक पुरते कोलमडले आहे.

वेळ, पैसा दोन्ही वाया

सकाळी शाळेत जाण्यासाठी किंवा सायंकाळी शाळेतून घरी परतण्यासाठी विद्यार्थ्यांना बस मिळत नाही. रत्नागिरी शहरातील शाळांमधून ग्रामीण भागात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची सायंकाळच्या वेळेत मोठी परवड होते. वेळेवर बस उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना पायी जावे लागते किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहे.

स्मार्ट बसस्थानक, गोंधळाचे केंद्र

एकीकडे रत्नागिरी बसस्थानकाला स्मार्ट बसस्थानकाचे स्वरूप देण्यात आले आहे. तर दुसरीकडे येथील बसफेऱ्यांचा कारभार मात्र गोंधळलेला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी बनवलेले हे स्थानक आता गोंधळाचे केंद्र बनले आहे. एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देऊन भंगारात काढलेल्या गाड्यांच्या जागी नवीन गाड्या तातडीने उपलब्ध कराव्यात आणि प्रवाशांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी प्रवासी आणि पालकवर्गाकडून केली जात आहे.

अभ्यासाबरोबरच कलागुण विकसित करा

कोलटकर महाराजांचे विद्यार्थ्यांना आवाहन

। खांब । प्रतिनिधी ।

शालेय जीवनात विविध प्रकारच्या अभ्यासक्रमांचे शिक्षण घेत असताना अभ्यासाबरोबरच कलागुण विकसित करा, असे आवाहन हभप रायगड भूषण डॉ. मारूती महाराज कोलाटकर यांनी विद्यार्थ्यांना केले.

रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे शारदोत्सव कार्यक्रमात आपल्या प्रवचनरूपी सेवेप्रसंगी विद्यार्थी वर्गाला संबोधित करताना ते बोलत होते. तर पुढे त्यांनी आपल्या आई-वडीलांचे नाव उज्वल करण्यासाठी व आपल्या उज्वल भविष्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नसून अधिकाधिक शिक्षण घेऊन आपले स्वतःचे करिअर घडवायचे आहे. तसेच शिक्षणात अध्यात्मिक शक्तीला अधिक जोड दिली तर शिक्षण सहजसुलभ होईल, असेही त्यांनी सांगितले.

चिपळूण येथे स्वच्छता मोहीम

। चिपळूण । प्रतिनिधी ।

स्वच्छता ही सेवा २०२५ मोहीम अंतर्गत गुरुवारी (दि.२५) सकाळी ८ ते ९ या वेळेत 'एक दिवस, एक तास, एक साथ' या थीम अंतर्गत स्वामी मठ रोड ते रामेश्वर मंदिर परिसर, चिपळूण येथे स्वच्छता मोहीम घेण्यात आली.

चिपळूण नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी विशाल भोसले, प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढामकर, कार्यालय अधीक्षक रोहित खाडे यांच्या मार्गदर्शनखाली, आरोग्य निरीक्षक सुजित जाधव, आरोग्य विभाग प्रमुख वैभव निवाते यांच्या आयोजनानुसार तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये ही मोहीम पार पडली. या उपक्रमाकरीता महात्मा गांधी प्रतिष्ठान सदस्य, ॲक्टिव्ह ग्रुप सदस्य, डी.बी.जे कॉलेज विद्यार्थी, आनंदराव पवार महाविद्यालय, युनायटेड इंग्लिश स्कुल, महाराष्ट्र हायस्कुलचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक, क्रीडा साहित्य वाटप

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दर्यागाव येथे स्मार्ट स्ट्रीम फन-की-फेम्स मुंबई या कंपनीतील फन की फेम्स विभागातील कर्मचाऱ्यांच्या वतीने विद्यार्थ्यांना नुकतेच शैक्षणिक व क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले. या शैक्षणिक साहित्यात उत्तम प्रतीचे दप्तर, पाणी बॉटल, कंपास पेटी, सर्व प्रकारच्या वह्या, पेपर पॅड, क्ले, रंगाचे साहित्य, पेन्सिल बॉक्स, टिफिन बॉक्स, की चैन व खाऊ दिले. शाळेसाठी क्रिकेट बॅट, बॅटमेंटेन सेट, फुटबॉल, हॉलिबॉल, दोर उडी यांचा समावेश आहे. सागर धारणकर, महेश मुरकर, रविकांत घाणेकर, विठ्ठल शिंदे, मिलिंद वाडकर, तन्मय सावंत, मोहक लोहिया, मयुरी सावंत अक्षरा पालशेतकर, जयश विशवकर्मा या कर्मचाऱ्यांच्या मदतीने हे साहित्य उपलब्ध झाले. तर मंगेश बरगे यांच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांना मिळाले.

गटसाधन केंद्राच्या इमारतीला झुडपांचा विळखा

गळक्या छपरामुळे पाणीच पाणी

। चिपळूण । प्रतिनिधी ।

शैक्षणिक विकासाला चालना देणाऱ्या गट साधन केंद्राची इमारत स्वच्छतेअभावी झाडीझुडपाच्या विळख्यात सापडली आहे. विशेष म्हणजे गावोगावी स्वच्छतेचे धडे देणाऱ्या पंचायत समितीत हा प्रकार घडत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. इतकेच नव्हे तर खुद्द पंचायत समितीच्या इमारतीवर उगवलेल्या वेली पसरु लागल्या आहेत. हा सर्व प्रकार लक्षात घेता स्वच्छतेविषयी पंचायत समिती कार्यालयातील प्रशासन कुचकामी असल्याचे स्पष्ट होत आहे.

गट साधन केंद्र हे शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेले एक कार्यालय आहे. त्यातून शालेय विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या योजनांची अंमलबजावणी केली जाते. या शिवाय स्थानिक शैक्षणिक विकासाला चालना देण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम, प्रशिक्षण, साहित्य वाटप आदीची अंमलबजावणी केली जाते. असे असताना पंचायत समिती कार्यालयात या केंद्राची स्वतंत्र असणारी इमारत अनेक वर्षापासून स्वच्छतेअभावी झाडीझुडपाच्या विळख्यात सापडली आहे. इमारतीसह आजूबाजूला आवारात पूर्णपणे झाडी वाढली आहे. त्यामुळे सरपटणारे प्राणी लक्षात घेता कर्मचारी भितीच्या छायेत या इमारतीत वावरत असतात. इमारतीचे छप्परदेखील गळके असल्याने पाऊस सुरु होताच सर्वत्र पाणीच पाणी होत असल्याचे चित्र आहे. शिवाय मुख्य दरवाजाही पूर्णत: तुटलेल्या स्थितीत आहे.

विशेष म्हणजे गावोगावी स्वच्छतेचे घडे देणाऱ्या चिपळूण पंचायत समितीत हा प्रकार घडत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. पंचायत समिती इमारतीवरच उगवली झुडपे दरम्यान, स्वच्छते विषयी गांभार्य नसलेल्या चिपळूण पंचायत समितीच्या इमातीवरच झुडपे उगवली असून वेली सर्वत्र पसरू लागल्या आहेत.

विशेष म्हणजे हा प्रकार अधिकाऱ्याच्या निदर्शनास येत असतानाही त्यांच्याकडून जाणूनबुजून डोळेझाक केली जात आहे. स्वच्छतेचे धडे देणाऱ्या पंचायत समितीतच हा प्रकार घडत असल्याने नागरीकांमधून संताप व्यक्त होत आहे.

साप्ताहिक राशिभविष्य २८ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

निराश होऊ नका

मेष : हा सप्ताह मेष राशीधारकांना कटकटी निर्माण करणारा ठरू शकतो. कामाचा ताण, स्वरूप बदलणार आहे. मात्र, त्याकडे संधी म्हणून पाहिलेत तर योग्यवेळी त्याचे पडसाद आपल्याला मिळणार आहेत. पैसे मिळवण्यात अडचणी येतील. त्यामुळे निराश होऊ नका. थोडा संयम या कालावधीत गरजेचा आहे. हळूहळू वातावरण सुधारत जाईल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींची काळजी घेण्याची गरज आहे. त्यांच्या नियमित औषध उपचाराकडे दुर्लक्ष करू नका. या राशीच्या व्यक्तींनी आपला प्रवास सावधानपूर्वक करावा. प्रवासाला निघताना नियोजन करणे आवश्यक आहे. वाहन चालवणाऱ्यांनी वाहनाच्या वेगाबाबत पूर्ण सावधानता पाळावी. आपली महत्त्वाची कागदपत्रे गहाळ होणार नाहीत, याची काळजी घ्या. व्यापारीवर्गाने जास्त गुंतवणूक करण्याच्या भानगडीत पडू नका. घरात आपण शांत राहणे योग्य होईल. नाहीतर कारण नसताना वातावरण बिघडून त्याचा परिणाम आरोग्यावर होऊ शकतो. **महिलांना-** महिला वर्गाचा हा कालावधी सणसमारंभात व्यस्त होणार आहे. घरात नवीन वस्तूची खरेदी करताना लक्षपूर्वक करा, फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या. **शुभ दिनांक-** २९,३०.

अतिविचार करू नका

वृषभ : हा सप्ताह वृषभराशीसाठी अडचणीचा ठरू शकतो. त्यामुळे प्रत्येक पाऊल सावधानपूर्वक उचलण्याची गरज आहे. ताक देखील फुंकून पिण्याचा कालावधी आहे. कोणत्याही गोष्टीत घाई करू नका, तसेच गरज नसणाऱ्या गोष्टीचा अतिविचार करू नका. आपले विरोधक आपल्यावर कुरघोडी करू शकतात. कामावर थोडा तणाव अनुभवाल. आर्थिक अडचण दूर करण्यासाठी बुधवारी मौन पाळणे फायद्याचे ठरेल. कोणतेही महत्वाचे काम योग्य सल्ल्याशिवाय करू नका. थोडे थांबा. वाट पाहा मार्ग मिळेल. राजकारणी व्यक्तींनी या कालावधीत सावध राहावे. आपल्यावर आरोप होऊ शकतात. आपल्या मनमोकळ्या स्वभावाला थोडा मुरड घालण्याचे मानसिक पथ्य आपल्याला यावेळी फायदा देणारे ठरू शकते. आपल्याकडे असलेल्या दूरदृष्टीचा योग्य उपयोग करून घ्या. व्यसनापासून जितके दूर राहाता येईल तितके दूर राहणे आवश्यक आहे. आता जे श्रम कराल त्याचा फायदा नंतर आपल्याला होणार आहे. **महिलांना-** महिलावर्गाने या कालावधीत शाकाहारी होणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. घरात एखादी गोड बातमी मिळण्याचा संभव आहे. सकाळी मुंग्यांना थोडी साखर घालावी. **शुभदिनांक-** ०२,०३.

आनंदी वातावरण राहील

मिथुन : हा सप्ताह मिथुनराशीसाठी अडचणी दूर करणारा असेल. जी कामे अडकली असतील तिला चालना देण्यास हरकत नाही ती योग्य मार्गाने होऊ शकतात. जमिनीच्या व्यवहारात काम करणाऱ्या व्यक्तींना फायदा संभवतो. आपण भावनेच्या भरात वाहत जाणाऱ्या स्वभावावर नियंत्रण मिळवू शकलात तर कोणतेही कठीण काम या सप्ताहात पूर्ण करू शकाल. शत्रूने आपल्याला त्रास देण्याचा प्रयत्न केला तरी या कालावधीत आपल्या हितचिंतकामुळे आपल्याला साह्य मिळणार आहे. त्यामुळे या गोष्टी मनावर घेत बसू नका. नकारात्मक विचारांपासून दूर राहणे आपल्या हिताचे आहे. घरातील कामासाठी थोडा अधिक वेळ देणे आपल्यासाठी चांगले ठरेल. आपल्याला कार्यात यश मिळण्याचा मार्गमोकळा असल्यामुळे नव्या कार्याला सुरवात करण्यास हरकत नाही. कामामधून आपल्या कार्याला वाव देणाऱ्या घटना घडणार आहेत अशावेळी पाठ फिरवू नका. सभोवताली आनंदी वातावरण राहील. प्रवासाचा बेत सध्या टाळा. **महिलांना-** कोणाचेही बोलणे मनाला लाऊन घेऊ नका त्यात आपली शक्ती वाया जाते हे लक्षात ठेवा. आपल्या कामात गुंतून राहा. **शुभदिनांक-** ३०,०३.

वादविवादापासून लांब राहा

कर्क : हा सप्ताह कर्कराशीसाठी धनाचा मार्ग मोकळा करणारी असली तरी खर्चावर नियंत्रण ठेवण्याची गरज निर्माण होणार आहे. आता केलेली बचतच पुढे उपयोगी पडू शकते. त्याबरोबर हा कालावधी थोड गंभीरतेने घेण्याचा सुद्धा आहे. कोणतीही गोष्ट हलक्याफुलक्या रीतीने घेऊ नका. दुसऱ्यांच्या कामाकडे यावेळी लक्ष न देता स्वःताच्या कामाकडे लक्ष देण हे आपल्याला हितकारक आहे. उगाचच दुसऱ्याच्या भानगडीत नाक घुसवून आपण अडचणीत येऊ नका. आपले दुःख कोणाला न सांगता मनात दाबून ठेवणे हे तब्येतीच्या दृष्टीने त्रासदायक ठरू शकते. नोकरदारवर्गाला मनाजोगत्या बदलीसाठी वरिष्ठांना बोलण्यास हरकत नाही. मात्र कामावर वादविवादापासून लांब राहणे चांगले होईल. व्यापारी वर्गाने एखाद्या नवीन व्यवहारात भाग घेण्यास हरकत नाही. साठवणुकीच्या भानगडीत मात्र पडू नये. **महिलांना-** महिलावर्गाने आपण भले आपले काम भले असे धोरण ठेवणे फायद्याचे राहील. नवीन कपडे, दागिने याची खरेदी संभवते. **शुभदिनांक-** २९,०२.

योग्य काळजी घ्या

सिंह : हा सप्ताह सिंहराशीसाठी सावधानता बाळगणारा असणार आहे. कोणत्याही वादविवादापासून लांब राहा. विशेषतः तरुणांनी या कालावधीत मोबाईल, इंटरनेट ही गोष्ट पूर्ण सावधानतेनेच वापराव्यात ज्यांना शक्य असेल त्यांनी यापासून लांब राहणे चांगले ठरेल. कोणताही पैशाचा व्यवहार करताना लक्षपूर्वक करावा. महत्वाची कागदपत्रे कितीही जवळची व्यक्ती असली तरी पूर्ण वाचूनच त्यावर सही करावी. अनोळखी व्यक्तीशी व्यवहार टाळणे योग्य होऊ शकते पण त्यात ही व्यवहार आवश्यक असेल तर तो हा कालावधी संपल्यानंतर करणे उत्तम राहील. नोकरदार व्यावसायिकांनी सध्या कोणताही मोठा बदल करू नका, लवकरच परिस्थितीत सामान्य होणार आहे थोडा संयम गरजेचा राहील. मानसिक आरोग्य हीच शारीरिक आरोग्याची गुरुकिल्ली आहे हे विसरू नका. साहित्यक्षेत्रातील व्यक्तींना मानसन्मान मिळण्याची संधी आहे त्यांनी प्रयत्न करण्यास हरकत नाही. कुंडलीत राजयोग असेल तर हा कालावधी राजकारण्यासाठी चांगली बातमी देणारा ठरू शकतो. **महिलांना-** महिलावर्गाने या कालावधीत कर्ज, उधारी या भानगडीत पडू नये. घरात स्वयंपाक करताना योग्य काळजी घ्या **शुभदिनांक-** २८,०४.

धार्मिक कार्यात यश

कन्या : हा सप्ताह कन्याराशीसाठी शुभयोग घेऊन आलेला आहे. जे काही कराल त्यात यश सहज मिळू शकेल असा कालावधी असला तरीपण डोक्यात हवा जाऊन देऊ नका. आपल्याला एखादे नवीन आर्थिक स्तोत्रहि मिळण्याचा संभव आहे. मात्र अशावेळी आपली सद्विवेकबुद्धी जागृत ठेवणे महत्वाचे ठरेल. गैरमार्गाचा पैसा नको तो त्रास उत्पन्न करतो नाहीतर आपले जीवन नको त्या दिशेला घेऊन जातो. एखादा जवळचा मित्र आपल्या शब्दामुळे दूर जाणार नाही याची काळजी घ्या. कालावधी चांगला आहे या कालावधीत आपण चांगल्या योजना कार्यान्वित करू शकाल. आता केलेले सामाजिक काम आपल्याला भविष्यात उपयोगी पडणार आहे. नोकदारवर्गाला आपल्या कामामुळे प्रशंसा अनुभवण्यास मिळेल. वरिष्ठ खुश असतील तेव्हा आपल्या पदोन्नतीचा प्रस्ताव त्यांना देण्यास हरकत नाही. मुलांचे अभ्यासात मन लागणारा कालावधी आहे, त्यांनी भविष्याच्या दृष्टीकोनातून हालचाल करण्यास हरकत नाही. स्पर्धापरीक्षाच्या दृष्टीकोनातून आपली तयारी करा यश मिळेल. **महिलांना-** महिलांच्या हातात पैसा खेळता राहणार आहे. एखादे धार्मिक कार्याची तयारी कराल. **शुभदिनांक-** २७,०१.

खर्चाची गणिते जुळतील

तुळ : हा सप्ताह तुळराशीसाठी खूपच आशादायक जाणार आहे. एखादे नवीन उत्पन्नाचे साधन आपल्याला गवसणार आहे. फक्त घाई करू नका. अति घाई संकटात नेई हे लक्षात ठेवा. एखादी चांगली सुरवात आपल्याला लाभ देणारी ठरू शकेल, आपण कार्यरत असलेल्या कार्यक्षेत्रातही वाढ होणार असल्याने, त्याचा फायदा आपल्याला मिळेल. ही आपल्या सर्वश्रेष्ठ कार्याची सुरवातही असू शकते. बेरोजगारांनी नोकरीसाठी प्रयत्न करण्यास हरकत नाही. अनुभवी कलाकारांना एखादी मोठी संधी चालून येईल. मोठा सन्मान प्राप्त होण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल सरू होईल. आत्मविश्वास वाढणाऱ्या घटना घडतील. घरात शुभकार्य करण्याच्या दृष्टीने तयारी कराल. लहान मोठे खर्च होतील पण पैशाचा मार्ग हि आपल्याकडे वळणार असल्याने त्या खर्चाची गणिते जुळतील. आपली कोणतीही मेहनत वाया जाणार नाही. विद्यार्थी वर्गाने थोडी अधिक मेहनत घेण्याची आवश्यकता आहे. **महिलांना-** महिलावर्गाने आपल्या तोंडावर नियंत्रण ठेवणे हे हितकारक आहे नाहीतर हि गोष्ट भांडणाला कारणीभूत होऊन यशाच्या मार्गात अडथळा येऊ शकतो. **शुभदिनांक-** ०१,०२.

थोडा संयम ठेवा

वृश्चिक : हा सप्ताह वृश्चिकराशीसाठी अनावश्यक खर्च वाढवणारा असू शकतो. त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे हिताचे आहे. तरीही हा कालावधी आपल्यासाठी लाभदायक ठरणार आहे. आपल्याकडे येणाऱ्या पैशात वाढ संभवते आहे. नवीन व्यवसाय चालू करण्यास हरकत नाही. वाहन, जागा खरेदीची इच्छा पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल चालू होईल. आपण बऱ्याच दिवसाची एखादी अपूर्ण इच्छा पूर्ण करू शकाल. कामगारवर्गाच्या कामात सुधारणा झाल्याने या क्षेत्रात आपले वलय वाढेल. राजकरणात यश मिळेल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींविषयी चिंता वाढेल. थोडे त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. वेळेवर ओषध उपचार केल्यास आजारपण लांब ठेवता येईल. चैनीवर खर्च करू नका, आपल्याकडे आलेल्या पैशाचे योग्य नियोजन आवश्यक आहे. घरगुती आर्थिक प्रश्न मार्गी लागू शकतील. **महिलांना-** महिलावर्गाने जास्त ताण न घेता घरातील वातावरण हलकंफुलक करण्याचा प्रयत्न करा. नोकरदार स्त्रियांना कामात बदल करण्याचे मनात असेल तर येणारा कालावधी मंदीचा असल्याने जोखीम घेऊ नका. नंतर संधी मिळणार आहे. फक्त थोडा संयम ठेवा. **शुभदिनांक -** ०३,०४.

धनलाभ संभवतो

धनु : हा सप्ताह धनुराशीसाठी भौतिक सुखसुविधांचा लाभ देणारा आहे. आपले विरोधक हि विचारात पडतील असे कार्य आपल्याकडून घडणार आहे. आपले कौतुक होण्याचा कालावधी आहे. आपल्या नातेवाईकांचे आपल्याला साह्य मिळेल. नवीन जागा घेण्याबाबत हालचाल करण्यास हरकत नाही, त्याला चांगले रूप देऊ शकाल. फक्त देईल हरी खाटल्यावरी असे धोरण टाळा. संसर्गजन्य आजारापासून काळजी घेण्याची गरज आहे. थोडं तापासारखे वाटेल, घाबरून जाऊ नका हे व्हायरल असणार आहे. जेवणखाण वेळेवर करत जा. विद्यार्थीवर्गाचे मन पुन्हा अभ्यासाकडे वळेल. व्यावसायिकांनी नवीन प्रस्ताव स्वीकारण्यास हरकत नाही. आठवड्याच्या शेवटी धनलाभ संभवतो आहे. फक्त लॉटरी, सट्टा हा मार्ग मात्र टाळा. घरात खास मेजवानीचा बेत केला जाईल. अडकलेले काम मार्गी लागेल. **महिलांना-** आपण भले की आपले काम भले, असे धोरण आपल्याला हितकारक ठरणार आहे. घरात अचानक आलेल्या पाहुण्यांमुळे आपली धावपळ होणार आहे, मात्र अतिथि देव भवप्रमाणे आपल्याला आशीर्वाद मिळणार आहेत. **शुभदिनांक-** २९, ३०.

मेहनतीला प्राधान्य द्या

मकर : हा सप्ताह मकरराशीसाठी एकट राहणे पसंद करणार आहात. आपण एकटे राहून स्वतःबद्दल केलेला विचार आपल्या प्रगतीसाठी उपयोगी पडणार आहे. एकटे राहण्याने आपल्याला आंतरिक बलही मिळणार आहे. ताजेतवाने होऊन आपण पुन्हा कामाला लागू शकाल. आपल्या सुदैवाने हा साप्ताह कुंभराशीसाठी ढगाळ वातावरण बदलवणारा ठरणार आहे. फक्त निराश असाल तर त्या अस्वस्थेतून बाहेर पडा, यश आपल्याजवळ आहे. आपल्या मार्गातील अडचणी दूर होतील. आपल्या प्रयत्नांना विरोधकही अडवू शकणार नाहीत. आपण निर्णय घेऊ शकाल. त्या निर्णयाचे पडसाद सकारत्मक असतील. मन प्रसन्न करणाऱ्या घटना घडतील. वाद विवादात यश मिळेल. महत्वाच्या नवीन वस्तूची खरेदी कराल. कामात थोडे कमी जास्त होऊ शकते. त्यामुळे मेहनतीला प्राधान्य ध्या. आपल्या श्रमाचे चीज होणार आहे. कोणतीही गोष्ट फुकट जात नाही त्यासाठी वेळ यावी लागते. **महिलांना-** आपल्या संबंधितांमध्ये लढाई, झगडा होऊ शकतो. त्यामुळे आपला व्यवहार सरळसोट ठेवा. संसारीक आयुष्यात थोडा अशांतपणा जाणवला तरी नवीन सप्ताहात आपल्याला दिलासा मिळणार आहे. **शुभ दिनांक-** ३०,०१.

वातावरण आनंदी राहील

कुंभ : या सप्ताहात आपण कामाचा ओघ वाढवणारा आहे. घेतलेले कार्य पूर्ण करू शकाल. या कालावधीत आपले एखादे खास काम होणार आहे. आपल्या सुखसुविधांमध्ये वाढ होईल. मित्रांमध्ये सलोखा वाढेल. घरातील वातावरण आनंदी राहील. आपलेले अडकलेले पैसे मिळण्यासाठी या कालावधीत विशेष प्रयत्न करा यश मिळेल. कर्ज घेण्यापासून जामीन राहण्यापासून लांब राहा. विद्यार्थीवर्गाने जास्त मेहनत घेण्याची गरज आहे. मेहनतीमुळे आपल्यात उर्जा वाढणार आहे, तिचा योग्य वापर करा. अविवाहितांसाठी एखादा चांगला प्रस्ताव येईल तो विचारपूर्वक स्वीकारण्यास हरकत नाही. तरुणांनी तब्येतीची काळजी घ्यावी. चरबी वाढणारे पदार्थ खाऊ नये. नोकरीत आनंद मिळेल. प्रवासात काळजी घेण्याची गरज आहे. तसेच दुकानदारांनी साठेबाजीच्या भानगडीपासून लांब राहावे. **महिलांना-** लांबच्या प्रवासाचा बेत केला जाईल. त्या संदर्भात नियोजन केले जाईल. मुली, मुलांना चांगले स्थळ येणार आहे. महिलांनी आपले मन वाचनात रमवावे. सप्ताहाच्या शेवटी दिलासा देणाऱ्या घटना घडणार आहेत. **शुभदिनांक -** ०१,०२

अतिताण धोकादायक

मीन : हा सप्ताह मीनराशीसाठी थोडा निवांतपणाचा जाणार आहे. दुसऱ्यांना मदत करण्याची संधी सोडू नका. यामुळे तुम्हाला भविष्यात फायदा होऊ शकेल. आपल्या जोडीदाराला मदत करावी लागेल, त्यामुळे घरातील वातवरण चांगले ठेवता येईल. मित्र परिवारासोबत गाठभेट झाल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळेल. आपल्या कामात बदल करण्याचे विचार डोक्यात चालू असतील तर त्याला सध्याच्या स्थितीमध्ये हवा देऊ नका. वातावरण चांगले नाही, त्यामुळे नुकसान होऊ शकते. शांतपणे विचारपूर्वक घेतलेले निर्णय हे आपल्याला भविष्यासाठी उपयोगी पडणार आहेत. विशेषतः भावनेच्या भरात घेतलेल्या निर्णयाबाबत चूक होण्याची शक्यता राहील. मनस्थिती चांगली ठेवण्यासाठी विचारापासून लांब राहा. उद्योगधंद्यात हळूहळू कामांना गती प्राप्त होईल. नोकरदारांनी मात्र थोडी सावध भूमिका घेण्याची गरज आहे. आपल्या आजूबाजूला लक्ष ठेऊन काम करावे. **महिलांना-** महिलावर्गाने तब्बेतीची विशेष काळजी घ्यावी. जागरण व अतिताण धोकादायक ठरू शकतो. **शुभदिनांक-** २९,०३.

बायोमेडिकल कचरा उघड्यावर

● उरणमधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात, प्रशासनाचे दुर्लक्ष

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील शहरी भागात क्लिनिक आणि पॅथॉलॉजी लॅबमधून निघणारा वैद्यकीय बायोमेडिकल कचरा उघड्यावर टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. याबाबत तातडीने चौकशी करून कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

वैद्यकीय बायोमेडिकल कचरा ही मोठी समस्या आहे. क्लिनिक आणि पॅथॉलॉजी लॅबमधून निघणारा हा कचरा मानवाच्या आरोग्यासाठी अतिशय धोकादायक असतो. या कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी शासनाकडून काही संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्था ठराविक शुल्क घेऊन कचरा गोळा करून शासनाच्या नियमांनुसार त्याची विल्हेवाट लावतात. मात्र, हे शुल्क वाचविण्यासाठी काही क्लिनिक, पॅथॉलॉजीधारक विविध ठिकाणी हा कचरा उघड्यावर टाकला जात असल्याचे समोर येत आहे.

उरण शहरातील चारफाटा येथील मच्छीमार्केटजवळ असा बायोमेडिकल कचरा उघड्यावर टाकण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे अशा रोगराईला आमंत्रण देणारे आणि नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळणाऱ्या अशा क्लिनिक व पॅथॉलॉजी लॅबवर कठोर कारवाई करण्याची करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

> दवाखाने किंवा पॅथॉलॉजी लॅबमधून निघणारा वैद्यकीय जैविक कचरा उघड्यावर टाकता येत नाही. तसे केल्यास संबंधितावर कारवाई होऊ शकते. हा कचरा पॅथॉलॉजी लॅबमधून निघालेला कचरा असून हा कचरा उघड्यावर टाकणे घातक आहे. तर यापासून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो.
> – डॉ. राजेंद्र इटकरे (तालुका आरोग्य अधिकारी)

अशोक सराफ यांचा होणार सन्मान

| उरण | प्रतिनिधी |

आपल्या विनोदी भूमिकांद्वारे रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणारे मराठी चित्रपट सृष्टीतील महानायक, महाराष्ट्र भूषण तथा पद्मश्री अशोक सराफ यांचा सपत्नीक भव्य नागरी महासन्मान करण्यात येणार आहे. हा सोहळा उलवे नोड येथील भूमिपुत्र भवन येथे रविवारी (दि.२८) सायंकाळी ६ वाजता होणार आहे. अभिनेत्री निवेदिता जोशी यांचीदेखील या दिमाखदार सोहळ्याला उपस्थिती लाभणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. शेलघर येथील यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्थेने, संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली या नागरी महासन्मान सोहळ्याचे आयोजन केले आहे. या सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी रसिक प्रेक्षकांना विनामूल्य प्रवेश ठेवण्यात आला आहे.

गड-किल्ले म्हणजे देशाची शान : सुखद राणे

| खांब | प्रतिनिधी |

गड-किल्ले म्हणजे देशाची शान असल्याचे गौरवोद्गार रोहा शहरातील गड-किल्ले अभ्यासक तथा रायगड भूषण सुखद राणे यांनी खांब येथे काढले. रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब शिक्षण संस्थेच्या श्री. रा. ग. पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब येथे शारदोत्सव सुरु आहे. या कार्यक्रमातंर्गत गड-किल्ले अभ्यासक तथा लेखक, शिवचरित्र व्याख्याते व रायगड भूषण सुखद राणे यांच्या व्याख्यानाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी येथील विद्यार्थी व शिक्षक वर्गाला संबोधित करताना ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, गड-किल्ले म्हणजे आपल्या इतिहासाच्या पाऊलखुणा आहेत. याशिवाय आपल्या सांस्कृतिक वारशाचे प्रतिक आहेत. याशिवाय तो आपल्या देशाचा अनमोल ठेवा असून तो आपण कायमच जतन करून ठेवला पाहिजे. तसेच, गड-किल्ल्यांमुळे देशाच्या वैभवात अधिक भर पडते, असेही शेवटी त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाप्रसंगी व्याख्याते सुखद राणे यांनी लिहिलेले इये देशीचे दुर्ग हे पुस्तक विद्यालय ग्रंथालयास भेट दिले.

खुटिल येथे जंगल सत्याग्रह स्मृतिदिन साजरा

● आदिवासी विकास संघाचा पुढाकार

| महाड | प्रतिनिधी |

चिरनेर येथे ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध झालेल्या जंगल सत्याग्रहाचा ९५ वा स्मृतिदिन व हुतात्मा नाग्या महादू कातकरी व स्वातंत्र्यसैनिक, आदिवासी नेते भगवान बिरसा मुंडा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्तआदिवासी विकास संघ महाड तालुका यांच्या पुढाकाराने खुटील आदिवासीवाडी येथे हुतात्मा नाग्या महादू कातकरी व भगवान बिरसा मुंडा, छत्रपती शिवाजी महाराज व महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली.

चिरनेरच्या उठावातील या लढ्यामध्ये आठ कांतिकारांनी प्राणाची आहूती दिली होती. या क्रांतिकारकांविषयी माहिती देताना अप्पर तुडील केंद्र प्रमुख वसंत साळुंखे म्हणाले, हुतात्मा नाग्या महादूकातकरीहेरायगडजिल्ह्यातील उरण जवळील चिरनेरच्या उठावातील मोठे क्रांतिकारक होत. हुतात्मा नाग्या कातकरी यांचे हे बलिदान समाजाच्या हक्कांसाठी आणि स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी अत्यंत महत्त्व मानले जाते. या सोबत शैक्षणिकरित्या समाज पुढे आला पाहिजे, पालकांनी आपल्या पाल्यात शिक्षणाची आवड निर्माण करावी, जेणे करून त्यांनाही भविष्यात उंच झेप घेण्यासाठी सोपे जाईल, असे केंद्रप्रमुख वसंत साळुंखे यांनी सांगितले.

यावेळी दीपक आंबराळे यांनी थोर आदिवासी क्रांतिकारक हुतात्मा नाग्या कातकरीचा जीवनपट उलगडला. आदिवासी संस्कृती व निसर्गपूजक, निसर्गाचा खरा राखणदार आहे. जगातील महान संस्कृतीपूजक म्हणून याची गणना केली जाते. आदिवासी समाजाने निसर्ग,पशूपक्षी, औषधी झाडे यांचे जतन यापुढेही जोपासायला हवे. निसर्गात लुप्त होणाऱ्या झाडांचे जतन करायला हवे. आदिवासी समाजाच्या जीवनावश्यक सोयी सुविधा बाबतची आवश्यक मार्गदर्शनपर विशेष माहिती याप्रसंगी दिली.

अरुण म्हात्रे यांचा सन्मान

| उरण | प्रतिनिधी |

बोकडवीरा येथील भ.पो. म्हात्रे गुरुजी यांच्या घरी गुरुवारी १०६ व्या काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रसिध्द कवी, गायक आणि वादक अरुण द. म्हात्रे यांचा काव्य दरबार संस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. कवी म्हात्रे यांना कवितांसाठी राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले. त्यामुळे त्यांच्या काव्यगुणांचा काव्यदरबार संस्थेकडून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महादेव घरत यांनी भूषविले होते. तर कामगार नेते भूषण पाटील इतिहासकार के. एम. मढवी, कवी भ.पो.म्हात्रे, जनार्दन पाटील, हिरालाल पाटील, अरुण पाटील हे या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी भूषण पाटील व महादेव घरत यांनी कवी अरुण द. म्हात्रे यांचे विशेष अभिनंदन केले. जे ना देखे रवी ते देखे कवी या उक्तीनुसार कविता रचून समाजजागृती करणाऱ्या कवींचा उचित सन्मान केला जाईल अशी गव्हीही यावेळी त्यांनी दिली.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की माझे अशिल १) श्री सागर बाळु तवळे, २) अनुष्का सागर तवळे, रा.नानामास्तर नगर, मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड. यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली निवासी सदनिका मिळकत सौ. मयुरी निवृत्ती सावंत यांचेकडून दिनांक ३० मार्च २०२२ रोजीचे करारनाम्याने खरेदी केलेली आहे. सदरील करारनामा मा.दुय्यम निबंधक कर्जत यांचेकडे नोंदणी अनुक्रमांक २७४९/२०२२ अन्वये नोंदणी केलेला आहे. सदरील मिळकत मयुरी निवृत्ती सावंत यांनी १) दिलीप लक्ष्मण शहा व २) अनिता दिलीप शहा यांचेकडून खरेदी केलेली मिळकत होती. सदरील मिळकत माझे अशिल यांनी खरेदी करतेवेळी मयुरी निवृत्ती सावंत यांनी १) दिलीप लक्ष्मण शहा व २) अनिता दिलीप शहा यांचे नावे असलेले मालकी हक्काचे दस्तऐवज म्हणुन विक्री करार, भाग प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे हस्तांतरीत केलेली होती, परंतु सदरील दस्तऐवजापैकी १) दिलीप लक्ष्मण शहा व २)अनिता दिलीप शहा यांचे भाग प्रमाणपत्र हे माझे अशिल यांचेकडून अभिलेखातून गहाळ झालेले आहेत. त्याबाबत दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी मा.कर्जत पोलिस ठाणे यांचेकडे ०५६४/२०२५ अन्वये तक्रार देखील नोंदविलेली असून सदरील भाग प्रमाणपत्र कोणासही सापडल्यास खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे हि विनंती.

परिशिष्ट

निवासी सदनिका मिळकत व भाग प्रमाणपत्राचे वर्णन :-

मौजे-मुद्रे बुद्रुक, ता.कर्जत, जिल्हा रायगड येथील सर्व्हे नंबर-३ हिस्सा नं.३अ या मिळकतीवर बांधलेल्या ''वास्तु ऐव्हेन्यु'' या इमारती मधील ई विंग' मधिल तळ मजल्यावरील, सदनिका क्र.००२, ज्याचे क्षेत्र ६०.५५० चौ.मीटर कारपेट असे असून वास्तु ऐव्हेन्यु को.ऑप हौ. सोसायटी यांचेकडील भाग प्रमाणपत्र क्र.६५१ ते ६६० असे आहेत.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:- फ्लॅट नं.४, ए विंग, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१.

सही / -
ॲड.जयेश संभाजी म्हसे
दिनांक :- २८/०९/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेलः-adv.jayeshmhase@gmail.com

उरण महाविद्यालयाच्या रेड रिबीन क्लबची क्षेत्र भेट

| उरण | प्रतिनिधी |

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत येणाऱ्या रेड रिबीन क्लबच्या वतीने इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय येथे क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती. यावेळी एचआयव्ही समुपदेशक मा. महादेव पवार यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्हीची कारणे, उपायोजना व होऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी इत्यादी विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. टेक्निशियन तृप्ती परजने यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

एक क्षेत्र भेटीत रुग्णालयातील सर्व विभागांना भेटी देऊन विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. डॉ. अंकिता कदम (टीबी विभाग), डॉ. सुभाष डवले (नेत्र विभाग), डॉ. संतोष झापकर व नागनाथ दळवी (दंत विभाग), डॉ. विशाल पाटील व डॉ. राठोड (प्रयोगशाळा), तसेच प्रियंका कोळी (वैद्यकीय अधिकारी आयुष्य विभाग) व कृतिका म्हात्रे (आयुष विभाग) इत्यादींनी त्या-त्या विभागाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी प्रसूती विभाग, स्त्री विभाग, पुरुष विभाग, ओपीडी, इंजेक्शन विभाग इत्यादी विभागाला भेट दिली व माहिती मिळवली. सरकारी आरोग्य व्यवस्था समजून घेतली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे व वैद्यकीय अधिकारी डॉ. बाबासो काळेल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या क्षेत्रभेटीत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे व मोठ्या संख्येने एन,एस,एसच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

दाभाडेचा चारोळी संग्रह लवकरच प्रकाशित

रसायनी : रसायनी मोहोपाडा पाताळगंगा परिसरात कवी, लेखक, चारोळीकार, प्रकाशयोजनाकार, पक्षीनिरीक्षक अशा विविध नावाने सुपरिचित असलेले साहित्यिक कवी चारोळीकार अनिल दाभाडे यांचा 'चांदण्या आणि मी…' हा चारोळी संग्रह लवकरच प्रकाशित होत आहे. दाभाडे यांच्या चांदण्या आणि मी… या चारोळी संग्रहात सुमारे ३०० हून अधिक चारोळ्यांचा समावेश आहे. एकाच चारोळी संग्रहात ३००हून अधिक आणि वेगवेगळ्या विषयांवर असणाऱ्या चारोळ्या रसिकांना वाचायला मिळणार आहे.

तरुणांना उद्योजकतेकडे वळवावे: समीर होडबे

● विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात आवाहन

| महाड | प्रतिनिधी |

कोकणातील तरुणाई आज रोजगाराच्या शोधार्थ शहरात धाव घेत आहे. परंतु, गाव आणि शहर यामध्ये जर आठवडे बाजारपेठ निर्माण झाले, तर त्यांना व्यवसाय, उद्योजकता आणि स्वावलंबन या तीनही संधी मिळू शकतात. कोकणातील युवकांनी गावाकडे येऊन व्यवसायाकडे लक्ष्य घालावे आणि आपल्या गावातील तरुणांना उद्योजकतेकडे वळवावे, असे आदर्श शिक्षक पुरस्कृत समीर होडबे यांनी सभेत संबोधित केले. कुणबी समाजोन्नती संघ मुंबई महाड पोलादपूर शाखेची मुंबई येथील वाघे हॉल येथे नुकतीच वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी दहावी व बारावी पदवीधर विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार सोहळा, मार्गदर्शन, शेतीबाबत विशेष माहिती आणि जनजागृती, तसेच विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या समाजातील नागरिकांचा विशेष सत्कार करण्यात आले.

महाड तालुक्यातील करंजमाळ गावचे भूमिपुत्र तथा मुमुर्शी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक समीर होडबे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच समाजात उदयास येणाऱ्या नेतृत्वाचा सत्कार करण्यात आला.

सौर ऊर्जेच्या पथ दिव्यांनी उजळले रस्ते

● अनेक वर्षांचा अंधार संपुष्ठात
● दिपाली पाटील यांचा पुढाकार

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

ग्रुप ग्रामपंचायत माजगाव हद्दितील असलेला वारद हे गाव निसर्गरम्य वातावरणात वसलेले आहे. गावामध्ये जाण्यांसाठी वाहतुकीची सेवा नसल्यामुळे दीड किलो मीटर अंतर पायी चालत जावे लागते. या ठिकाणी रात्रीच्या वेळी सर्पटणा-या प्राण्यांची भिती असते. त्यातच रस्त्यावर अंधार ही नेहमीची समस्या मार्गी लावण्याचे अश्वासन सरपंच दिपाली नरेश पाटील यांनी ग्रामस्थांना दिले होते. यामुळे एका नामवंत कंपनीच्या सीएसआर फंडातून सौर ऊर्जेवर चालणारे पथ

दिवे बसविण्यात आले. त्यामुळे येथील ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहे.

गेले अनेक वर्ष येथील ग्रामस्थ आंधारातून आपला मार्गक्रमण करीत होते. या ठिकाणी जाण्यासाठी खाजगी वाहनांचा वापर जरी होत असला, तरी सुद्धा काही ग्रामस्थ पायी चालण्यात धन्यता मानत असत. मात्र येथील रस्ते दिव्याप्रमाणे दैदिप्यमान व्हावे, याच विचारातून सरपंच, उपसरपंच, सह सदस्य, ग्रामसेवक यांच्या पुढाकारांने हा रस्ता प्रकाशमान झाल्याचे दिसत आहे.

ग्रुप ग्रामपंचायत ही ग्रामस्थांच्या समस्यांच्या सोडविण्यांचे एक माध्यम असून त्यांनी ते पूर्ण केल्यास गावाचा विकास होत असतो. मात्र ते पूर्ण करण्यासाठी सकारात्मक उर्जेची गरज असणे गरजेचे आहे. मात्र दिपाली पाटील यांनी ग्रामस्थांची गैरसोय विचारात घेत मार्गी लावल्यामुळे त्यांचे कौतुक होत आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मौजे दहिवली तर्फे निड, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पाँ.	आकार रू.पै.
१) बापू माणिक सांगडे २) श्रेणिक सरदारमल ओसवाल ३) संग्राम प्रकाश मगदुम ४) सागर मारूती जोशी	१२३	१/अ	एकूण क्षेत्र ०-२३-५० हे.आर.पॉ त्यापैकी लिहून दिलेले क्षेत्र ०-१२-०० हे.आर.पॉ	०-१९

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्‌गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २८/०९/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४, डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

महिलांमध्ये वाढतेय न्यूरोलॉजिकल विकारांचे प्रमाण

६० टक्के महिलांना मेंदूशी संबंधित समस्या; तज्ज्ञांनी दिला सतर्कतेचा इशारा

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

मायग्रेन, एपिलेप्सी, मल्टिपल स्क्लेरोसिस, स्ट्रोक, पार्किन्सन आणि अल्झायमर यांसारख्या न्यूरोलॉजिकल विकारांचे प्रमाण महिलावर्गात झपाट्याने वाढत चालले आहे. हे विकार महिलांच्या दैनंदिन आयुष्याबरोबरच त्यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांवर व त्यांच्या एकुण आरोग्यावर परिणाम करतात.

वाशीतील न्यूईरा हॉस्पिटलमधील न्यूरोसर्जन डॉ. सुनील कुट्टी सांगितले की, महिलांमध्ये आढळणाऱ्या न्यूरोलॉजिकल समस्यांमध्ये मायग्रेन, अपस्मार (एपिलेप्सी), मल्टिपल स्क्लेरोसिस, स्ट्रोक, पार्किन्सन, अल्झायमर आणि न्यूरोपॅथीसारख्या विकारांचा समावेश आहे. डोकेदुखी, चक्कर येणे, सुन्नपणा, स्मरणशक्ती कमकुवत होणे, थकवा किंवा दृष्टी कमी होणे अशी सुरुवातीची लक्षणे अनेकदा दुर्लक्षित केली जातात. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्यास मज्जातंतूचे कायमचे नुकसान होते. तसेच स्मरणशक्ती गमावणे, अपंगत्व किंवा जीवघेण्या स्ट्रोकचा सामना करावा लागू शकतो.

डॉ. कुट्टी पुढे सांगतात की, तणाव किंवा हार्मोनल बदलांमुळे महिलांना न्युरोलॉजिकल विकारांचा सामना करावा लागतो व बऱ्याचदा या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्याने निदानास विलंब होतो. वारंवार होणारी डोकेदुखी, अचानक येणारा अशक्तपणा किंवा बोलताना अडखळणे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करु नका. वेळीच उपचार केल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येते. सध्या ६० टक्के महिलांना मेंदूशी संबंधित समस्या भेडसावत आहेत. दरमहा २५ ते ७५ वयोगटातील ६ पैकी १० महिलांना न्यूरोलॉजिकल विकारांचा सामना करत असल्याचे दिसून येते.

> प्रगत इमेजिंग तंत्र, मिनीमली इव्हेसिव्ह न्यूरोसर्जरी, औषधोपचार, फिजिओथेरपी आणि डीप ब्रेन स्टिम्युलेशनसारख्या आधुनिक तंत्रांमुळे महिलांना त्यांच्या जीवनाची गुणवत्ता परत मिळवण्यास मदत होते. वेळोवेळी तपासणी, योग्य निदान, औषधोपचार, जीवनशैलीतील बदल आणि नियमित फॉलो-अप या भविष्यातील गुंतागुंत टाळता येते.
> - डॉ. सुनील कुट्टी, न्यूरोसर्जन, न्यूईरा हॉस्पिटल, वाशी

कृषी अधीक्षक वंदना शिंदेंची विविध गावांना भेट

| तळा | प्रतिनिधी |

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक आत्मा रायगड वंदना शिंदे यांचा विविध योजना पाहणी दौरा अंतर्गत बोरघर हवेली येथील सहदेव पारवे यांच्या आत्मा अंतर्गत नाचणी पिक प्रत्यक्षिकाची पाहणी केली. त्यानंतर प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत दामोदर चव्हाण यांच्या ग्राम बीजोत्पादन पिक प्रात्यक्षिकास भेट देऊन भात पिकाची पाहणी केली. यानंतर प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या तळगड शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांची सभा घेऊन शेतकरी गटास उत्पादन आधारित प्रकल्प तयार करणे व शेतकरी उत्पादक कंपनीस मूल्यवर्धन प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपनी पुरक भाग भांडवल अनुदान याविषयी मार्गदर्शन केले. यानंतर मौजे सोनसडे येथील रमेश गणपत कदम यांनी कृषी यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत घेतलेल्या पावर विडरची पाहणी केली. काकडशेत येथे तेजस जयंत आठवले यांनी भाऊसाहेब फुंडकर योजनेअंतर्गत लागवड केलेल्या आंबा पिकाची पाहणी केली. यानंतर रंजना हरिश्चंद्र पाटील यांनी मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत खोदलेल्या शेततळ्याची पाहणी करून शेततळ्यास प्लास्टिक अच्छादन करण्याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी मंडळ कृषी अधिकारी तळा संजय घालमे, उपकृषी अधिकारी तळा योगेश कोळी, कृषी सेवक दत्ता दुधाटे व सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापन आत्मा सचिन लोखंडे व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. आथिक व्यवहारात नुकसान संभवतं. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **वृषभ** : प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील. दिलासादायक घटना घडतील. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा.
- **मिथुन** : प्राप्तीचे नवे पर्याय समोर येतील. वाहन, यंत्रांचा वापर जपून करावा. स्थावर प्रश्नात लाभ होईल.
- **कर्क** : महत्त्वाची कामं कोणावर सोपवू नका. खरेदीच्या व्यवहारांना चालना मिळेल. बाकी चिंता नसावी.
- **सिंह** : आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील. डोळ्यांचे विकार उद्‌भवतील.
- **कन्या** : रखडलेली कामं मार्गी लागतील. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल. मुलांचे प्रश्न मार्गी लागतील.
- **तूळ** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक घ्याव्या. इतरांच्या वादात मध्यस्थी नको. प्रवासात काळजी घ्यावी.
- **वृश्चिक** : ग्रहमानाची प्रतिकूलता राहील. नव्या योजना तुर्तास रखडतील. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **धनु** : महत्तवाचे निर्णय तातडीनं घ्यावेत. किरकोळ दुखण्याकडे दुर्लक्ष करू नका. वाद-विवाद टाळावेत.
- **मकर** : कामाचा उत्साह वाढता राहील. नव्या संधी चालून येतील. भांडवल गुंतवणुकीबाबत दिलासा मिळेल.
- **कुंभ** : स्वमताग्रह टाळायला हवा. स्थापत्य क्षेत्रात प्रगतीला वाव मिळेल. वरिष्ठांची मर्जी राखायला हवी.
- **मीन** : आजचा दिवस धावपळीचा राहील. कलेच्या क्षेत्रात विशेष कामगिरी घडेल. आनंदी, समाधानी रहाल.

ब्युटी मंत्रा

कोणतं क्रीम लावायचं?

मेक अप बेस म्हणून फाउंडेशन वापरण्याचे दिवस आता मागे पडले आहेत. वेगवेगळ्या प्रकारची क्रीम्स बाजारात उपलब्ध झाली आहेत. बीबी, सीसी आणि डीडी हे क्रीमचे प्रकार उपलब्ध आहेत. आता यापैकी कोणतं क्रीम आपल्यासाठी योग्य आहे असा प्रश्न महिलांना पडू शकतो. या क्रीम्समध्ये काय फरक आहे असंही वाटतं. अशा क्रीम्सना सध्या बरीच मागणी आहे. पण चुकीचं क्रीम निवडलं तर लूकचा विचका होऊ शकतो. बाजारात उपलब्ध असलेल्या या क्रीम्सबद्दलचं हे मार्गदर्शन...

* ब्युटी बाम किंवा ब्लॅमिश बाम म्हणजे बीबी क्रीम. या क्रीमचं टेक्श्चर क्रीमी आणि मॉईश्चरायझरसारखं असतं. या क्रीममुळे त्वचेचा टोन राखला जातो. मॉईश्चरायझर म्हणूनही हे क्रीम उपयुक्त ठरतं. सूर्याच्या अतिनील किरणांपासूनही ते बचाव करतं. फारसा मेक अप करायचा नसेल किंवा मेक अपची आवड नसेल तर बीबी क्रीम उत्तम ठरतं. हे क्रीम लावल्यावर त्वचेवरचे डाग लपतात. त्वचा मुलायम आणि चमकदार दिसते. पण अँटी एजिंग क्रीम किंवा सिरम म्हणून याचा वापर करू नये. **(क्रमश:)**

२८ सप्टेंबर

दिनविशेष

१९२९ : प्रख्यात भारतीय पार्श्वगायक लता मंगेशकर यांचा जन्म.
२००४ : कॅलिफोर्नियातील पार्कफील्ड शहराला रिश्टर मापनपद्धतीनुसार ६.० तीव्रतेचा भूकंपाचा धक्का.
२०१३ : मुंबईतील डॉकयार्ड रोड येथील इमारत दुर्घटनेत ५४ लोकांचा मृत्यू तर ३३ जण जखमी.
२०१७ : अमेरिकेमध्ये येत्या वर्षी केवळ ४५ हजार स्थलांतरितांनाच प्रवेश देण्याचं तेथील सरकारने जाहीर केलं.

स्मार्ट टेक

पिकांची काळजी घेणारा रोबो

पिकाची काळजी कशी घ्यायची असा प्रश्न शेतकऱ्यांना पडतो. पण आता शेतकऱ्यांना काळजी करण्याचं काहीच कारण नाही. कारण आता एक रोबो त्यांच्या शेताचं आणि पिकाचं रक्षण करेल. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी एक रोबो तयार करण्यात आला आहे. विविध विद्यापीठं आणि कंपन्यांनी मिळून हा रोबो तयार केला आहे. विन स्काउट असं या रोबोच नाव आहे. यात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे शेतामध्ये फिरून तो पिकांची तपासणी करेल. या रोबोने द्राक्षाच्या बागेची तपासणी केली.

हा रोबो तयार करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. दिवसा आणि रात्री या रोबोचा वापर करता येतो. एका तासात तो ३००० द्राक्षांची तपासणी करून माहिती गोळा करू शकतो. या रोबोला चार चाकं आहेत. यात इन्फ्रारेड सेंसर आणि मल्टीस्पॅक्ट्रल कॅमेरा बसवण्यात आला आहे. यामुळे तो पिकाच्या पानांची तपासणी करेल. पानांचं तापमान आणि त्यातल्या पाण्याची माहिती या रोबोमुळे मिळू शकेल. हा रोबो खूप छोट्या आकाराचा आणि हलका आहे. हा रोबो शेतकऱ्यांचा मित्र बनू शकेल.

पंचांग

रविवार, २८ सप्टेंबर २०२५
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
भाद्रपद शु. ६, नक्षत्र : ज्येष्ठा,
चंद्रराशी : वृश्चिक, योग : आयुष्मान,
सूर्योदय : ६.३१, सूर्यास्त : ६.२८

फॉरवर्डस

ख़िलाफ़ कितनें हैं.. फ़र्क़ नहीं पड़ता...

बस्स..ज़ो साथ हैं, वों लाज़वाब हैं...!

आरोग्यमंत्र

डासांपासून बचाव

बाजरीमध्ये मॅग्नेशियम, फॉस्फरस या सारखे अनेक पोषक घटक असतात. थंडीच्या दिवसात सगळ्यांनी बाजरीची भाकरी खाल्ली पाहिजे. बाजरी हिवाळ्यात शरीर उबदार ठेवते. शारीरीक कष्टाची कामे करणाऱ्या लोकांसाठी बाजरी हा मुख्य आहार आहे.

बाजरी कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते, त्यामुळे हृदयाशी संबंधित आजार होण्याचा धोका कमी होतो. याशिवाय बाजरी मॅग्नेशियम आणि पोटॅशियमचा चांगला स्रोत आहे. हे घटक रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी मदत करतात. जर आपण वजन कमी करण्याचा प्रयत्न करीत असाल तर बाजरीची भाकरी खाण आपल्यासाठी फायदेशीर ठरेल. बाजरीची भाकरी खाल्ल्यानंतर फार काळ भूक लागत नाही. ज्वारीची भाकरी शरीरासाठी अतिशय पौष्टीक असून बाजरीच्या तुलनेत शीत गुणाची आणि पचावयास हलकी असते. यात कर्बोदकं, प्रथिनं आणि तंतुमय पदार्थ असतात. त्यामुळे ज्वारीची भाकरी ऊर्जादायी ठरते. ज्वारीची भाकरी पचनक्रिया सुरळीत ठेवते व बद्धकोष्ठाचा त्रास कमी करते म्हणून सर्व प्रकारच्या पोटाच्या आजारात ती गुणकारी ठरते. यातील तंतुमय पदार्थ व अँटीऑक्सिडेंटमुळे लठ्ठपणा, रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी व रक्तातील साखर नियंत्रित ठेवणं सोपं जातं. नियमित आहारात ज्वारीची भाकरी ठेवली तर शरीरात अतिरिक्त चरबी (मेद) साठत नाही. ज्यांना वजन कमी करण्याची इच्छा आहे त्यांनी तर रोज जेवणात ज्वारीचा समावेश करावा. हाडांच्या मजबुतीवरदेखील ज्वारी गुणकारी आहे.

वेगळ्या वाटा

तुम्हालाही यू ट्यूब चॅनल सुरू करण्यामध्ये रस असेल तर या टिप्स उपयोगी पडतील.

* लक्षवेधी संकल्पना ही यू ट्यूब चॅनलच्या यशाची पहिली पायरी असते. लोकांना काही तरी हटकेद्यावं लागतं. तुमची संकल्पना लक्षवेधी ठरली की यू ट्यूब डॉट कॉमवर जाऊन स्वत:चं चॅनल सुरू करा. त्यात चॅनलचं नाव, युजरनेम, प्रोफाईल पिक्चर, कव्हर पिक्चर लावा. दहा हजार व्ह्यूज मिळाल्यानंतर जाहिराती आणि उत्पन्न मिळायला सुरूवात होईल. तुमच्याकडे अशी अनोखी संकल्पना असेल तर लागा कामाला. **(क्रमश:)**

करिअरवाटा

...मग ठरवा भविष्याची दिशा

शिक्षण ही भविष्याची गुंतवणूक असते. मुख्य म्हणजे ज्या विषयात गती असेल त्यातच उत्तम भविष्य घडू शकतं. उदाहरणार्थ तबला अथवा बासरीवादनात गती असणारा एखादा विद्यार्थी शास्त्रशुद्ध शिक्षण घेऊन उत्कृष्ट कलाकार म्हणून नावलौकिक मिळवू शकतो. मात्र अशा विद्यार्थ्यानं

शास्त्र शाखेत प्रवेश घेतल्यास त्याचं या अभ्यासात मन लागेलच असं नाही. तेव्हा स्वत:ची आवड, कल ओळखून अभ्यासाची दिशा ठरवायला हवी. सध्या माहिती-तंत्रज्ञान, कॉम्प्युटर हार्डवेअर, नेटवर्किंग अशी अनेक नवी क्षेत्रं नोकरी किंवा व्यवसायासाठी खुली झाली आहेत. यामध्ये आर्थिक उत्पन्न अधिक असल्यानं तरुणांचा ओढा वाढतो आहे. याच्या पदविका अभ्यासक्रमात हार्डवेअरची तोंडओळख, कॉम्प्युटर बांधणी, नेटवर्किंग याबरोबरच जगन्मान्य कंपन्यांच्या विशेष परीक्षा असतात. हल्ली कॉमर्स विद्याशाखेमध्येही खूप संधी आहेत. कला शाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जर्मन, फ्रेंच, रशियन आदी भाषांचे वर्ग उपलब्ध असतात. त्यामुळेच कल ओळखून योग्य निर्णय घ्यावा हे उत्तम. आपला कल जाणून घेण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या टेस्ट देणं हा एक सर्वोत्तम पर्याय आहे हेदेखील विसरुन चालणार नाही.

खेचाखेची

एक गंभीर चूक

जखमांवर - अल्कोहोल
बेशुद्धीसाठी - अल्कोहोल
आनंदात - अल्कोहोल
दु:ख विसरण्यासाठी - अल्कोहोल
सर्दी टाळण्यासाठी - अल्कोहोल
तणाव दूर करण्यासाठी - अल्कोहोल
पार्टीत पाहुण्यांसाठी - अल्कोहोल
मित्रांच्या मेळाव्यात - अल्कोहोल
मते मिळविण्यासाठी - अल्कोहोल
अर्थव्यवस्था वाचवण्यासाठी - अल्कोहोल
अरे देवा, आपण अमृत ओळखण्यात चूक तर नाही ना केली ?

वेगळं काही

मध्यंतरी नताशा एंपोटे या मुलीने तब्बल २०० मुलांना आपल्या जाळ्यात ओढलं. या मुलीने २०० मुलांसोबत मस्करी केली. टिंडर असं या डेटिंग साईटचं नाव आहे. एका व्यक्तीने टिंडरचा हा अनुभव शेअर केला. या व्यक्तीची ओळख टिंडरच्या माध्यमातून एका मुलीशी झाली. या दोघांनी एकमेकांना फोन नंबर दिले. या मुलीने त्याला ब्लाईंड डेटला बोलावलं. न्यूयॉर्कमधल्या युनियन सिटी पार्कमध्ये तो पोहोचला. इथे तब्बल २०० लोक उपस्थित होते. हे सर्वजण त्या मुलीशी डेट करायला आले होते. इथे तिने एका स्पर्धेचं आयोजन केलं होतं. या स्पर्धेच्या माध्यमातून ती आपल्या साथीदाराची निवड करणार होती. यासाठी तिने बऱ्याच अटी आणि नियमही ठेवले होते.

परिस्थिती संयमानं हाताळा

संगोपन

मुलांमधील विसंवाद ही पालकांच्या जीवाला घोर लावणारी बाब ठरते. अगदी पौंगडावस्थेपासून भावंडांमध्ये वाद होऊ लागतात ज्याचं पर्यवसन पुढे कट्टर वैरामध्ये होऊ शकतं. नात्यात तणाव असल्यास मुलं घरात खूप चिडचिड करतात. कुठल्याही विषयावर तावातावाने वाद घालतात. त्यांच्यातील वाद सोडवताना नेमकी कोणाची बाजू घ्यायची हे समजतही नाही. मात्र इथे पालकांची समजुतदार भूमिका महत्त्वाची ठरते. या स्थितीत पालकांनी अशा वादांमुळे संबंध दुरावण्याची चिंता दूर सारायली हवी आणि त्यांच्यातील प्रेम टिकावं यादृष्टीने प्रयत्न करायला हवेत. विशेषत: पौगंडावस्थेतील मुलांबाबत बोलायचं तर या वयातील आक्रमकता हा नैसर्गिक आणि स्वाभाविक बदल असतो. या अवस्थेत मुलं स्वत्व शोधत असतात. त्यांची अस्मिता केंद्रं तयार होत असतात. आपली, आपल्या विचारांची, आवडीनिवडींची दखल घेतली जावी अशी त्यांची इच्छा असते. म्हणूनच ते वाद घालतात. पण याचा अर्थ संबंध दुरावतील असा घेऊ नये. उलटपक्षी, परिस्थिती संयमानं हाताळली तर याच वयात त्यांच्यातले प्रेमाचे बंध घट्ट होऊ शकतात.

सुडोकू १०

८	३	७	१					
५				८	३	६		
				९		७	३	
			८		५	१		२
६								४
४		८	६		१			
	६	५		७				
		४	३	१				६
					६	८	२	३

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू ९ चे उत्तर

८	३	१	७	४	९	५	६	२
५	९	६	२	१	८	३	४	७
७	२	४	५	३	६	८	१	९
४	५	७	६	२	३	१	९	८
६	१	९	४	८	५	७	२	३
२	८	३	९	७	१	४	५	६
९	७	८	१	५	२	६	३	४
१	४	२	३	६	७	९	८	५
३	६	५	८	९	४	२	७	१

शब्दकोडे क्रमांक १०



आडवे शब्द :-
१) नुकताच निवृत्त झालेला भारतीय स्टार क्रिकेटर
५) मोठ्या प्रमाणावर समाजकंटकांना पकडणे
११) कावळा
१२) फायदा-तोटा
१४) ओशाळा,लाजलेला
१५) वल्लरी
१७) सौंदर्य
१९) केव्हा (ग्रा.)
२०) सतरंजी
२२) छाती
२३) प्रामाणिक
२५) एक श्वासरोग
२६) कळलाव्या मुनी
२७) दंत
२८) भीमाजवळचे शस्त्र
३०) यमपुरी
३२) फलक
३३) डुक्कर
३५) आश्चर्य
३७) गंध
३८) यम,वेळ
३९) मान्य,आवडलेला
४२) खात्रीने,नक्की
४४) पुन्हापुन्हा
४६) मोठी नदी
४७) रतिचा पती
४९) धागा तयार करण्याचे एक साधन
५०) पक्षांचा समूह
५१) शर्करा
५२) चंद्राकृती लोखंडी पट्टी
५३) नौदल
५५) नाकावरील मोत्याचा दागिना
५६) नमस्कार
५८) खटला
५९) रडविणारा कंद
६०) संतापी
६१) भ्रम,नसताना आहे असे वाटणे
६२) खानदान
६३) नरमच्या विरुद्ध
६५) ठराविक रक्कम
६७) जबाबदारीचे काम,उद्योग, व्यवस्था
६९) नवरा
७०) व्यापारी फायदा
७२) अथवा,किंवा
७३) वऱ्याचे तांदूळ
७५) आत्म्याचा दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश
८१) मातीचा कण
८३) पेंढा,गवत इ.ठेवण्यासाठी बांधलेला मंडप
८४) उपस्थित
८५) सुस्ती
८७) किंचित छोटा
९०) पाठोपाठ
९२) बारीकसारीक
९३) मोठी बहीण
९५) सगळे

उभे शब्द :-
१) भव्य,अवाढव्य
२) बांगला देशाचे नाणे
३) शेळीचे पिल्लू
४) नम्र,वाकलेला
५) भाषांतर करणारा
६) एकाग्र नजर
७) कसाई
८) खळबळजनक
९) सदन
१०) कोर्ट,न्यायालय
१३) आंबट तुकडा,फोड,उपवास
१४) दोन ऋतूंची नावे
१६) खिडकीची काच
१८) अर्धी ओंजळ
२१) हात
२४) अरण्यातील वास्तव्य
२७) अंगाची होणारी आग
२९) लेखणी
३१) द्रवपदार्थ
३२) हालचालीवर ठेवलेली नजर
३४) रात्र
३६) वाहून नेणे
३८) कारखान्याचा मालक
३९) अनुमती,मान्यता
४०) गयावया करुन याचना करणे (वा.प्र.)
४१) मूळ विषयावर पोहोचण्या आधीचे फार मोठे प्रास्ताविक (वा.प्र.)
४३) मडक्याचा तुकडा
४४) पंख
४५) सडक,रस्ता
४६) बोटाच्या टोकावरील आवरण
४८) तुकडी,पान
४९) खंदक
५१) लहान
५३) कुंभाराची भट्टी
५४) मर्कट
५७) जुगाराचा एक प्रकार
५८) रवाळ
६०) सीतापती
६१) भारतीय अणुशक्तीचे प्रणेते डॉ.होमी **
६३) समुदाय,समूह
६४) सोन्याचा पर्वत
६६) वाल धान्याचा एक प्रकार
६८) हिरा,पाचू,माणिक इ.प्रकार
७१) अत्तराचा बोळा
७४) हत्ती
७६) लक्ष्मीचे एक नाव
७७) मंत्री,श्रेष्ठ,मुख्य
७८) नगर
७९) मवाळ धोरण
८०) अधिक महिना
८२) शिखराचे टोक
८५) शपथ(हिं.)
८६) षट
८८) माळ,सर,पराजय
८९) सखी,मैत्रीण
९१) अहंकार

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

आभाळ फाटले, आसू आटले

गेल्या दोन महिन्यांपासून महाराष्ट्रावर दररोज आभाळ कोसळत आहे. अजूनही त्याची दहशत संपायला तयार नाही. मध्यमवर्गीय, शहरी, उच्चभ्रू लोकांना शेतकऱ्यांचे दुःख परदुख शीतल असते, या म्हणी सारखे झाले आहे. महाराष्ट्रासह देशभरात पावसामुळे झालेली पिकांची हानी पाहता येत्या काळात महागाईवाढीला आणि शेतीमालाच्या टंचाईला सामोरे जावे लागू शकते. अर्थव्यवस्था आणि रेपोदरावरही त्याचा परिणाम संभवतो.

महाराष्ट्रासह देशभरात या वर्षी पावसाने लवकर हजेरी लावली. त्यानंतर जून आणि जुलैमध्ये पाऊस वेळेवर झाला नाही. त्याला काही भाग अपवाद ठरला; परंतु ऑगस्ट आणि सप्टेंबर या दोन महिन्यांमध्ये पावसाने कहर केला. मुंबईपासून नागपूरपर्यंत आणि धुळ्यापासून माण, खटावपर्यंत ढगफुटीसारखा पाऊस झाला. नगर, बीड, सोलापूर, नांदेड, धाराशिव हे जिल्हे पर्जन्यछायेखाली येतात; परंतु या जिल्ह्यांमध्ये पाऊस आणि पुराने थैमान घातले. यावर्षी राज्यात बहुतांश मंडलांमध्ये अतिवृष्टी झाली. त्यापेक्षाही ढगफुटी चिंताजनक आहे. आकाशातून पाणी ओतावे, तसा पाऊस कोसळत होता. या पावसापुढे पिके तग धरू शकली नाहीत. दुष्काळी प्रदेशात नागरिकांना पुरातून बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण दल, राज्य आपत्ती निवारण दल आणि लष्कराला पाचारण करावे लागले. उसाच्या शेतीतून बोटी चालवून तसेच हेलिकॉप्टरद्वारे पुरात अडकलेल्यांना बाहेर काढावे लागले. गेल्या जानेवारीपासून आतापर्यंत झालेल्या अवकाळी पावसाने, अतिवृष्टीने तसेच ढगफुटीने लाखो एकरातील पिकांचे नुकसान झाले. प्राणहानी झाली. जनावरे वाहिली. या फटक्यापेक्षा या पावसाने जमीन खरडून निघाली, हे नुकसान मोठे आहे. अन्य नुकसान भरून तरी काढता येईल; परंतु जमिनीचे नुकसान कसे भरून काढणार हा महत्त्वाचा प्रश्न आहे. माती तयार व्हायला शेकडो वर्षे लागत असल्यामुळे सुपीक माती वाहून गेल्याने शेतकरी हतबल झाला आहे. गेल्या आठ महिन्यांमध्ये सरकारी मदत धड मिळाली नसल्याने शेतकऱ्यांच्या संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. मंत्र्यांना अडवण्याचे, त्यांच्याविरोधात रोष व्यक्त करण्याचे प्रकार वाढले आहेत.

सरकार आणि प्रशासन यासंदर्भात कामाला लागले आहे. विरोधकांनी आरोप केल्यानंतर तसेच शेतकऱ्यांच्या संतप्त भावना पाहून सरकारने जानेवारी ते ऑगस्टपर्यंतच्या नुकसानीपोटी मदत म्हणून दोन हजार ११५ कोटी रुपयांची मदत जाहीर केली. खरे नुकसान तर सप्टेंबरमधील आहे. त्याच्या नुकसानीचे पंचनामे अद्याप झालेले नाहीत. सरकारी मदतीबरोबरच विमा कंपन्यांना कामाला लावून पीकविम्याची प्रकरणे तातडीने निकाली काढायला हवीत. या पातळीवर राज्य सरकार काही करत आहे, असे दिसत नाही. अतिवृष्टी, ढगफुटी, महापुराने घरे, जनावरे, पिकांची हानी झाली. मनुष्यहानी झाली. गेल्या शतकात एवढा पाऊस आणि ढगफुटीच्या इतक्या घटना कधीच घडल्या नव्हत्या. एकट्या सोलापूर जिल्ह्यात पाच लाख हेक्टर जमीन खरवडून निघाली. त्याचा नुकसान भरपाईत समावेश नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी हा मुद्दा मांडला. त्यामुळे सरकारने मदतीचा नवीन निकष ठरवायची गरज आहे. परभणीमध्ये वादळी पावसाने पारंपरिक पिकांसह नगदी पिके शेतकऱ्यांच्या हातून हिसकावून घेतली आहेत. जालन्यात रात्रभर झालेल्या पावसामुळे नद्या नाले एक झाले. शेती, पिके पाण्याखाली बुडाली. अनेकांच्या घरात पाणी शिरले. शिरूर कासारमध्ये सिंदफना नदीला पूर आला. पुराचे पाणी परिसरातील घरांमध्ये, दुकानांमध्ये शिरले.

प्रा. अशोक ढगे

नगर जिल्ह्यातील पाथर्डी, शेवगाव, जाम खेड, बीड जिल्ह्यातील आष्टी, शिरूर कासार, धाराशिव जिल्ह्यात भूम, परंडा, नांदेड जिल्ह्यात मुखेड, सोलापूर जिल्ह्यात करमाळा, बार्शी, माढा, पंढरपूर, सातारा जिल्ह्यात माण, पुणे जिल्ह्यात हवेली, बुलडाणा जिल्ह्यात चिखली आदी ठिकाणी ढगफुटी होऊन होत्याचे नव्हते झाले. काही लोकांच्या तर फक्त अंगावरची वस्त्रेच उरली. अशा परिस्थितीत मानवतावादी दृष्टिकोनातून मदत करायला हवी; परंतु जीएसटी कमी झाल्याच्या आणि सणासुदीच्या खरेदीच्या उत्सवात सहभागी झालेल्या दुसऱ्या वर्गाला शेतकऱ्यांचे आसू दिसत नाहीत. पूर आणि पावसामुळे रस्ते बंद झाले. अनेक ठिकाणी पूल नाहीत. जालन्यात एका लहान मुलाला भर पाण्या-पावसातून खांद्यावर घेऊन दवाखान्यात हलवण्यात आले; परंतु त्याचा मृत्यू झाला. अशा निसर्गकोपाच्या वेळी आपल्या मूलभूत सुविधा किती तोकड्या आहेत, याचा प्रत्यत येतो. नगर जिल्ह्यातील करंजी परिसरातील असाच एक व्हिडीओ व्हायरल झाला. मुसळधार पाऊस ही एक वेदनादायक कहाणी आहे. दर काही वर्षांनी तिची पुनरावृत्ती होते. त्याचे दुष्परिणाम वर्षानुवर्षे वाढत आहेत. मॉन्सूनमध्ये अचानक झालेली ही वाढ भयावह आहे. भूस्खलन, अचानक पूर, जलजन्य आजार, सर्पदंश, मानव आणि गुरांचे मृत्यू, अपघात आणि आर्थिक नुकसान हे सर्व मुसळधार पावसाचे परिणाम आहेत. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये पावसामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. दिल्ली, राजस्थान आणि बिहारमधील अनेक भागांना मोठा फटका बसला आहे.

मुंबई, गुजरात आणि इतर राज्यांमध्ये मुसळधार पावसाने लोकांचे नुकसान केले आहे, तर झारखंड, छत्तीसगड, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि ईशान्येकडील बहुतेक भाग याचा सामना करत आहेत. जागतिक बँकेच्या एका अभ्यासातून दिसून आले आहे, की २०४० पर्यंत पुरामुळे बाधित लोकसंख्या सहापट वाढून २.५ कोटींहून अधिक होईल. मुसळधार पाऊस, पूर, ढगफुटी आणि भूस्खलनामुळे झालेल्या नुकसानाचे मूल्यांकन करण्यासाठी केंद्र सरकारने आंतर-मंत्रालयीन केंद्रीय पथके स्थापन केली आहेत. भारतात नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे आर्थिक नुकसान सतत वाढत आहे. २०१३ ते २०२२ दरम्यान दरवर्षी सरासरी ६६ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले. अतिवृष्टी आणि पुरात 'विकास' देखील वाहून जातो. रस्ते, पूल, वीज आणि पाणीपुरवठा यासारख्या सार्वजनिक सुविधा नष्ट होतात आणि वाचलेल्यांचे जीवनदेखील कठीण होते. दर वर्षी आपल्याला सरासरी ५,६२९ कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान आणि १,७०० हून अधिक मृत्यूंना सामोरे जावे लागते. प्रश्न असा आहे की या आर्थिक, सामाजिक आणि मानवी दुर्घटनेवर कायमस्वरूपी उपाय काय आहे की नाही? प्रतिबंधात्मक उपाययोजना कधी अंमलात आणल्या जातील? सर्व महानगरपालिकांनी 'वादळपाणी व्यवस्थापन मास्टर प्लॅन' बनवायचा होता, तो कधी बनवायचा होता? प्रत्येक घर आणि अपार्टमेंटमध्ये छतावरील पावसाच्या पाण्याची साठवणूक अनिवार्य करायची होती, तो कधीपर्यंत पूर्णपणे अंमलात आणला जाईल?

वस्तुत: शहरांमध्ये 'स्मार्ट सिटी' प्रकल्पात ड्रेनेज मॅपिंग आणि डिजिटायझेशन करायचे होते. भूमिगत ड्रेनेज आणि 'ड्रेनेज सिस्टीम'चे 'जीआयएस' तंत्रज्ञानावर मॅपिंग करायचे होते. त्यामुळे त्यांचे अतिक्रमण थांबवता येणार आहे. त्यांची वेळेत दुरुस्ती करता येईल. यावर प्रगती कुठे आहे? नवीन वसाहतींमध्ये भूमिगत जलाशय तयार करून पावसाचे पाणी वाचवण्याची आणि पाणी साचू नये ही योजना चांगली होती; पण त्याचे काय झाले? शहरीकरण आणि रस्त्यांच्या जाळ्यामुळे सिमेंटेड पृष्ठभाग वाढला आहे. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही. भूस्खलन रोखण्यासाठी भू-तंत्रज्ञान अभियांत्रिकीचा अवलंब करावा लागतो. भिंतीची देखभाल, ड्रेनेज चॅनेल आणि जैव-अभियांत्रिकी तंत्रे लक्षात घेऊन संगणक मॉडेलिंगमध्ये पूर आणि पाणी साचण्याच्या शक्यतेचे भाकित करायचे होते.

यासाठी, डॉपलर रडार, योग्य सेन्सर्स, डिजिटल हायड्रोलॉजी तंत्रे, उपग्रह आणि रिमोट सेन्सिंगचा वापर करावा लागला. त्यामुळे नद्यांचा प्रवाह आणि भूस्खलन क्षेत्रांचे वास्तविक वेळेत निरीक्षण करता येईल. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्याचे आश्वासन सरकारने दिले असले, तरी शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी समाजातील अन्य घटकांनीही खारीचा वाटा उचलला पाहिजे. त्याचे कारण शेतीचा सकल राष्ट्रीय उत्पन्नात १७-१८ टक्के वाटा आहे आणि त्यावर अवलंबित्वाची संख्या ५९ टक्क्यांहून अधिक आहे. **

'गुणवत्ताहीनतेच्या अस्तित्वासाठीचे षड्यंत्र'

मानवजातीच्या इतिहासाकडे आपण जर बारकाईने पाहिले, तर एक गोष्ट ठळकपणे दिसून येते गुणवत्तेचा सतत अपमान करण्याचा, तिला दडपून टाकण्याचा प्रयत्न करणारा एक अदृश्य प्रवाह नेहमीच समाजात अस्तित्वात राहिला आहे.

कारण माणूस कितीही प्रगल्भ झाला तरी त्याचा अहंकार, त्याचा मत्सर, त्याचा संकुचित स्वभाव त्याला वारंवार मागे ओढत राहतो.

संकुचित मनाची माणसं विघ्नसंतोषी असतात. दुसऱ्याला वर उचलण्यात नव्हे तर खाली खेचण्यातच धन्यता मानतात.

त्यांच्याकडे स्वतःची गुणवत्ता, स्वतःची बौद्धिक संपत्ती, स्वतःचे तेज दाखवण्याची ताकद नसते. पण सेवा ज्येष्ठतेचा मोठेपणा, पदाचा गर्व, ''आम्ही अनुभवी आहोत'' ही ढाल घेऊन ते जगतात.

मग जेव्हा एखादा नवोदित कर्मचारी, एखादा तरुण प्रतिभावंत, आपली गुणवत्ता घेऊन पुढे येतो, तेव्हा या वरिष्ठांच्या मनात एक काळी भीती घर करून बसते.

''हा माझ्यापेक्षा वर कसा काय? हा माझं स्थान हिरावून नेईल की काय?''

या विचारांनी त्यांच्या मनातला आत्मविश्वास कोलमडतो आणि सुरू होतो गुणवत्तेला संपवण्याचा कटकारस्थानांचा खेळ!

गुणवत्तेची संगीत खुर्ची सातत्याने आपल्या आयुष्यात डावपेच आखत असते.

गुणवत्ताहीन लोकांना प्रत्येक क्षण स्पर्धेचा भास होतो.

ते दुसऱ्याच्या छोट्या चुका डोंगराएवढ्या करतात, खोट्या चुका निर्माण करतात, अफवा पसरवतात, पाठिमागे बोलतात.

त्यांच्या डोळ्यांसमोर एकच ध्येय असतं ''हा माझ्यापुढे जाऊ नये!''

पण खरी गुणवत्ता ही सुगंधासारखी असते.

तिला कितीही दाबलं तरी ती आपला सुगंध चार दिशांना पसरवतेच.

त्यामुळे नवोदित माणूस ध्येयवेडा, कष्टाळू, प्रामाणिकसंघर्षाचे अनेक वादळे पायदळी तुडवत पुढे जातो.

त्याच्या प्रामाणिकतेसमोर खोटेपणाचे

धनंजय शेटये

षड्यंत्र तोंडघशी पडते.

निसर्गाची शिकवण खरी शिकवण वेगळीच असते.

निसर्ग हा इथे खरा गुरु आहे.

झाडांच्या पानगळीकडे पाहिलं की जीवनाचं एक अनोखं तत्त्व डोळ्यासमोर उभं राहतं.

जेव्हा पाने पिकतात, तेव्हा ती आनंदाने, हलक्या झुळुकीत नाचत, रम्य वाऱ्यासोबत खेळत खाली उतरतात.

त्यांच्या मनात शोक नसतो, उदासी नसते. उलट त्यांना आनंद असतो की ''आता आमचं कार्य संपलं, आता नवी पालवी यावी, नव्या जीवनाला संधी द्यावी!''

त्यांचा त्याग म्हणजे भविष्यातील हिरवाईचं बीज असतं.

यात एक गंभीर संदेश दडलेला आहे.

पानगळ म्हणजे पराजय नाही, तर नवीन सुरुवातीसाठी केलेला आनंदी त्याग आहे.

झाडाच्या पायथ्याशी पडलेली पानं पाचोळा होतात आणि त्याच पाचोळ्यातून जमिनीची सुपीकता वाढते.

त्याच मातीमधून नव्या पालवीला उर्जा मिळते.

यामध्ये आहे एक सामाजिक करार असतो.

''जुनी पिढी आनंदाने आपलं स्थान सोडते आणि नवी पिढी तेजाने उगवते!''

सामंजस्याचा अनोखा धडाझाडांकडून मिळतो.

झाडं सूर्यप्रकाश, पाणी, माती यांच्या समन्वयातून आपलं अन्न तयार करतात.

त्यांची मुळे पाणी व क्षार शोषून घेतात आणि प्रत्येक पानापर्यंत समानतेने पोहोचवतात.

कोणतं पान लहान आहे, कोणतं मोठं आहे, कोणतं वर आहे, कोणतं खालच्या फांदीवर आहे या निकषावर झाडं भेदभाव करत नाहीत.

सर्वांनाच समानतेने अन्न पोहोचतं.

निसर्गाच्या या प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेत भ्रष्टाचार नाही, पक्षपात नाही, अहंकार नाही.

सर्वत्र आहे तर सामंजस्य, समभाव आणि सहकार्य!

माणसांत मात्र चित्र उलटं दिसतं.

दुसऱ्याला वरचढ ठरू न देण्याचा, त्याच्या उंच भरारीला रोखून धरण्याचा प्रयत्न सतत चालू असतो.

मत्सर, कपट, कटकारस्थान, द्वेष यांचे डाव रचले जातात.

खोटी स्तुती, खोटी निंदा, पाठिमागे बोलणेहीच त्यांची शस्त्रं होतात.

पण खरे तेजस्वी लोक कधीही घाबरत नाहीत. गुणवत्ता ही निसर्गाच्या नियमाप्रमाणे आहे. ती रोखली तरी उगवते, दाबली तरी उमलते, विझवली तरी तेजस्वी होते. समाजात आणि कार्यक्षेत्रात ज्यांनी आपली खरी गुणवत्ता दाखवली, प्रामाणिकतेने मेहनत घेतली, कर्तृत्वाने मार्ग काढला, त्यांना कोणतेही षड्यंत्र थांबवू शकत नाही.

गुणवत्ताहीनतेची ही पोकळ भिंत लवकरच कोसळते आणि तेजस्वी गुणवत्तेचा प्रकाश सर्वत्र पसरतो.

म्हणूनच संकुचित वृत्ती सोडून, निसर्गासारखा समभाव ठेवून, एकमेकांच्या गुणवत्तेला दाद देणं हाच खरी प्रगतीचा मार्ग आहे. **

सोशल मीडियावरील रिल्स

रिल्स बनवणे आता एक फॅड बनवून राहिले आहे. कोणीही उठतो आणि रिल्स बनवतो. अर्थात रिल्स बनवण्यावर कुठल्याही प्रकारचं बंधन नाही. खुशाल बनवा. मात्र रिल्स बनवताना आपण समाजाला कोणत्या प्रकारचा संदेश देतोय याचं तारतम्य बाळगणे गरजेचे झालं आहे. कित्येकदा रिल्स बनवणाऱ्या कडे विषय नसतात त्यामुळे इकडचे तिकडचे रिल्स पाहून तशाच प्रकारचे रिल्स बनवले जातात. दुसऱ्यांची नक्कल केली जाते. खऱ्या खोट्याची शहानिशा केली जात नाही. इकडून उचलून तिकडे टाकणे केवळ हेच प्रकार सुरू असतात. आणि रिल्स मध्ये कोणी काहीही सांगतो. हा काढा करून प्या. तो काढा करून प्या. हळद टाकून प्या. कलोंजी टाकून प्या. स्टॅमिना वाढेल सौंदर्यात भर पडेल. रंग गोरा होईल. त्वचारोग होणार नाहीत. आकार वाढेल. वजन कमी होईल वजन वाढेल. अशा कितीतरी प्रकारच्या रिल्स हल्ली सामाजिक प्रसार माध्यमावर बघायला मिळतात. पण ते काही खरे नाही. यामध्ये कुठल्याही प्रकारची शाश्वती नाही.

रिल्स टाकणारा संबंधित विषयातील तज्ञ असेलच याची कुठल्याही प्रकारची खात्री नाही. त्यामुळे नागरिकांनी कुठल्याही प्रकारच्या रिल्स पाहून अघोरी कृती आणि वेगळ्या प्रकारचे प्रयोग निदान आरोग्य संबंधित तरी करून शरीराची हानी करून घेऊ नये. आयुर्वेदाच्या नावाखाली किती तरी लोकांनी खोट्या रिल्स बनविल्या आहेत. घरच्या घरी इलाज करण्याच्या नादात शरीराचे अनेक तऱ्हे मोठ्या प्रकारचे नुकसान होऊ शकते. डॉक्टरांच्या योग्य सल्ल्याशिवाय कुठल्याही प्रकारची घरच्या घरी औषधे बनवू नका. यामध्ये नुकसान होण्याचीच जास्त शक्यता असते. या सामाजिक प्रसारमाध्यमावर बंधने घालू शकत नसल्यामुळे कोणी कुठल्याही प्रकारच्या रील्स बनवून कुठल्याही प्रकारचे चूकीचे संदेश देऊ

निलेश साठे

पाहतो आहे. आपले नुकसान झाले तर आपण कोणाला विचारूही शकत नाही. लाईक आणि सबस्क्राईब मिळवण्यासाठी हे रिल्स बनवणारे कुठल्याही थराला जाऊ शकतात. काही लोक खूप मोठे मोठे दावे करू लागले आहेत. कॅन्सर वर इलाज लकव्यावर इलाज थायरॉईड वर इलाज बीपी व शुगर वर इलाज हे रोग समुळ नष्ट करण्याचे अनेकांनी दावे केलेले आहेत. परंतु ते याची कुठल्याही प्रकारची खात्री देत नाहीत. पैसे मिळेपर्यंत ते तुम्हाला खात्री देतात आणि गोड गोड बोलतात. एकदा त्यांचे काम झाले की मग मात्र प्रतिउत्तर सुद्धा देत नाहीत. तुम्ही पथ्य नसेल पाळले. औषधे योग्यवेळी खाल्ली नसतील. तुम्ही त्याचा क्रमवार चूकविला. त्यामुळे तुम्हाला फरक पडला नाही अशा प्रकारची उडवा उडवीची उत्तरे दिली जातात. अशा घटनांमध्ये अनेकांची फसवणूक झालेली आहे. आर्थिक नुकसान तर होतेच परंतु प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागते. त्यामुळे सुजाण नागरिकांनी अशा रील्स पाहून कुठल्याही प्रकारचे काढे किंवा घरच्या घरी दवा बनवण्याची तसदी घेऊ नये. तुमच्या डॉक्टरांना विचारा आणि त्यांच्या सल्ल्याने पुढे जा. या प्रसारमाध्यमा वरील रिल्स पाहून जर तुम्ही काही वेगळा प्रयोग करून पाहिला तर त्यामध्ये केवळ आणि केवळ नुकसान होण्याचीच दाट शक्यता आहे.

खरे पाहता आपल्याकडे आजार आणि समस्या एवढ्या आहेत की मनुष्य अक्षरशः हैराण आणि परेशान झालेला आहे. काय करावे कुठे जावे हे सुचेनासे होते. योग्य मार्गदर्शक भेटत नाही. त्यामुळेच मग अशा सामाजिक प्रसारमाध्यमावर काहीतरी इलाज शोधला जातो. मग या रिल्स नजरेस पडतात. त्या पाहूनच मग हे अघोरी प्रकार सुरू होतात. आर्थिक आणि शारीरिक नुकसान झाल्यानंतर मात्र सगळे समजते. तोवर मात्र उशीर झालेला असतो. त्यामुळेच शरीरावर वेगळा प्रयोग करण्याआधी एखाद्या डॉक्टरला दाखवा आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच पुढील कृती आणि ध्येय ठरवा. चुकीच्या कृतीने शरीराचं झालेलं नुकसान पुन्हा कधीही भरून येणार नाही. सावध रहा सतर्क रहा. **

देवीच्या मारक रूपाची उपासना : काळाची गरज

देवीने महिषासुराशी नऊ दिवस युद्ध करून नवव्या दिवशी त्याचा वध केला. त्याचे प्रतिक म्हणून दांडिया खेळला जातो. आजतिमीला मात्र या उत्सवाला ग्लॅमरस स्वरूप आले असून मुळ उद्देशालाच हरताळ फासली जात आहे. परिणामी अत्याचाराचे प्रमाण देखील वाढले आहे. त्यामुळे देवीच्या मारक रूपाची उपासना करणे काळाची गरज बनली आहे.

जगन घाणेकर

नवरात्र हा खरेतर मांगल्याचा आणि पावित्र्याचा उत्सव. स्त्रीशक्तीचा जागर करण्याचा उत्सव, देवीच्या पराक्रमाची उपासना करण्याचा उत्सव. महिषासुराशी नऊ दिवस युद्ध करून नवव्या रात्री देवीने महिषासुराचा वध केला. या युद्धाचे प्रतीक म्हणून टिपऱ्या म्हणजेच दांडिया खेळल्या जातात. आजमितीला मात्र या उत्सवाला आलेले ग्लॅमरस स्वरूप उत्सवाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. चांगले नृत्य करता यावे म्हणून तरुणींसह तरुणही एक म हिना अगोदरपासून नृत्याचे क्लासेस घेऊ लागले आहेत. पाठ उघडी ठेऊन त्यावर रंगरंगोटी करण्याचे किळसवाणे फॅड गेल्या काही वर्षांपासून तरुणींमध्ये शिरले आहे. नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करणे, कपड्यांसह त्यांना मॅचिंग आभूषने परिधान करणे, साजेसा मेकअप करणे, गरबा नृत्य करताना अथवा दांडिया खेळताना इतरांपेक्षा वेगळे दिसण्याचा प्रयत्न करणे याकडेच महिलांचा अधिक कल दिसून येतो. एका राक्षसी प्रवृत्तीवर प्रकट स्त्रीशक्तीने युद्ध करून मिळवलेला विजय म्हणजे नवरात्रीचा उत्सव. या नऊ दिवसांत देवीने युद्ध करून क्षात्रतेजाच्या उपासनेचे महत्व पटवून दिले. स्त्री ही अबला नसून प्रसंगी अन्याय अत्याचाराचा कर्दनकाळ ठरू शकते हे देवीने स्वतः युद्ध करून दाखवून दिले. आज आपण नवरात्रीच्या काळात दांडिया किंवा टिपऱ्या खेळतो, हा खेळ नसून ते युद्धाचे प्रतीकात्मक स्वरूप आहे हेही आज अनेकांना माहित नाही.

आजमितीला स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना कमालीच्या वाढल्या आहेत. ३ वर्षाच्या बालिकेपासून वयोवृद्धाही आज सुरक्षित नाहीत. बदलापूर पाठोपाठ पुण्यातील घटनेने साऱ्या राज्याला हादरवून सोडले. दुसरीकडे लव्ह जिहादरूपी राक्षस हिंदू स्त्रियांना विविध आमिषे आणि प्रलोभने दाखवून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून हिंदूंचा वंशविच्छेद करू लागला आहे. राजकीय मंडळींना स्त्रियांच्या सुरक्षेपेक्षा राज्यात आपली सत्ता आणणे अधिक महत्वाचे वाटत असल्याने स्त्री सुरक्षेच्या दृष्टीने ठोस पावले उचललीच जात नाहीत. अशावेळी स्त्रियांनीच आपल्या सुरक्षेसाठी सज्ज झाले पाहिजे. समाजाची ढासळलेली नीतिमत्ता पाहता प्रतिकूल प्रसंगांना सामोरे जाण्याची वेळ स्त्रियांवर कधीही येऊ शकते यासाठी प्रत्येक स्त्रीने आपले शरीर आणि मन प्रतिकारक्षम ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता स्त्रियांनी स्वरक्षणाचे प्रशिक्षण घेणे आज अत्यंत गरजेचे बनले आहे. कराटे, लाठीकाठी यांसह आपल्या दैनंदिन वापरातील वस्तूंच्या आधारे स्वतःचे रक्षण कसे करावे, प्रवासात स्वरक्षणासाठी कोणती साधने स्वतः सोबत बाळगावीत यांचे विनामूल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि संघटना आज गावोगावी आहेत. त्यांचा लाभ करून स्वतःतील आत्मबल वाढवूया. जेव्हा कधी आपल्यावर प्रतिकूल प्रसंग येईल तेव्हा आपले नातेवाईक, मित्र मंडळी, पोलीस, राजकीय मंडळी आपले रक्षण करण्यास वेळेत पोहोचतील याची शाश्वती नाही अशा वेळी समोरच्याशी दोन हात करून त्याला धडा शिकवायचा असेल तर तेव्हढी शारीरिक आणि मानसिक क्षमता आपल्यामध्ये असणे आज आवश्यक आहे. आपल्यासोबत आपल्या परिसरातील, कार्यालयातील स्रियांना सबला बनवण्याचे दायित्व आज स्रियांनीच घेण्याची वेळ आली आहे. स्त्रियांना कायद्याचेही संरक्षण असल्याने समाजातील वासनांध प्रवृत्तीचा नायनाट करण्यासाठी स्रियांनीच पुढे यायला हवे. आजच्या स्त्रियांसमोर आदर्श हवा आहे तो रणरागिणी झाशीच्या राणीचा, राजमाता जिजाबाईंचा, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचा. राणी चेन्नमांचा. स्त्रीशक्तीचा या प्रकट रूपाची उपासना करण्याची वेळ आता आली आहे. त्यामुळे या नवरात्रीला नवरात्री उत्सवामागील भावार्थ समजून घेऊन दुर्गादेवीच्या मारक रूपाची उपासना करण्याचा संकल्प करा ! **

मेंदूला जपा !

वर्षभरातील विशिष्ट दिवशी देशपातळीवर तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर काही ''दिनविशेष'' साजरे केले जातात. त्या दिवशी त्याच्याशी संबंधित समाजातील अनेकांचे लक्ष वेधले जाते. त्यानिमित्ताने जनजागृती केली जाते. सामान्यपणे अशा विशिष्ट दिवशी, दरवर्षी जगातील विविध देशांत सभा, संमेलने होतात आणि चर्चासत्रे होतात. वृत्तपत्रांत लेख प्रसिद्ध होतात. आधुनिक काळात नभोवाणी, दूरचित्रवाणी आणि विविध दृकश्राव्य समाजमाध्यमे यांच्याद्वारे जगभरातील अनेकांपर्यंत संपर्क साधून, त्यांचे त्याविषयी प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला जातो.



दरवर्षी २२ जुलै हा ''जागतिक मेंदू दिन'', १३५ देशांत साजरा केला जातो. या दिनाचे आयोजन ''वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरॉलॉजी'' या संस्थेने २०१४ पासून सुरू केले. याचा उद्देश मेंदूच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे आणि मेंदू विकारांबाबत समाजातील समज वाढवणे आणि गैरसमज दूर करणे हा आहे. २०२५ च्या जागतिक मेंदू दिनाची मध्यवर्ती कल्पना ''सर्व वयोगटांसाठी मेंदूचे आरोग्य'' ही आहे. वर्षभर यादृष्टीने समाज प्रबोधनात्मक आणि मार्गदर्शक कार्यक्रम होणे अपेक्षित असते. त्यानिमित्ताने काही काळापूर्वी, सह्याद्री वाहिनीवरील एका आरोग्यविषयक कार्यक्रमामध्ये नागपूर येथील ज्येष्ठ मेंदूविकारतज्ज्ञ, पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांची मुलाखत झाली. जागतिक मेंदूतज्ज्ञसंघटनेचे डॉ. चंद्रशेखर मेश्राम हे एकमेव भारतीय प्रतिनिधी असून ते त्या संघटनेचे एक संचालक आहेत. सुरुवातीला डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी मेंदूची रचना कशी असते, हे मेंदूच्या आकृतीसह सांगून मेंदूचे महत्त्व स्पष्ट केले. गर्भावस्थेतील बालकापासून वृद्धावस्थेपर्यंत, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मेंदूला जपणे आणि त्याचे आरोग्य संभाळणे, प्रत्येक व्यक्तीच्या आणि संपूर्ण समाजाच्याही हिताचे असते. ही मोहीम मेंदूच्या विकारांबद्दल जागरूकता वाढवणे, लवकर निदान आणि उपचार सुनिश्चित करणे आणि मेंदूच्या आरोग्याविषयी समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे यावर केंद्रित केली गेली आहे.

मुक्तांगण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

मेंदूची वाढ मुलाच्या गर्भावस्थेपासूनच सुरू होते. त्यामुळे गर्भवती स्त्रीचा आहार, तिची मन:स्थिती, कौटुंबिक परिस्थिती हे घटक यासाठी अनुकूल असणे गरजेचे असते. मेंदू आपल्या शरीराच्या सर्व कार्यांचे नियंत्रण करतो. विचार, भावना, स्मरणशक्ती, शरीराची हालचाल, निर्णयक्षमता हे सर्व मेंदूवर अवलंबून असते. मेंदूचे आरोग्य उत्तम राखल्यास अर्धांगवायूचा झटका, विस्मृतीचा तीव्र आजार, कंपवात, मिर्गी यासारख्या विकारांचा धोका कमी होतो. मेंदूची क्षमता आणि लवचिकता आयुष्यभर टिकवण्यासाठी सुयोग्य जीवनशैलीचा प्रत्येकाने अंगीकार करण्याची गरज असते.

सरासरी आयुर्मान आजकाल सर्वच देशांत वाढत असल्याने, ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. वृद्धापकाळी शारीरिक आजार वाढताना दिसतात. विशेषतः तीव्र विस्मृतीचा आजार व्यक्ती आणि कुटुंबासाठी धोक्याचा ठरतो. असा आजार झाल्यावर त्यावर फारसे उपचारही उपलब्ध नाहीत किंवा सध्या तरी ते प्राथमिक अवस्थेत आहेत. मेंदूला जपण्यासाठी सर्वांनी काय करावे, हे डॉ. मेश्राम यांनी सविस्तरपणे स्पष्ट केले. प्रत्येक व्यक्तीला सहा ते आठ तास, रात्रीची झोप मिळणे आवश्यक आहे. सामान्यपणे प्रत्येकाने सूर्यास्तानंतर चार तासांनी झोपावे आणि सूर्योदयाबरोबर उठणे गरजेचे आहे. पुरेशा झोपेमुळे मेंदूचे आरोग्य सुधारते आणि मेंदू पुन्हा कार्यतत्पर होतो. सर्वांनीच मोबाईलचा वापर कमी करावा, असेही त्यांनी आग्रहाने सांगितले. वयाच्या वीस वर्षांपर्यंत तर फक्त तातडीच्या वेळीच मोबाईलचा वापर करावा. सध्या मोबाईलचा वापर आपल्या समाजातील सर्व वयोगटात वाढत आहे. हे भविष्यकाळात घातक ठरू शकते. मित्र, आप्तेष्ट, नातेवाईक यांच्याशी भरपूर गप्पागोष्टी करणे, मेंदूच्या उत्तम आरोग्यासाठी आवश्यक आहे. सर्वांनी जेवताना आणि समूहात परस्परांशी गप्पा मारताना, मोबाईल दूर ठेवणे हे नितांत गरजेचे आहे. सामान्यपणे प्रत्येकाने फक्त दोन वेळा जेवण घेणे पुरेसे आहे. त्यासाठी समतोल आहार उपयुक्त ठरतो. डबा, बाटली, पाकीट यामधील, बाजारात सहजपणे उपलब्ध असणारे,खाद्यपदार्थ शक्यतो टाळावेत. तंबाखू आणि मद्यपान या घातक सवयींम ुळे शरीर आणि मेंदू यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. त्यापासून नेहमीच दूर रहावे. फळे, पालेभाज्या यांचा आहारात भरपूर वापर करावा. साखरेचा वापरही किमान करणे गरजेचे आहे. डॉ.म ेश्राम यांच्या मते, पोटाचे आरोग्य उत्तम राखल्यास मेंदूचे आरोग्यही उत्तम राहते. कंपवाताचे कारण पोटाचे अनारोग्य आहे. यामुळेच पोटाला ''दुसरा



मेंदू'' असे म्हणतात.

प्लास्टिकच्या सार्वत्रिक आणि अतिरिक्त वापरामुळे विविध माध्यमांतून आणि आपल्या दैनंदिन खाद्यपदार्थांतून पोटामध्ये जाणाऱ्या प्लास्टिकचे अत्यंत सूक्ष्मकण मेंदूमध्येही पोहोचल्याचे डॉ. चंद्रशेखर यांनी सांगितले. विशेषतः प्लास्टिकच्या भांड्यातील गरम खाद्यपदार्थ, पाणी आणि शीतपेये टाळण्याचे त्यांनी सर्वांनाच कळकळीचे आवाहन केले आहे. नियमित शारीरिक व्यायामामुळे मेंदूचे आरोग्य सुधारते. मेंदूला चालना मिळावी म्हणून विशेषतः ज्येष्ठांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. नवनवीन गोष्टी शिकल्याने मेंदूची कार्यक्षमता वाढण्यास मदत होते आणि मेंदूचे अनेक आजार टाळता येतात. ज्येष्ठ नागरिकांनी वाचन, लेखन, गायन, नृत्य, पर्यटन, गप्पागोष्टी, नियतकालिकांतील कोडी सोडवणे यासारख्या आवडत्या छंदांमध्ये क्रियाशील राहिल्यास, मेंदूला उत्तम चालना मिळते. हे सारे आनंदाने, मनापासून केले तर, मेंदू आपल्याला जीवनभर उत्तम साथ देतो. म्हणूनच म्हणावेसे वाटते,

आपल्या मेंदूला जपा !!

**

ऑनलाईन खेळ, खरेदीचे संकट

सध्या ऑनलाईन खरेदीचा क्रेझ वाढत असताना घरबसल्या वेगवेगळ्या ॲपद्वारे खेळ खेळण्याचा ट्रेंड प्रचंड वाढला आहे. प्ले स्टोअरमधून एखादा गेम डाऊनलोड करून त्यामध्ये पैशांची गुंतवणूक करून अधिक पैसे मिळविण्याची ओढ वाढली आहे. मात्र त्याची, पडताळणी न झाल्यास ऑनलाईन खरेदी आणि खेळांचे धोके वाढण्याचे संकट निर्माण होत आहेत. त्यामुळे नागरिकांनी सतर्कता दाखवत ऑनलाईनवर भर देण्याची गरज आहे. ऑनलाईन खरेदी आणि खेळाचे संकट लक्षात ठेवूनच खेळ आणि खरेदी करावी.

प्रमोद जाधव

रायगड जिल्ह्यात औद्योगिकीकरणासह पर्यटन वाढत आहे. पर्यटनावर अधारित अनेक व्यवसाय जिल्ह्यामध्ये आहेत. या व्यवसायातून स्थानिकांना रोजगाराची संधी मिळते. जिल्ह्यात वेगवेगळे लहान मोठे उद्योगधंदे असून मोठमोठ्या कंपन्या आहेत. या कंपन्यांसह उद्योगांमधून हजारोंच्या हातांना काम मिळत आहे. जिल्ह्यामध्ये यापुर्वी वेतनासह सर्व आर्थिक व्यवहार रोखीत केले जात होते.

परंतु बदलत्या आधुनिकतेमुळे जिल्ह्यात सर्व रोखीत व्यवहार कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे. गेल्या आठ वर्षापासून जिल्ह्यात ऑनलाईन व्यवहार वाढत आहे. विशेष म्हणजे लॉकडाऊनच्या काळापासून ऑनलाईन व्यवहार खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. वेगवेगळ्या बँका संस्था शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून ऑनलाईन खरेदीची जनजागृती करण्यात आली. त्यामुळे भाजी विक्रेत्यांपासून सर्वच लहान-मोठ्या व्यवसायांचे आर्थिक व्यवहार ही ऑनलाईन होऊ लागले. लॉकडाऊनच्या काळात घरबसल्या नवनवीन ॲपमार्फत खरेदी-विक्री तसेच ऑनलाईन खेळ खेळण्यावर अधिक भर देण्यात आला. त्यामुळे ऑनलाईन खेळाचा कल जिल्ह्यात वाढू लागला. नाक्यानाक्यावर तरूण मंडळी एकत्र येऊन ऑनलाईन गेम खेळण्यामध्ये मग्न राहू लागली. मोबाईलमध्ये वेगवेगळे नवनवीन ॲप उपलब्ध झाले आहेत. या ॲपमार्फत खरेदी विक्री व्यवहारासह पैशांचे व्यवहारदेखील ऑनलाईन होत आहेत. त्यामुळे जिल्हयात ८० टक्केपेक्षा अधिक नागरिक ऑनलाईन व्यवहार करीत आहेत.

सध्या जुगार मटका सारखे अवैध धंदे देखील ऑनलाईन खेळले जात आहेत. मोबाईलवर ए.एम. ९९९, मधुर मटका, लकी स्पाईंस, तीन पत्ती अशा अनेक प्रकारच्या ऑनलाईन गेमिंग ॲपच्या जाहिराती येत आहेत. वारंवार होणाऱ्या जाहिरातीला प्रवृत्त होऊन जास्तीचे पैसे कमविण्याच्या हेतूने अनेक तरुण व काही मंडळी ऑनलाईन गेमिंगला बळी पडत आहेत. कोणतीही पडताळणी न करता, ॲप डाऊन लोड करून त्या ॲपद्वारे ऑनलाईन खेळ खेळण्यावर अधिक भर दिला जात आहे. यामध्ये विशेष करून तरुणांसह मध्यम वयोगटातील मंडळीचा अधिक समावेश आहे. मोबाईलवर गेम खेळण्यावर अधिक पैसे भेटत असल्याने ऑनलाईन गेम खेळणाऱ्यांची संख्या अधिक वाढली आहे. तासनतास मोबाईवर मग्न राहून अनेक मंडळी ऑनलाईन गेम खेळत असतात.

ऑनलाइन जुगारामुळे व्यसन, आर्थिक नुकसान, फसवणूक सारखे अनेक धोके आणि परिणाम निर्माण होत आहेत. ऑनलाईन जुगार हे व्यसन बनले आहे. ही एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त्याचा व्यक्तीच्या आरोग्यावर नातेसंबंधावर आणि कल्याणावर एकूणच परिणाम होतो. ऑनलाइन जुगार खेळण्याचे एक महत्त्वाचे धोके आणि परिणाम म्हणजे आर्थिक नुकसान आहे. जिंकण्याच्या आणि अधिक पैसे मिळविण्याच्या उत्साहाने मोठी आर्थिक फसवणूक होत असल्याचे प्रकार समोर आले आहेत. ऑनलाईन गेमिंग आणि जुगाराच्या ॲप्सच्या माध्यमातून लोकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या एका अत्याधुनिक रॅकेटचा पर्दाफाश रायगड पोलीस दलातील सायबर गुन्हे शाखेने केला आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून तब्बल ४४ म्युल बँक खात्यांमधील तब्बल १९ कोटी ४४ लाखांहून अधिक रक्कम गोठविण्यात आली आहे. मोबाईलवर वारंवार ऑनलाइन गेमिंग ॲप्सची जाहिरात दिसत होती. कायदेशीर असल्याचा भास झाल्याने ९९९, माधुर मटका, ही ॲप्स डाऊनलोड करून त्यात दहा हजार रुपये त्यांनी गुंतवले. मात्र त्यांना कोणताही परतावा न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तक्रार दाखल केली. सायबर पोलिसांनी तपासात २५ पेक्षा जास्त ऑनलाईन गेमिंग ॲप्स उघड केले आहेत. यात AM999, Madhur Matka, PARIMATCH, BETVIBE, Casinodays, Bluechip, 1XBET, Teenpatti, Forex, 4rabet यांसारख्या लोकप्रिय नावांचा समावेश आहे. हे सर्व ॲप्स गुगल प्ले स्टोअरवर सहज उपलब्ध असल्याने अनेकांना ते कायदेशीर वाटत होते.

राजस्थानमधील भारमल हनुमान मिना याला अटक केली. आणखी पाच आरोपींचा शोध सुरु असून अल्पवयीन मुलांचादेखील समावेश असल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणाने रायगड जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली आहे. मागील काही वर्षापासून ऑनलाईन फसवणूकीचे अनेक प्रकार समोर आले आहेत. बेकायदेशीर ॲप्समध्ये अडकवून आर्थिक लूट करणारी टोळी सक्रीय झाली आहे. त्यामुळे जिल्हयातील नागरिकांनी ऑनलाईन खरेदी अथवा ऑनलाईन गेमिंग करताना काळजी घेण्याची गरज आहे.

घरबसल्या मोबाईलवर ऑनलाईन गेम खेळणे ही एक फॅशन झाली आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातील असंख्य मंडळी ऑनलाईन गेमच्या आहारी गेली आहेत. त्यात काहींना धनलक्ष्मी पावते तर काहींना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. प्लेस्टोअरमधून वेगवेगळे गेम डाऊनलोड करून ऑनलाईन गेम खेळण्याची क्रेझ दिवसेंदिवस वाढत आहे. ही क्रेझ आनंद देणारा असला तरीदेखील निष्काळजीपणाने या खेळाच्या आहारी गेल्याने त्याची मोठी हानी होत असल्याचे चित्र जिल्ह्यात आहे.

या खेळामुळे अनेकवेळा मानसिक संतुलनही बिघडण्याचे चित्र असतानाही पालक वर्ग याकडे गांभीर्याने लक्ष का देत नाही असा सवाल उपस्थित केला जात आहे. ऑनलाईन गेम खेळत असताना आणि मोबाईलवरील प्लेस्टोअरमधून गेम डाऊनलोड करताना प्रत्येकाने काळजी घेणे गरजेचे आहे. अन्यथा मोठी आर्थिक हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रायगड पोलिसांनी ऑनलाईन गेमद्वारे फसवणूक करणाऱ्या रॅकेटचा शोध लावून जिल्ह्यातील नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. **

ए आय मसाला

नवीन फॅशन नवीन ट्रेड वशिला
तुमच्या पुढ्यात बसलाय हा
मसाला, फॅशन बनवी चविष्ट
खमंग, नव्या पिढीचा नवा उमंग
त्याचा धरला एकदा संग
तो दाखवि निराळे रंग
जेवण हॉटेली मल्टी मॉडेली
ॲपला ।। १।।
ट्रेंड चवीला झणझणीत
मानवी भावना चघळीत
नवनवे शोधाचे कोटिंग
स्व अस्तित्वाची कटिंग
बनाना जिबली करपलो आरशी
रूपाला ।।२।।
आता ए आय झाला पोशिंदा
तरुणांना नाही काम नि धंदा
स्वयंचलित यंत्र मानवा
मृत झाल्या मानवी भावना
जिभेचे लाड इमेज काढ सोसना
भार खिशाला ।।३।।

- सौ. केशर वेखंडे , ठाणे

पाऊस,एक शिक्षा!

कसे म्हणावे ह्याला पाऊस हे
तर असती प्रपात
हत्तीच्या सोंडेनी कोसळे
करितो वाताहात शहरांची त्या
बेटे झाली रस्ते झाल्या नद्या
बाहेर पडणे अशक्य झाले
आज अथवा उद्या ।।
दोष तयासी द्यावा कैसा केली
पापे आम्ही शिक्षा त्याची
आज भोगतो तयात नाही
कमी फोडू डोंगर, समुद्र हटवू,
वने तोडू सारी फक्त फायदा
बघू स्वतःचा आम्ही व्यापारी
नदीनाले ते भरू कचऱ्याने
करू नष्ट त्यांना विचार नाही
जराही केला घाण टाकताना
सूड उगवतो निसर्ग त्याचा
चूक त्याची नाही
करितो शिक्षा गुन्ह्याची
आमुच्या तोही कमी नाही

- विलास फडके

श्रीलंकेची कडवी झुंज; पाकिस्तानला भिडण्यापूर्वी सूर्यासेनेला चिमटा

भारतीय संघाचा सुपर विजय

| भारत | वृत्तसंस्था |

भारतीय संघाने आशिया कप २०२५ स्पर्धेतील सुपर ४ फेरीतील सहाव्या आणि अंतिम सामन्यात सुपर ओव्हरमध्ये श्रीलंकेवर मात केली आहे. भारतीय संघाने श्रीलंकेसमोर २०३ धावांचे आव्हान ठेवले होते. श्रीलंकेलाही प्रत्युत्तरात पाथुम निसांका याने केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर २० ओव्हरमध्ये २०२ धावाच करता आल्या. त्यामुळे सामना बरोबरीत राहिला. भारतीय संघाने त्यानंतर श्रीलंकेला सुपर ओव्हरमध्ये २ धावांवर २ झटके देत ऑलआऊट केले. भारतीय संघाने त्यानंतर ३ धावांचे आव्हान हे पहिल्याच बॉलवर पूर्ण केले. यासह भारताने एकूण आणि सलग सहावा विजय मिळवला. भारतीय संघानेयासह सुपर ओव्हरमध्ये अजिंक्य राहण्याचा विक्रम कायम ठेवला आहे.

त्याआधी निसांकाचे शतक आणि परेरा याच्या अर्धशतकाच्या जोरावर श्रीलंकेने २०३ धावांचा पाठलाग करताना १९ ओव्हरमध्ये ५ विकेट्स गमावून १९१ धावा केल्या होत्या. त्यामुळे श्रीलंकेला अंतिम ओव्हरमध्ये १२ धावांची गरज होती. हर्षित राणाने शेवटची ओव्हर टाकली. निसांका पहिल्याच बॉलवर आऊट झाला. हर्षितच्या बॉलिंगवर चक्रवर्ती याने पाथुमचा अप्रतिम कॅच घेतला. त्यामुळे आता श्रीलंकेला ५ बॉलमध्ये १२ हव्या होत्या. हर्षितने टाकलेल्या पुढील ४ बॉलमध्ये दासून शनाका आणि जनिथ लियानगे या जोडीने ९ धावा केल्या. त्यामुळे श्रीलंकेला शेवटच्या बॉलमध्ये विजयासाठी ३ धावांची गरज होती. शेवटच्या बॉलवर अक्षर याच्याकडून मिस फिल्डिंग झाली. त्यानंतरही श्रीलंकेच्या जोडीला २ धावाच करता आल्या. यासह दोन्ही संघांच्या समसमान धावा झाल्या आणि मॅच 'टाय' झाली.

श्रीलंकेने २० ओव्हरमध्ये ५ विकेट्स गमावून २०२ धावा केल्या. श्रीलंकेसाठी निसांकाने ५८ बॉलमध्ये ६ सिक्स आणि ७ फोरस १०७ धावा केल्या. मात्र, पाथुमचे शतक व्यर्थ ठरले. पाथुम व्यतिरिक्त परेराने ५८ धावांची खेळी केली. त्याआधी मेंडीसला भोपळाही फोडता आला नाही. कॅप्टन असलंका, ५ मेंडीस ३ धावा केल्या. तर अखेरच्या क्षणी शनाका आणि जनिथ लियानगे या जोडीने श्रीलंकेला विजयी करण्यासाठी जंग जंग पछाडलं. मात्र ही जोडी १ धाव करण्यात अपयशी ठरली आणि सामना बरोबरीत सुटला.

पहिल्या डावात काय झालं

श्रीलंकेने टॉस जिंकून भारतीय संघाला प्रथम बॅटिंगसाठी भाग पाडले. अभिषेक शर्मा, तिलक वर्मा आणि संजू सॅमसन या तिघांनी दिलेल्या सर्वाधिक धावांच्या योगदानामुळे भारतीय संघाने २० ओव्हरमध्ये ५ ओव्हरमध्ये २०२ धावांपर्यंत मजल मारली. भारतीय संघासाठी अभिषेकने सर्वाधिक ६१ धावा केल्या. संजू सॅमसन याने ३९ धावा जोडल्या. तर तिलक वर्मा याने आणि अक्षर पटेल ही जोडी नाबाद परतली. तिलकने ४९ आणि अक्षरने २१ धावा केल्या. तर इतरांच्या मदतीने भारताने २०२ धावा केल्या. तसेच भारतीय संघा प्रमाणेच श्रीलंकेच्याही ५ गोलंदाजांनी प्रत्येकी १-१ गडी बाद केला.

सूर्यवंशीने मोडला बाबरचा विक्रम

नवी दिल्ली : भारतीय संघाचा 'लिटल प्रिन्स' वैभव सूर्यवंशी मैदानावर उतरताना प्रत्येक वेळी एक विक्रम मोडतो. सध्या तो ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे, जिथे भारतीय अंडर-१९ संघ तीन सामन्यांची एकदिवसीय आणि दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळत आहे. एकदिवसीय मालिकेत, भारताच्या अंडर-१९ संघाने

ऑस्ट्रेलिया अंडर-१९ संघाचा ३-० असा धुव्वा उडवला. वनडे मालिकेत सूर्यवंशीने एकूण १२४ धावा केल्या. यूथ वनडेमध्ये सर्वाधिक धावांचा विक्रम मोडला १६ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी वयाच्या खेळाडूने यूथ वनडेमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा हा विक्रम आहे. सूर्यवंशीने ५५६ धावा पूर्ण करत बाबर आझमला (५५२ धावा) मागे टाकले आहे. सध्या तो या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. आता त्याची नजर पाकिस्तानच्याच हसन रझाच्या ७२७ धावांच्या विक्रमावर आहे, जो मोडल्यास वैभव इतिहास रचेल.

यूथ वनडेमध्ये सर्वाधिक धावा (१६ वर्षांखालील) हसन रझा: ७२७ धावा, सूर्यवंशी: ५५६ धावा बाबर आझम: ५५२ धावा केल्या आहेत. षटकारांचा जागतिक विक्रमही नावावरइतकंच नाही, तर सूर्यवंशीने नुकताच यूथ वनडेमध्ये सर्वात अधिक षटकार मारण्याचा जागतिक विक्रम देखील आपल्या नावावर केला आहे. त्याने आतापर्यंत ४३ षटकार मारले आहेत.

आरोहीने पटकावले सुवर्णपदक

| रसायनी | प्रतिनिधी |

ट्रॅक ॲड फिल्ड अकॅडमीमार्फत बांद्रे मुंबई येथे ड्रीम डॅश गो आयोजित राष्ट्रीय शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत आरोही दिपक नलावडे हिने सर्व प्रथम येत सुवर्णपदक पटकाविल आहे.



सुवर्णपदक आरोहीला जगातील सर्वांत वेगवान धावपटू हुसेन बोल्टच्या हस्ते प्रदान करण्यात आला. आरोहीला धावण्यात राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

निवडक

वीर तायक्कांदो अकॅडमीला यश

पनवेल : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड अलिबाग व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच पोलीस हेडकॉटर्स कळंबोली, नवी मुंबई यांच्या सहकार्याने जिल्हास्तरीय शालेय तायक्कांदो क्रीडा स्पर्धा २०२५-२६ चे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील विविध शाळांमधील.

३३३ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी हरेश जाधव क्रीडा विभाग प्रमुख पनवेल महानगरपालिका यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रतिक म्हात्रे पनवेल महानगरपालिका क्रीडा विभाग विजय गायकवाड क्रीडा विभाग पनवेल महानगरपालिका व समीर रेवाळे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये वीर तायक्कांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी यश संपादन करून खेळाडूंची मुंबई येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. स्पर्धेतील चमकदार कामगिरी केलेल्या वीर तायक्कांदो अकॅडमी पनवेलचे अध्यक्ष हरेश्र भगत, पनवेल शहर तायक्कांदो पनवेलच्या अध्यक्षा ॲड. प्रज्ञा भगत आणि वीर तायक्कांदो व पनवेल शहर तायक्कांदोचे सेक्रेटरी संजय भोईर, उपाध्यक्ष हेमंत कोळी, खजिनदार संदीप भगत, सदस्य निखील भोईर, गणेश शिंदे यांनी विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

ज्युदो स्पर्धेत यश

चिपळूण : मार्गताम्हाणे येथील डॉ. तात्यासाहेब स्मृती प्रतिष्ठानच्या इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांनी शालेय जिल्हास्तरीय ज्युदो स्पर्धेमध्ये एकूण ११ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रथम क्रमांकमध्ये वरद चव्हाण, यश चव्हाण, सोहम सुर्वे, मंथन डिंगणकर, सर्वेश डिंगणकर आणि देवांक साळवी द्वितीय क्रमांकामध्ये अन्वय अंतरकर, रुद्र हळदणकर, ओम जंगम व तृतीय क्रमांकामध्ये भूषण गोसावी व साकिब अलवारे या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर मुलींमधून

● अभिनव नवरात्रौत्सव मंडळ चिरनेर, नवरात्रीतील रंगोत्सव

● पेझारी (अलिबाग) येथील नवदुर्गांचा नवरात्रीतील रंगोत्सव

● सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट

● अलिबाग गुजराती नवरात्रोत्सव मंडळ, बाजारपेठ अलिबाग-वर्ष ६५

● पीएनपी बी.एड्. कॉलेज, अलिबाग.

● कु. रावी रुपेश राऊत, कुंठयांची गोठी, अलिबाग

● शिवज्ञा निलेश घरत (गोठेघर-अलिबाग) नवरात्रौत्सवनिमित्ता वेशभूषा स्पर्धेत देवीचे रुप

● जय मल्हार ग्रुप-शहाबाज

● ऋतुजा मालुसरे

● सौ. सोनाली दांडेकर, पेझारी

● दिपाली पाटील, परहूर पाडा

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)